## Tuljaram Chaturchand College, Baramati

**Following Courses are taught in the College**

- Pre-Degree Arts, Commerce and Science.
- First Year B.A., B.Com. and Pre-Professional.
- Second Year B.A. :—Marathi, Hindi, English, Sanskrit, Economics, Politics, History, Sociology, Psychology and Mathematics.
- Third Year B. A. ( Special ) :—Marathi, English, Economics, Politics, History and Mathematics.
- M. A. :—Entire Marathi, Economics & Politics ( C & D group ).
- Second Year B. Com. and Third Year B. Com. ( Advanced Accountancy and Costing ).
- M. Com. :—Costing and Business Management.
- Second Year B. Sc. :—Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Botany and Zoology.
- Third Year B. Sc. :—( Principle ) Chemistry and Mathematics.
- Well equipped, modernized laboratories and a rich library.
- Premises having beautiful natural scenery.
- A specious hostel for 100 students.






अंक ११ वा

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

# नियतकालिक

मार्च १९७३

विद्यार्थी प्रतिनिधी : मुकुंद टाकसाळे • [illegible] संपादक : प्रा. [illegible] पाटील

# भारतीय स्वातंत्र्य चिरायु होवो

स्वातंत्र्योत्तर भारताची २५ वर्षे
१५ ऑगस्ट १९४७ ते १९७२




प्रशांत मेहता
एफ वाय.बी.एस्सी,

'महाराष्ट्र लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे।
यशोगीत तिचे गाता मनीं हर्ष दाटे।।'

– कवी विनायक



अनेकान्त
ऐज्युकेशन सोसायटी, पुणे
...सिद्धिरनेकान्तात्...
तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती

★ संपादक मंडळ ★

प्राचार्य सनतकुमार भोरे — अध्यक्ष
प्रा. दयाराम पाटील — प्रमुख संपादक
प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे
प्रा. नी. ग. लोंढे
प्रा. शरद्चंद्र कुलकर्णी
प्रा. सु. त्र्यं. नायगावकर
प्रा. त्र्यं. अं. वकील
प्रा. चिं. शं. शेटी
श्री. मुकुंद टाकसाळे — विद्यार्थी प्रतिनिधी

# विद्यार्थी-प्रतिनिधी
## १९७२-७३

| | | |
|---|---|---|
| १) | जनरल सेक्रेटरी | दिलीप दत्तात्रय करे एस्. वाय्. बी. ए. |
| २) | इंडियन गेम्स | महादेव मारुती सावंत टी. वाय्. बी. कॉम्. |
| ३) | बॉल गेम्स | दादासाहेब गेनबा टकले एफ्. वाय्. बी. कॉम्. |
| ४) | ॲथलेटिक्स | सुरेश बळवंतराव इंगवले एस्. वाय्. बी. ए. |
| ५) | क्रिकेट | जगदीश नारायणराव शा[illegible]माग बी. वाय्. बी. कॉम्. |
| ६) | वादविवाद मंडळ | बद्रिनाथ गोपीनाथ मूर्ति टी. वाय्. बी. एस्सी. |
| ७) | कॉलेज नियतकालिक | मुकुंद मोरेश्वर टाकसाळे टी. वाय्. बी. ए. |
| ८) | [illegible] | सतीश नामदेवराव खोमणे एफ्. वाय्. बी. कॉम् |
| ९) | [illegible] | पुंडलिक अण्णासाहेब देवकाते एफ्. वाय्. बी. ए. |
| १०) | विद्यार्थिनी प्रतिनिधी | कु. आशाबी बागवान टी. वाय्. बी. ए. |
| ११) | विद्यार्थिनी प्रतिनिधी | कु. जयमाला शहा टी. वाय्. बी. ए. |

प्रकाशक — प्राचार्य [illegible]कुमार भोरे, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
मुद्रक — श्री. [illegible] शहा, ज्योती प्रिंटिंग प्रेस, फलटण ( सातारा )

# आमचे कुलगुरु



रँग्लर ग. स. महाजनी

## प्रभावी व्यक्तिमत्वाचे तरुण तडफदार नेतृत्व

# नामदार श्री. शरद्चंद्र पवार

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात सर्वात तरुण आणि तडफदार मंत्री म्हणून नामदार श्री. शरद्चंद्र पवार यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांची महाराष्ट्र मंत्रिमंडळात नेमणूक झाल्यावर त्यांच्या-कडे राज्यमंत्रीपद आले आणि गृह, पुनर्वसन, प्रसिद्धी, क्रीडा आणि राजशिष्टाचार ही खाती त्यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी तितक्याच कुशलतेने ही खाती सांभाळली आहेत.

विशेषतः आजच्या युवकांचे, विद्यार्थ्यांचे जे अनेक प्रश्न आहेत, समस्या आहेत, त्या सोडवि-ण्याच्या दृष्टीने त्यांनी जी निर्धारपूर्वक पावले टाकली आहेत ती त्यांच्या तडफदारपणाचेच द्योतक मानावे लागेल.

आज तरुण विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या आहेत. शिक्षणाच्या दृष्टीने अडचणी आहेत. त्या अडचणींचा निरास करण्याच्या दृष्टीने अनेक प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत.

परंतु नामदार श्री.शरद्चंद्र पवार यांनी महाराष्ट्रातील युवकांचे, विद्यार्थ्यांचे प्रश्न अतिशय आपुलकीने समजावून घेतले, सूक्ष्मपणे त्यांचा अभ्यास केला आणि त्यांच्या गुण दोषांवर अचूक बोट ठेऊन त्यांच्या विविध समस्यांची सोडवणूक करण्याचा यशस्वी प्रयत्न चालविला आहे. आजचा युवक भावनाशील व ध्येयवादी आहे. आणि योग्य मार्गदर्शन दिले तर तो कोणतेही बिकट वा कष्टाचे काम करून दाखवू शकतो, त्याचा दृष्टकोन विधायक आहे. आणि नवनिर्मितीच्या कार्यात तो फार मोठा वाटा उचलू शकेल अशी त्यांची श्रद्धा आहे.

दुष्काळाच्या भीषण परिस्थितीतही संकटाचे आव्हान स्वीकारून त्यावर मात करण्याचा त्यांनी मोठ्या जिद्दीने प्रयत्न चालविला आहे. हे कार्य यशस्वी व्हावे म्हणून समाजातील सर्व थरांचे सहाय्य घेण्याचे, त्यांना कार्यप्रवृत्त करण्याचे, युवकांची चातुर्याने संघटना करून त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देण्याचे, त्यांना कार्यतत्पर करण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त झाले आहे.

त्यांच्या तडफदार नेतृत्वाने महाराष्ट्रातील युवक प्रभावित झालेला आहे आणि महाराष्ट्राची सर्वांगीण उन्नती करण्याची जणू त्याने मनोमन प्रतिज्ञा केली आहे.

असा हा तरुण, तडफदार नेता बारामती शहराने महाराष्ट्राला दिला, याबद्दल बारामतीकरांना निश्चितच अभिमान वाटतो.

नामदार श्री. शरद्चंद्र पवार ज्या तन्मयतेने महाराष्ट्रातील युवकांच्या समस्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्या कार्यात त्यांना उज्ज्वल यश लाभो, आणि त्यांच्या हातून महाराष्ट्र आणि भारतदेश यांची अधिकाधिक सेवा घडो हीच प्रभु-चरणी प्रार्थना.





नामदार श्री. शरच्चंद्र पवार
राज्यमंत्री– गृह, पुनर्वसन, क्रीडा, प्रसिद्धी व राजशिष्ठाचार.



पाहुण्यांच्या समवेत प्राचार्य आणि प्राध्यापक.

# आमची प्रेरणा आणि आमची स्फूर्ती -



माजी प्राचार्य
डॉ. आर. टी. अक्कोळे



प्राचार्य
सनत् कुमार भोरे.

## मनःपूर्वक अभिनंदन !



प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे यांना
पुणे विद्यापीठाने त्यांचा
हिन्दी और मराठीमें प्रयुक्त संस्कृतके
तद्भव शब्दोंका अध्ययन विषयावरील
प्रबंधाला मान्यता देऊन
पी एच् डी. पदवी प्रदान केली.



प्रा. डॉ. सुर्वेयांचा सत्कार करतांना प्राचार्य भोरे.



विद्यार्थ्यांकडून केलेल्या सत्काराचा स्वीकार.



अध्यक्ष श्री. माणिकलाल वाघोलीकर,
प्राचार्य भोरे,
प्रा. डॉ. सुर्वे सत्काराला उत्तर.

॥ सिद्धिरनेकान्तात् ॥

# संपादकीय

**दशकानंतरची वाटचाल :**

२३ जून १९७२ रोजी आमच्या महाविद्यालयाने ११ व्या वर्षात पदार्पण केले. आमच्या महाविद्यालयाचा हा दुसऱ्या दशकातील पहिला अंक वाचकांच्या हाती देताना आम्हास आनंद होत आहे. गेल्या दशकात आमच्या महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा आलेख आम्ही गेल्या वर्षीच्या अंकात वाचकांना सविस्तरपणे सादर केलेला आहेच.

महाविद्यालयाची प्रगती म्हणजे काय? असा प्रश्न जर कोणी विचारला तर कोणीही सुज्ञ विचारवंत महाविद्यालयाची प्रगती केवळ दगड-मातीच्या विटा-चुन्याच्या इमारतीची वाढ आणि त्यांचा विस्तार यावरून करणार नाही. तर त्या महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेची जोपासना कशी केली, विद्यार्थ्यांनी कोणती गुणवत्ता प्राप्त केली? किती प्रमाणात ती केली यावरच ती मापता येईल.

आमच्या महाविद्यालयाची निर्मितीच मुळी गुणवत्तेच्या या मूलभूत भूमिकेतून झालेली आहे. आणि आमच्या महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी आमच्या संस्थेचे चालक, प्राचार्य तसेच प्राध्यापकांनी संस्थेच्या गुणवत्तेची जोपासना आणि संवर्धन या दृष्टीनेच पराकाष्ठेचे प्रयत्न केले आहेत. करीत आहेत. आणि त्याचेच दृष्यफल म्हणजे महाविद्यालयाचा आज वाढलेला विस्तार होय. १२० या विद्यार्थीसंख्येनें सुरू झालेल्या आमच्या महाविद्यालयात आज १३६२ विद्यार्थी आहेत. त्यात १७२ विद्यार्थिनी आहेत.

या संख्येचा उल्लेख करण्याचे कारण एवढेच की, स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा जो प्रसार झाला त्यात आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या बोलकी मानावी लागेल. पुणे विद्यापीठाच्या कक्षेत पुणें जिल्ह्यात पुणे शहर सोडून जी महाविद्यालये स्थापन झाली, त्यात आमच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयानें आपले मानाचे स्थान स्वकर्तृत्वानें प्राप्त करून घेतले आहे हे निर्विवाद सत्य !

विद्यार्थ्यांची संख्या जशी प्रतिवर्षी वाढत गेली त्याप्रमाणे शैक्षणिक दृष्टया अधिक विस्तार व वाढही करण्यात आली. आणि एम्. ए. (संपूर्ण मराठी) एम्. ए (अर्थशास्त्र - राज्यशास्त्र) आणि एम्. कॉम्. चे वर्ग जून १९७० पासून उघडण्यात आले.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच क्रीडाक्षेत्रातही आमच्या महाविद्यालयाने नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. थोडक्यात म्हणजे आमच्या महाविद्यालयाने सर्वांगीण प्रगतीचा प्रयत्न केला आहे व शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

गेल्या दहा वर्षातील आमच्या महाविद्यालयाचे विद्यापीठ परीक्षांचे निकालही उत्कृष्ट आहेत.

**– आमच्या कॉलेजचे मार्च-एप्रिल १९७२ मध्ये झालेल्या विद्यापीठ परीक्षांचे निकाल –**

| वर्ग | प्रथम वर्ग | द्वितीय वर्ग | उत्तीर्ण | पासाचे शे. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) पदवीपूर्व साहित्य | – | ६० | ९५ | ६८.२८ |
| २) पदवीपूर्व वाणिज्य | ३ | ४८ | १८ | ७१.८७ |
| ३) पदवीपूर्व विज्ञान | १० | २१ | १० | ५६.९० |
| ४) प्रथमवर्ष साहित्य | | | १०६ | ६७.९४ |
| ५) ,, वाणिज्य | | | ४८ | ६६.६६ |
| ६) ,, विज्ञान | १३ | १४ | ६ | ६०.०० |
| ७) तृतीयवर्ष साहित्य | – | २४ | १७ | ८५.१० |
| ८) ,, वाणिज्य | – | १२ | ८ | ७६.९२ |
| ९) ,, विज्ञान | ९ | ७ | – | १००.०० |
| १०) द्वि. वर्ष विज्ञान | | | ११ | ७३.३३ |
| ११) एम्. ए. मराठी | – | ७ | ३ | १००.०० |
| १२) ,, अर्थशास्त्र-राज्यशास्त्र | – | – | १ | १००.०० |
| १३) एम्. कॉम्. | – | २ | ४ | ७५.०० |

सूचना– प्रथमवर्ष साहित्य, प्रथमवर्ष वाणिज्य व द्वितीय वर्ष विज्ञान या परीक्षांना श्रेणी (वर्ग) दिली जात नाही.

## आमचे प्राचार्य :

आमच्या महाविद्यालयाला लाभलेली प्राचार्यांची परंपरा मोठी भूषणावह आहे. प्राचार्य वणकुद्रे हे आमच्या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य होते. त्यानंतर प्राचार्य ए. ए. पाटील आले आणि नंतर जून १९६५ पासून १४ जून १९७२ पर्यंत प्राचार्य डॉ. अक्कोळे यांनी प्राचार्यपद भूषविले.

## प्राचार्य डॉ. अक्कोळे यांची सात वर्षे :

कॉलिजच्या स्थापनेपासून डॉ. अक्कोळे संस्थेत काम करीत होते. त्यांचा मूळ पिंड शिक्षकाचा. अध्ययन-अध्यापन मनन-चिंतन यात रमण्याची त्यांची वृत्ती. पण संस्थेच्या चालकांनी टाकलेली जबाबदारी त्यांनी कर्तव्य म्हणून स्वीकारली डॉ. अक्कोळे यांनी प्राचार्यपदाची सूत्रे स्वीकारली तेव्हा महाविद्यालय नुकतेच बाळसे धरू लागले होते. त्याच्या ऐन भरणपोषणाच्या काळात त्याच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. आणि ती त्यांनी मोठ्या कुशलतेने पार पाडली.

सात वर्षांच्या त्यांच्या प्रशासनाच्या काळात त्यांनी कॉलेजचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. विविध विषयांच्या अध्यापनाची सोय उपलब्ध झाली. विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत असे वसतीगृह बांधले. विज्ञान विभागाच्या विविध प्रयोगशाळांची उभारणी झाली. एम्. ए. व एम्. कॉम् चे वर्ग सुरू केले. यामुळे महाविद्यालयाला स्थायी स्वरूप आले आणि एक मूर्त असे देखणे रूप प्राप्त झाले. प्रशासकीय कार्याची आसक्ती नसतानाही वाट्याला आलेले कर्तव्य त्यांनी चोखपणे बजावले व उत्तम प्रशासक म्हणून लौकिक मिळविला.

डॉ. अक्कोळे यांची कारकिर्द संस्थेचे चालक, पालक, प्राध्यापक व विद्यार्थी तसेच कॉलेजचा सेवकवर्ग याच्या सदैव स्मरणात राहील व संस्थेच्या इतिहासात डॉ. अक्कोळे याचा हा कालखंड प्रगतीचा कालखंड म्हणून नोंदावा लागेल.

परंतु डॉ. अक्कोळे यांना प्रकृति-अस्वास्थ्यामुळे प्राचार्यपदाची जबाबदारी आता नको होती. सर्वांनाच ते हवे होते. पण त्यांनी निग्रहपूर्वक या जबाबदारीतून आपली मुक्तता करून घेतली आणि संस्था चालकांनीही त्यांच्या प्रकृतिस्वास्थ्याचा विचार करून त्यांना या जबाबदारीतून मुक्त केले आणि संस्थेच्याच जयसिंगपूर येथील कॉलेजात मराठी विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती केली.

## प्राचार्य सनत्कुमार भोरे :

प्राचार्य डॉ. अक्कोळे यांना संस्थेने प्राचार्यपदाच्या जबाबदारीतून मुक्त केले व प्राचार्य सनत्कुमार भोरे यांच्याकडे संस्थेच्या प्राचार्यपदाची जबाबदारी सोपविली आणि त्यानुसार १५ जून १९७२ रोजी प्राचार्य भोरे यांनी प्राचार्यपदाची सूत्रे स्वीकारली.

प्राचार्य भोरे सन १९५८ साली नागपूर विद्यापीठाची बी. ए परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले व प्रायोगिक मानसशास्त्र हा खास विषय घेऊन ते १९६१ मध्ये पुणे विद्यापीठाची एम्. ए. परीक्षा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

सन १९६१ ते १९७० या काळात ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर येथील रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेजात मानसशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. मन १९७० ते १९७२ या काळात त्यांनी कर्मवीर भाऊसो हिरे यांच्या मालेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड कॉलेजात बी ए. (ऑ.) ला प्रायोगिक मानसशास्त्राचे उत्तम प्राध्यापक म्हणून लौकिक संपादन केला.

प्राचार्य भोरे यांनी प्राचार्यपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अल्पावधीतच विद्यार्थी, प्राध्यापक, संस्थाचालक, पालक आणि महाविद्यालयातील सेवकवर्ग यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या स्नेहशील व्यक्तित्वाशी अल्पावधीत सर्व एकरूप होऊन गेले आहेत.

महाविद्यालयातील आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या सहाय्याने त्यांनी संस्थेच्या अडीअडचणी समजावून घेतल्या आणि त्या यशस्वीपणे सोडविण्याच्या दृष्टीने निर्धारपूर्वक प्रयत्न चालविले आहेत.

प्राचार्य भोरे यांनी संस्थेच्या प्राचार्यपदाची उज्ज्वल परंपरा आपल्या कर्तृत्वाने आणि मोठ्या कुशलतेने चालविली आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली महाविद्यालयाला सर्वच क्षेत्रात उज्ज्वल यश मिळेल असा विश्वास आहे.

## आमचे प्राध्यापक :

आमचे प्राध्यापक महाविद्यालयातील आपल्या अध्यापन कार्याबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात अन्य स्वरूपाची आवश्यक सेवा संधी मिळेल तेव्हा करीत असतात त्यानुसार यावर्षी पुढील प्राध्यापकांनी विविध क्षेत्रात कार्य केले आहे.

प्रा. डॉ. जे. के. गोवा यांनी पिंपळगाव, बसवंत (जि. नाशिक) येथील महाविद्यालयात वाणिज्य मंडळाचे उद्घाटन केले आणि 'वाणिज्य शाखेच्या अभ्यासक्रमाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान दिले. जयसिंगपूर येथील कॉलेजात 'व्यवस्थापन शास्त्राचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान झाले. तसेच अर्जुननगर (जि कोल्हापूर) येथील देवचंद कॉलेजमध्ये कॉमर्स असोसिएशनचे उद्घाटन करून 'भारतातील नियोजनाचे अपयश' या विषयावर भाषण केले आणि ६ जाने. ७३ रोजी शिरूर (घोडनदी) जि. पुणे येथील सी. टी. बोरा कॉलेजात 'नियोजन व वाणिज्य' या मंडळांच्या समारोप समारंभाचे प्रमुख वक्ते म्हणून 'पंचवार्षिक योजनेच्या अपयशाची मीमांसा' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.

प्रा. दयाराम पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त न्यू इंग्लीश स्कूल, कोऱ्हाळे (पुणे) येथे व्याख्यान दिले. तसेच शिक्षण मंडळ पुणे विद्यापीठ यांच्या वतीने गणेशनगर, (नगर) येथे तसेच पिंपळनेर (धुळे) येथे 'महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा' या विषयावर व्याख्याने दिली. त्याचवेळी बालदिनानिमित्त तेथील गणेश विद्यालयात पं. नेहरू यांच्या जीवन चरित्रावर त्यांचे व्याख्यान झाले.

प्रा. डॉ. के. एम्. सुर्वे यांचा पुणे विद्यापीठाने 'हिंदी और मराठीमें प्रयुक्त संस्कृतके तद्भव शब्दोंका अध्ययन' या विषयावरील प्रबंध मान्य केला व त्यांना पीएच्.डी पदवी प्रदान करून त्यांचा गौरव केला. त्यांनी शिक्षकदिनानिमित्त शेटफळ-गढे येथील नागेश विद्यालयात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारले व 'शिक्षक, पालक व विद्यार्थी यांचे संबंध' या विषयावर भाषण केले व पारितोषिक वितरण केले. तसेच जेजुरी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यामंदिरात गणेशोत्सवाप्रसंगी 'हमारे त्यौहार-आजके संदर्भमें' या विषयी व्याख्यान दिले. म. गांधी जयंतीनिमित्त छ. शाहू हायस्कूल, बारामती येथे 'म. गांधी-एक पुनर्दर्शन' या विषयावर भाषण झाले.

बडगाव निंबाळकर (पुणे) येथील स्वातंत्र्य विद्यामंदिरात एस्. एस्. सी. च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्याच्या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून गेले होते.

**प्राध्यापकांची प्रकाशने :**

'Business Mathematics for P. D. Commerce' हे पुस्तक डॉ. जे. के गोधा, प्रा. बी. बी. पाटील आणि प्रा. पी. डी वावरे यांनी प्रकाशित केले. पदवीपूर्व वाणिज्य शाखेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक उपयुक्त सिद्ध झाले आहे.

Analytical Geometry
Vector Algebra }
Matrix Algebra
For Pre-Professional / F. Y. B. Sc.

हे पुस्तक प्रा. बी. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन पुण्याच्या वाडिया कॉलेजचे उपप्राचार्य व गणित विभागाचे प्रमुख प्रा. आगरवाल व अमळनेरच्या प्रताप कॉलेजमधील गणित विभागाचे प्रमुख प्रा. जी. एल्. ढाके यांच्या सहकार्याने प्रकाशित केले.

प्रा. आर्. एच्. चाफेकर यांनी 'Text Book of Organic Chemistry' या नावाची विज्ञान विभागातील चारही सेमेस्टरच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी चार वेगवेगळी पुस्तके पुण्याच्या अनमोल प्रकाशनाच्याद्वारा प्रकाशित केली. ही पुस्तके विद्यार्थ्यांना चांगली मार्गदर्शक ठरली आहेत.

* *

या वर्षी प्रा. एस्. एन्. दोशी, प्रा. एम्. एस्. आळतेकर, प्रा. पी. जी. डोंगरे हे संस्था सोडून अन्यत्र गेले आणि प्रा. व्ही. के. देव, प्रा. डी. एच्. फिरके, प्रा. एस्. आर्. शिंदे, प्रा. डी. व्ही. टोगले यांच्या या वर्षी नव्याने नेमणुका झाल्या. आम्ही आम्हाला सोडून गेलेल्या प्राध्यापकांना सुयश चिंतितो व नव्याने आलेल्यांचे स्वागत करतो.

**आमचे विद्यार्थी :**

विद्यापीठ परीक्षातील आमच्या विद्यार्थ्यांचे यश जसे मनाला समाधान देणारे आहे तसेच आमचे विद्यार्थी इतर क्षेत्रातही आपल्या कर्तव्याची पूर्तता करण्यात मागे नाहीत याचे प्रत्यंतर आपल्या कर्तव्यपूर्तीने आणून दिले आहे.

विशेषतः महाविद्यालयातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विद्यार्थी प्रतिनिधींनी जे परिश्रम घेतले ते विशेष उल्लेखनीय आहेत. प्राचार्य आणि प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदत मिळावी म्हणून मदतीची पेटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून मदत मिळविण्यासाठी फिरविण्यात आली आणि आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणें रुपये ५२८-२० मदत दिली.

स्वातंत्र्यसैनिकांच्या ज्या पाल्यांना सरकारी अनुदान मिळते त्यातील काही भाग या विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदतीसाठी दिला. नेपाळच्या सहलीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांनीही यथायोग्य सहाय्य केले. विद्यार्थी प्रतिनिधींनी दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी वालचंदनगरला एक फन-फेअरचा कार्यक्रम आयोजित केला आणि रु. १०११ चा निधी जमविला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जनरल सेक्रेटरी श्री. दिलीप करे, श्री. बद्रिनाथ मूर्ती, श्री. मुकुंद टाकसाळे, कै. चंद्रमोहन देशपाण्डे, कु. आशाबी बागवान कु. जयमाला शहा यांनी खूप परिश्रम घेतले. तसेच वालचंदनगर इंडस्ट्रिजचे चीफ एक्झिक्युटीव्ह ऑफिसर श्री. एस्. डी. जोशी, श्री. एम्. जी. भिडे-डेप्युटी जनरल मॅनेजर- यांचेही आम्हास मौलिक सहकार्य लाभले. वालचंदनगरच्या नागरिकांनीही मोठ्या औदार्याने या कार्यक्रमास आम्हाला उत्तम प्रतिसाद दिला. याबद्दल या सर्वांनाच आम्ही शतशः धन्यवाद देतो.

आमच्या विद्यार्थ्यांचा दुसराही एक विशेष उल्लेख करावासा वाटतो. तो म्हणजे त्यांची शिस्तप्रियता. विद्यार्थीविश्व म्हटले म्हणजे त्यात स्वाभाविकपणेच थोडासा अवखळपणा व खोडसाळपणा असतोच आणि तो महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत असणे अपरिहार्य आहे. पण आमच्या विद्यार्थ्यांच्या हातून शिस्तीच्या संदर्भात कोणत्याही मर्यादेचे उल्लंघन होत नाही. ते शिस्तीनें सर्वच कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य देतात. मग ते बारामतीत होणाऱ्या खो खो च्या स्पर्धा





असोत, आंतर महाविद्यालयीन कबड्डीच्या स्पर्धा असोत की पद्मभूषण डॉ. मोदी यांचे व्याख्यान असो अथवा श्री राहुलकुमार बजाज, श्री. वसंतराव काणे, श्रीयुत वसंतराव ओगळेकर या वृत्तपत्र आणि चित्रपट सृष्टीतील मान्यवरांशी वार्तालाप असो, वा जिमखान्याच्या निवडणुका असोत, सर्वच कार्यक्रमात ते समरस होऊन जातात. आमच्या विद्यार्थ्यांची शिस्तप्रियता हा आमच्या अभिमानाचा एक भाग म्हणून नमूद करण्यास आम्हाला आनंद वाटतो.

आज देशात विद्यार्थीविश्वात वाढता असंतोष दिसून येत आहे. विद्यार्थीविश्वातील असतोष व बेशिस्त पाहून भारताचे राष्ट्रपती मा. श्री व्ही. व्ही. गिरी व पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी देखील चिंता व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर आमच्या महाराष्ट्रातील विद्यार्थी खूपच विवेकी आणि संयमशील आहे हे निर्विवाद सत्य!

आमचे विद्यार्थी शिस्तीने वागतात याचाच अर्थ ते आपली प्रतिष्ठा राखतात आणि पर्यायाने आपले प्राध्यापक व आपले महाविद्यालय याची प्रतिष्ठा राखतात. आमच्या महाविद्यालयाचा विद्यार्थी महाविद्यालयाशी सश्रद्ध एकरुप झाला आहे हाच आमचा स्वाभिमान. अभ्यासाबरोबरच इतर कलागुणातही त्यांनी नपुण्य प्राप्त केले आहे. आपल्या सचोटीचे व प्रामाणिकपणाचे प्रत्यंतर आणून दिले आहे.

श्री. विलोल खळदकर या आमच्या एफ् वाय्. बी. कॉम् मधील विद्यार्थ्यास महाविद्यालयात येताना २० जुलै ७२ रोजी दीडशे रुपये असलेले एक पाकींट सापडले. ते त्याने मा. प्राचार्य साहेब यांच्या स्वाधीन केले ते त्यांनी ज्याचे होते त्याला ओळख पटवून दिले. ते पाकिट ज्याचे होते त्याने दहा रुपये बक्षीस देऊ केले पण ते देखील श्री. खळदकर यांनी स्वीकारले नाहीत. ते त्याने गरीब विद्यार्थ्यांच्या मदत निधीसाठी प्राचार्यांच्या स्वाधीन केले. श्री. खळदकरांचें त्याबद्दल अभिनंदन !

श्री. मुकुंद टाकसाळे, टी. वाय्. बी. ए. यांना 'किर्लोस्कर' विनोद स्पर्धेत आणि 'मनोहर' दिवाळी १९७२ यात झालेल्या विनोदी पत्रक स्पर्धेत बक्षिसे मिळाली तसेच 'राजस' मासिकाने आयोजित केलेल्या महाविद्यालयीन कथा स्पर्धेत १९७ कथांतून त्यांच्या विनोदी कथेला पारितोषिके मिळाली, 'सायकलो, थोर तुझे उपकार' ही त्यांची विनोदी कथा १२ नोव्हें. ७२ रोजी आकाशवाणी पुणे केंद्रावरून प्रसारित करण्यात आली. अहमदनगर येथे पेमराज सारडा कॉलेजात झालेल्या आंतरविद्यापीठ शारदा करंडक कथा-कथन स्पर्धेत खास पारितोषिक मिळाले.

श्री. मनोजकुमार शहा, एम्. कॉम्. (प्रथमवर्ष) यांची 'एखाद्याचं नशीब' ही कथा 'रविवार सकाळ' दिनांक २२ ऑक्टो. ७२ला प्रसिद्ध झाली. तसेच त्यांनी गुजराती भक्तिगीतांचे एक हिंदी पुस्तक प्रकाशित केले आहे. प्रकाशन दि. ११ सप्टेंबर १९७२.

कु. माधुरी फाटक, टी. वाय्. बी. ए. यांना ११व्या राज्य नाट्य महोत्सवात 'कुंकु जपून ठेव' या नाटकातील 'कमले' च्या भूमिकेबद्दल वैयक्तिक पारितोषिक नटवर्य श्री. मामासाहेब पेंडसे यांच्या हस्ते १२ मार्च ७२ रोजी मिळाले.

श्री. किसन आटोळे, एफ्. वाय्. बी. एस्सी. यांची 'आहुती' नामक कथा 'साहस' दिवाळी अंक ७२ मध्ये प्रकाशित झाली. तर कु. विद्या पांडकर, पी. डी. आर्टस् यांची 'शल्य' ही कथा रविवार सकाळ दि. २७ ऑक्टो. ७२ मध्ये प्रसिद्ध झाली.

श्री. प्रशांत मेहता. एफ्. वाय्. बी. एस्सी. (ए) या कलावंत विद्यार्थ्याला भारतीय रौप्यमहोत्सव समिती बारामती तर्फे १५ ऑगस्ट ७२ रोजी कलानिकेतन या संस्थेच्यां वतीने आयोजित केलेल्या रांगोळी प्रदर्शनात लॅण्डस्केप मध्ये प्रथम पारितोषिक मिळाले.

या सर्व साहित्यिक, कलावंत विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यांच्या कलेत त्यांना असेच उज्ज्वल यश मिळो ही सदिच्छा !

या वर्षी निवडून आलेल्या सर्वच विद्यार्थी-प्रतिनिधींनी देशातील दुष्काळी परिस्थितीची जाणीव ठेऊन त्या दृष्टीने काम करण्याचे ठरविले आणि प्राचार्य व

प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार सर्व कार्यक्रम त्यांनी यशस्वी केले याचा खास उल्लेख करताना आम्हास आनंद होतो.

### आमच्या विद्यार्थ्यांची संकटकालची कामगिरी :

आमच्या महाविद्यालयापासून थोड्याच अंतरावर असलेल्या जिनिंग फॅक्टरीतील कापसाच्या गाठींना दि. ३-२-७३ रोजी अचानक आग लागली. त्या आगीचे स्वरूप भीषण होते. ती आटोक्यात आणण्याचे सर्व लोक प्रयत्न करीत होते. त्यात आमच्या असंख्य विद्यार्थ्यांनी जीवाची पर्वा न करता अविरत परिश्रम केले. सायंकाळी ५-३० च्या सुमाराला लागलेल्या या भीषण आगीचे थैमान रात्री १२ पर्यंत चालू होते. ते आटोक्यात आणण्यासाठी पुण्याहून फायर-फायटर्स मागविण्यात आले होते. आमचे असंख्य विद्यार्थी या संकटकाळी शेवटपर्यंत खपत होते. आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असलेल्या कापसाच्या गाठी आमच्या विद्यार्थ्यांनी जीव धोक्यात घालून वाचविल्या आणि लाखो रुपयांची राष्ट्रीय हानी वाचविण्याची धडपड केली. संकटकाळी धावून गेलेल्या आमच्या विद्यार्थ्यांचे जनता कौतुक करीत आहेच. आम्हास त्यांच्या कर्तव्यतत्परतेचा आनंद आहे, अभिमान आहे.

### दुष्काळाची भीषण छाया :

बारामती तालुक्याच्या काही भागाला तसेच इंदापूर तालुक्याला लागोपाठ तिसऱ्या वर्षी दुष्काळाशी सामना करण्याचा दुर्धर प्रसंग प्राप्त झाला आहे. या परिस्थितीचा परिणाम अर्थातच आमच्या महाविद्यालयात शिकणाऱ्या त्या भागातील विद्यार्थ्यांना भोगावा लागत आहे. जेमतेम गुजराण करणारे हे विद्यार्थी या दुष्काळाच्या फटकाऱ्याने अधिकच खचून गेले. त्यांच्या खाण्यापिण्याची आबाळ होऊ लागली. तेव्हा अशा विद्यार्थ्यांची फारच मोठी समस्या आमचे प्राचार्य आणि प्राध्यापक यांच्यापुढे उभी राहिली. वेळीच या प्रसंगातून मार्ग शोधला नाही तर परिणामी या विद्यार्थ्यांना शिक्षणास मुकावे लागेल आणि त्यांचे वर्ष वाया जाईल, तेव्हा काहीतरी मार्ग काढण्याच्या दृष्टीने आमच्या प्राचार्यांनी या समस्येच्या संदर्भात ना. श्री. शरद्चंद्र पवार यांच्याशी विचार-विमर्श केला आणि नामदारांनी या समस्येची तातडीने दखल घेऊन तेवढ्याच त्वरेने ती समस्या सोडविण्यासाठी साद व साथ दिली आणि त्याचे मूर्त रूप म्हणजे 'विद्याप्रतिष्ठान'!



### विद्या प्रतिष्ठान -"आम्ही ऋणी तयांचे":

मा. ना. श्री. शरद्चंद्र पवार यांनी बारामती शहराचे लोकप्रिय नगराध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर, श्री. खुशालचंद छाजेड, श्री. शरद वाडकर यांच्या सहकार्याने विद्या प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना केली. ही संस्था बॉम्बे पब्लिक ॲक्ट आणि सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नोंदली आहे. या संस्थेचे अध्यक्ष नामदार श्री. शरद्चंद्र पवार असून उपाध्यक्ष नगराध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर आहेत. खजिनदार श्री. खु. र. छाजेड असून श्री. शरद वाडकर हे या संस्थेचे सेक्रेटरी आहेत. याशिवाय माळेगाव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व मॅ. डायरेक्टर, तसेच भवानीनगर येथील छत्रपति सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि मॅ. डायरेक्टर, मार्केट कमिटीचे चेअरमन, बारामती नगरपरिषदचे अध्यक्ष हे कार्यकारी मंडळाचे पदसिद्ध सभासद आहेत.

या संस्थेची कार्यकक्षा बारामती व इंदापूर या दोन तालुक्यापुरतीच मर्यादित असून या दोन्हीही तालुक्यातील विद्यार्थी जगताचे शैक्षणिक प्रश्न सोडविणे हा या संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. या भागातील शैक्षणिक संस्थांना इमारत फंडासाठी मदत करणे, गरीब परंतु हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देणे, प्रसंग विशेषी जर एखादा गरीब विद्यार्थी उच्च शिक्षणास परदेशी जाण्याच्या योग्यतेचा असला तर त्याला आर्थिक सहाय्य देऊन त्याला शिक्षणक्रम पूर्ण करण्यास मदत करणे असाही संस्थेचा मानस आहे. थोडक्यात म्हणजे कोणत्याही गरीब विद्यार्थ्याचे शिक्षण आर्थिक मदतीवाचून अडून राहता कामा नये ही संस्थेची भूमिका आहे. सत्पात्र व गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमासाठी ट्रेनिंगला पाठविणे, हायस्कूल व कॉलेजमधील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना फी व पुस्तके पुरविणे, त्यांना शिष्यवृत्त्या देणे अशा व्यापक भूमिकेतून संस्थेने शैक्षणिक कार्याला मदत देण्याचे ठरविले आहे. तसेच पब्लिक स्कूलची स्थापना करणे, जीवनोपयोगी शिक्षण देणारी अशी ज्ञानप्रबोधिनी सारखी शिक्षणसंस्था काढावी असाही संस्थेचा विचार आहे. त्यादृष्टीने येत्या जून ७३ पासून एखादी पब्लिक स्कूल बारामती शहरात सुरू केली जाईल. तसेच हायस्कूल व कॉलेजमधील विद्यार्थिनींचे वसतीगृह सुरू करण्याचीही योजना विचाराधीन आहे. संस्थेला लागणारा फंड देणगीरूपाने व सभासदांच्याकडून वार्षिक वर्गणीच्या रूपाने उभारला जाणार आहे. अशा रितीने शिक्षण क्षेत्रात बहुमोल सहाय्य करण्याच्या उद्देशाने निघालेल्या 'विद्या प्रतिष्ठान' या संस्थेने आमच्या समस्येची दखल घेऊन दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी धाडसी पाऊल उचलले व आमच्या महाविद्यालयातील २५० विद्यार्थ्यांची दोन्ही वेळ पोटभर जेवणाची व्यवस्था त्यांनी केली. या योजनेच्या कार्यवाहीसाठी लागणारी सहा-सात हजार रुपयांची उभारणी त्यांनी जिद्दीने केली. या कार्यात माळेगाव सहकारी साखर कारखाना आणि भवानीनगर येथील छत्रपति सहकारी साखर कारखाना यांनी बहुमोल आर्थिक सहाय्य दिले.



आम्हाला असे वाटते की, महाराष्ट्रात दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांसाठी ज्या सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, त्यात विद्या प्रतिष्ठानने कार्यवाहीत आणलेली भोजन व्यवस्था ही सर्वात पहिली व तितकीच धाडसी मानावी लागेल. सप्टेंबर १९७२ पासून सुरू झालेली ही योजना विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपेपर्यंत म्हणजे मार्च १९७३ पर्यंत चालू राहणार आहे

नामदार श्री. शरद्चंद्र पवार यांच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या विद्या प्रतिष्ठानने आमच्या गरजू विद्यार्थ्यांसाठी केलेल्या या मौलिक मदतीचे आम्हाला चिरंतन स्मरण राहील. 'आम्ही ऋणी तयांचे!'

मा. ना. श्री. शरद्चंद्र पवार, सर्वश्री. विनोदकुमार गुजर, खुशालचंद छाजेड, शरद वाडकर, माणिकराव जाचक, दिनकरराव पवार, माधवराव गेनबा तावरे, एस्. एस्. हिरेमठ, श्रीपाल छगनलाल मुथा, लक्ष्मणराव भोपळे, धोंडीबा आबाजी सातव, कमलाकर दवाण पाटील, बी. बी. घुले, डॉ. एम्. आर्. शहा, हरिभाऊ देशपांडे आदी सर्व मंडळींचे हे ऋण आमची संस्था संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थीजन सदैव स्मरणात ठेवतील.



विद्या प्रतिष्ठानच्या वतीने सुरू झालेल्या या भोजनव्यवस्थेला पुणे जिल्हाधिकारी मा. श्री. जमशेटजी कांगा, श्री. भिमाणी, श्री. हिरानंदजी, मुंबई, श्री. राहुलकुमार बजाज, डॉ. एम्. सी. मोदी, श्री. वसंतराव काणे, श्री. वसंतराव जोगळेकर आदी मान्यवर व्यक्तींनी भेटी दिल्या व अत्यंत समाधान व्यक्त केले.

### ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटी :

विद्या प्रतिष्ठानच्या द्वारा दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था झाली पण मोठी आर्थिक समस्या पुढेच होती, या विद्यार्थ्यांकडे विद्यापीठ परीक्षेचें फॉर्मस् भरण्यासाठी पैसा होता कुठे? अन्य समस्या सुटली होती व आर्थिक समस्या 'आ' वासून पुढे उभी होती. तिच्यातून देखील मार्ग काढणें क्रमप्राप्त होते. विद्यापीठ परीक्षेचे फॉर्म्स भरायला फारच थोडा अवधी होता. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी कोणाकडे धाव घ्यावी हा प्रश्न होता. तेव्हा गेल्या वर्षी दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या फीसाठी ज्यांनी १०,००० रुपये दिले त्या ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटीकडे सहाय्य मागितले. त्यांनी देखील तत्परतेने या समस्येचे महत्त्व ओळखून रु. ६१२५ची रोख मदत दिली. त्यास्तव सर्वश्री लक्ष्मण कृष्णा भोपळे (सभापती), गजानन यशवंत खलाटे (उपसभापती), लालासाहेब नानासाहेब जगताप, विठ्ठलराव खाशाबा गाडेकर, लक्ष्मण कृष्णा गावडे, गुजाबा पांडूरंग आटोळे, वसंतराव परशराम सस्ते, शिवाजीराव बाळासाहेब बांदल, धोंडीबा गेनबा गावडे, तात्यासाहेब खंडेराव कोकरे, खुशालचंद रतनचंद छाजेड, माणिकचंद रुपचंद शहा, लक्ष्मण गोविंद पोतेकर, विनोदकुमार रंगीलदास गुजर, मुगुटराव साहेबराव काकडे या मान्यवरांनी खूप परिश्रम घेऊन तत्परतेने ही मदत मिळवून दिली. अगदी योग्य वेळीं मिळालेल्या या आर्थिक मदतीचे मोल शब्दांनी व्यक्त करता येणार नाही. त्या संबंधीची कृतज्ञतेची भावना आमच्या आणि आमच्या विद्यार्थ्यांच्या मनात सदैव राहील. ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटीच्या सर्व सदस्यांचे आम्ही ऋणी आहोत.

महाराष्ट्रात अनेक ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट कमिट्या आहेत. परंतु बारामती ॲग्रिकल्चरल प्रोड्युस मार्केट कमिटीने केलेले हे शैक्षणिक व पवित्र कार्य महाराष्ट्रात उल्लेखनीय व भूषणावह मानावे लागेल.

**राष्ट्रीय खो खो स्पर्धा :-**

या वर्षीच्या राष्ट्रीय खो खो स्पर्धा बारामती येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. बारामती शहराने उचललेली ही फार मोठी जबाबदारी होती. ना. शरद्चंद्र पवार यांच्या प्रेरणेनेच हे शक्य झाले. म. ए. सों हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. बी. जी. घारे, नगराध्यक्ष श्री. विनोदकुमार गुजर, श्री. माणिकलाल वाघोलीकर, श्री. धों. आ. सातव, श्री. खुशालचंद छाजेड यांनी; तसेच पुण्याचे श्री. एस्. वी. गोगटे, प्रा. सुरेश नाडकर्णी, खो खो फेडरेशनचे श्री. अंबर्डेकर यांनी खूपच परिश्रम घेतले. हे सामने यशस्वी करण्या-साठी आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनीही साहाय्य केले. आमचे प्राचार्य सनत्कुमार भोरे, डॉ. गोधा. प्रा. चाफेकर, प्रा. नवाथे, प्रा. किर्णिगे, प्रा. डी. के मगदुम, श्री. सणगर, श्री. जाशी श्री. लेकावळे या सर्वांनीच आपल्या कर्तव्याचा वाटा उचलला. या खो खो स्पर्धा मोठ्या चुरशीने पार पडल्या. त्यात महाराष्ट्राचा पुरुष संघ आणि कुमार गट विजयाचा वारस ठरला. महाराष्ट्राची शान वाढली. बारामतीची मान उंचावली. खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन. या स्पर्धेसाठी आलेल्या पुरुष संघ, कुमार संघ आणि महिला संघ या महाराष्ट्राच्या तीनही संघाच्या खेळाडूंनी, त्यांच्या मार्गदर्शकांनी, सहाय्यकांनी आमच्या महाविद्यालयाला भेट दिली. त्यावेळीं विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ, प्राचार्य, प्राध्यापक यांनी त्यांचे स्वागत केले.

**अन्नासाठी दाही दिशा फिरविशी जगदीशा :-**

आपल्या महाराष्ट्राला सतत तिसऱ्या वर्षी दुष्काळाशी सामना करावा लागत आहे. ' शस्य श्यामलां मलयज् शीतलाम् ' अशा या भारत देशातील महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, म्हैसूर, राजस्थान हे प्रांत दुष्काळाने ग्रासले आहेत. दुष्काळी प्रदेशातील हाल आणि दुःख काय वर्णावे ? त्यांच्या दुःखाचा परिहार करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार व राज्य सरकार पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहेतच.

महाराष्ट्र राज्यात देखील पुणे, नगर, औरंगाबाद, नासिक, सांगली, कोल्हापूर आदी जिल्हे दुष्काळ-ग्रस्तांना कामे पुरवीत आहेत. त्यांच्या पोटाची भूक भागवीत आहेत. समाजाच्या सर्व थरातून सर्व प्रकारची मदत मिळविण्याचे सरकारकडून आणि अन्य संस्था-कडून कसोशीने प्रयत्न होत आहेत. समाजही आपल्या परीने आपल्या कर्तव्याचा वाटा उचलीत आहे. अन्ना-साठी दाही दिशा फिरणाऱ्या या दुष्काळग्रस्तांचे दुःख हलके करण्याचा प्रयत्न करीत आहे.

आज आपला देश एका विशिष्ट संक्रमणाच्या अवस्थेतून जात आहे. महाराष्ट्र राज्यापुरताच आपण विचार केला तरी, कामगारांच्या बोनसचा प्रश्न, महागाई, वीजकपात, एस्. टी ची दरवाढ, औद्योगिक उत्पादनातील घट, आदी विविध समस्या आज निर्माण झाल्या आहेत. धान्योत्पादनात आपण नुकतेच कुठे स्वयंपूर्ण होऊ लागलो होतो, तोच दुष्काळाच्या फटक्या-मुळे आम्हाला धान्याची आयात करावी लागत आहे. या सर्व समस्या महाराष्ट्र सरकार मोठ्या कुशलतेने हाताळीत आहे. विशेषत: दुष्काळाचा प्रश्न महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक व महाराष्ट्र शासन ज्या तन्मयतेने हाताळीत आहेत तो त्यांचा उल्लेखनीय विशेष मानावा लागेल. त्यांनी परिश्रम-पूर्वक महाराष्ट्राची बाजू केंद्रापुढे मांडली आणि केंद्रा-कडून आवश्यक ती मदत मिळविली आहे.

**ना. श्री. मोहन धारिया व ना. श्री. शरद पवार यांची महाविद्यालयास भेट :-**

दि. २४-२-७३ रोजी केंद्र सरकारचे योजना खात्याचे राज्य मंत्री ना. श्री. मोहन धारिया आणि महाराष्ट्र राज्याचे गृह, पुनर्वसन, क्रीडा, प्रसिद्धी, राजशिष्टाचार या खात्याचे राज्य मंत्री ना. श्री. शरद्चंद्र पवार यांनी आमच्या महाविद्यालयास भेट दिली.

प्राचार्य सनत्कुमार भोरे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी प्राचार्य आणि प्राध्यापकांच्या वतीने दुकाळग्रस्तांच्या निधीसाठी जमविलेला निधी रु. ८७८-६७ प्रा रघुनाथराव चाफेकर यांनी, विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाने स्नेहसंमेलन रद्द करून १००१ रुपयाचा निधी विद्यार्थ्यांच्या वतीने जनरल सेक्रेटरी श्री. दिलीप करे यांनी आणि सेवकवर्गाच्या वतीने जमविलेला निधी रु. १७४-२४ श्री. के. एस्. नेवसे यांनी ना. श्री. मोहन धारिया यांच्या हस्ते ना. श्री. शरद पवार यांच्या स्वाधीन महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याच्या दुष्काळनिवारण फंडात जमा करण्यासाठी दिला. असा एकूण रु. २०५३-९१ इतका निधी आम्ही मुख्यमत्र्यांच्या फंडात जमा करण्यासाठी दिला आहे.

**आमची पाण्याची समस्या**

विहीर :- महाराष्ट्र शासनाने पाणी टंचाई समस्या सोडविण्याच्या दृष्टीने जी धडक योजना हाती घेतली आहे. त्यातीलच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वतीने एक विहीर आम्हास मंजूर करण्यात आली आहे. तिच्या खोदाईचा मुहुर्त प्रांतसाहेब श्री. बुधवंत याच्या हस्ते झाला. तिच्या खोदाईचे काम वेगाने सुरू आहे. याचे श्रेय सर्वश्री. मा. नामदार शरद्चंद्र पवार, कमलाकर ढवाण पाटील, का. मा. आगवणे, प्रांतसाहेब श्री. बुधवंत, मामलेदार साहेब, श्री. धर्माधिकारी, प्रभारी मामलेदार श्री. पन्हाळे व श्री. बावरेसाहेब यांना आहे. तूर्त संस्थेच्या प्रांगणात एक विहीर आहे. परंतु यंदाच्या वर्षी पाणी टंचाई जाणवू लागली, आणि भविष्यकाळात या विहिरीद्वारा पाण्याची पूर्तता होणे अशक्य होईल अशी साधार भीती आम्हास वाटली व त्यादृष्टीने आम्ही शासनाला विनंती केली व त्याचें फल म्हणून आमच्या विहिरीची योजना मान्य करण्यात आली. त्याबद्दल आम्ही सर्वांचें ऋणी आहोत.

**नगरपालिकेचे दातृत्व**

बारामती ही कविवर्य मोरोपंतांची कर्मभूमी. त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात एखादे स्थायी स्वरूपाचे स्मारक असावे, त्याद्वारा विद्या व कला यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून आमच्या महाविद्यालयाने कविवर्य मोरोपंत वाद व वक्तृत्व स्पर्धेची एक योजना नगरपरिषदेकडे पाठविली. नगराध्यक्ष विनोदकुमार गुजर यांनी या योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन ती योजना कार्यान्वित करण्यासाठी नगरपरिषदेकडून पांच हजार रुपयांचे अनुदान देण्याचे मान्य केले आहे. या अनुदानातून कवि-वर्य मोरोपंतांच्या वाद व वक्तृत्व स्पर्धेसाठी एक करं-डक किंवा ढाल तयार केली जाईल. ती दरवर्षी विजेत्या संघाकडे फिरत राहील. आणि राहिलेल्या रकमेतून इतर पारितोषिके दिली जातील.

**आमचीं तालुका पंचायत समिती :**

यंदाची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थी जनांना कमीत कमी पुस्तकांची तरी मदत मिळावी म्हणून तालुका पंचायत समितीकडे मदतीची मागणी केली. आणि पंचायत समितीचे सभापति श्री. शिवाजी-राव भोसले व इतर सर्व सभासद तसेच बी. डी. ओ. श्री. रा. गो. सावंतसाहेब यांनी तत्परतेने दोन हजार रुपयांचे अनुदान मंजूर केले याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

**शिष्यवृत्या :**

श्री. पोपटलाल चंदनमल शिष्यवृत्ती, त्याच-प्रमाणे तुळजाराम चतुरचंद शिष्यवृत्ती प्रतिवर्षी सत्पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येते.

श्री. पुनमचंद लोहाडे, चार्टर्ड अकौन्टंट, पुणे यांनी प्रथमवर्ष वाणिज्य या परीक्षेत आमच्या महा-विद्यालयात प्रथम श्रेणीत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला ५१ रुपयांचे पारितोषिक जाहीर केले आहे. मात्र पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्याने याच महाविद्यालयात शिक्षण घेतले पाहिजे, तसेच तृतीय वर्ष वाणिज्य या परीक्षेत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या आणि याच महाविद्यालयात एम्. कॉम्. चे शिक्षण घेणाऱ्या विद्या-र्थ्यास ५१ रुपयांचे पारितोषिक जाहीर केले आहे. श्री. पुनमचंद लोहाडे यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**विविध विषयांच्या अध्यापनाची सोय :**

आमच्या महाविद्यालयात जून १९७२ पासून ' मिलीटरी स्टडीज् ' च्या अभ्यासक्रमाची सोय कर-ण्यात आली.

जून १९७३ पासून प्रायोगिक मानसशास्त्र हा विषय स्पेशल विषय म्हणून बी. ए. च्या वर्गाला शिकविण्याची सोय केली आहे. तसेच एस्. वाय्. बी. एस्सी. च्या विद्यार्थ्यांनाही हा विषय दुय्यम विषय म्हणून अभ्यासता येईल. एस्. वाय्. बी. ए. च्या वर्गासाठी दुय्यम विषय 'भूगोल' व 'शिक्षणशास्त्र' या विषयाच्या अध्यापनाची सोय करण्यात आली आहे. तसेच एम्.कॉम्. च्या विद्यार्थ्यांसाठी 'अॅडव्हान्स्ड अकौन्टंन्सी' या विषयाचे दोन पेपर तसेच 'बिझिनेस अॅडमिनिस्ट्रेशन' चे तीन पेपर ऐच्छिक म्हणून अभ्यासासाठी ठेवण्यात आले आहेत. याप्रमाणे अधिकाधिक आणि उपयुक्त विषयांच्या अध्यापनाची सोय उपलब्ध करून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

विद्यार्थ्यांच्या अध्यापनाबरोबरच त्यांच्या विविध कलागुणांच्या विकासाला वाव मिळावा म्हणून विविध विषयातील तज्ज्ञ आणि विद्वान व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केली जातात.

यु. जी. सी.ने दिलेल्या अनुदानातून आम्ही एक फिल्म प्रोजेक्टर खरेदी केला असून त्याद्वारा विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक चित्रपट दाखविले जातात.

**साहित्यिकांचा सन्मान:**

प्रजासत्ताक दिनाच्या मंगलप्रसंगी 'स्वामी' कार रणजित देसाई यांना पद्मश्री पदवी प्रदान करण्यात आली. तसेच पुणें विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख व प्रसिद्ध समीक्षक डॉ. रा. शं. वाळिंबे; डॉ. आर्. एन्. दांडेकर; पुणे विद्यापीठ, मुंबईच्या एस्. एन्. डी. टी. विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. स. गं. मालशे, प्रा. वसंत बापट यांची साहित्य अकादमीकर निवड झाली. तर सुप्रसिद्ध कवी व नामवंत प्राध्यापक डॉ. वि. म. कुलकर्णी यांना राज्य पुरस्कार प्राप्त झाला नुकतीच डॉ. रा. शं. वाळिंबे यांची महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून अविरोध निवड झाली याबद्दल या सर्व मान्यवरांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो.

**स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे:**

भारताला स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली. यावर्षी आपण आपल्या स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सव साजरा करीत आहोत. या २५ वर्षांच्या काळात भारताला अनेक संकट परंपरेतून जावे लागले. १९६२, १९६५ आणि १९७१ या काळात भारताला परचक्राशी झुंज द्यावी लागली, परंतु भारताने मोठ्या धैर्याने आणि संयमाने या पाशवी हल्ल्यांचा निःपात केला एवढेच नव्हे तर १९७१ साली पाकिस्तानच्या पाशवी अत्याचाराला बळी पडणाऱ्या पश्चिम बंगालला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून दिले. भारताचे स्वतंत्र बांगला देशाच्या निर्मितीचे कार्य जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या दृष्टीनेच भारताने आतापर्यन्तची प्रगतीची वाटचाल केली आहे. शांततेचा पुरस्कार आणि मानवतावादी दृष्टिकोन नेहमीच स्वीकारला आहे. व त्याचेच फलित म्हणून आज व्हिएतनामच्या युद्धाचाही शेवट झाला आहे. पण ही शांतता कायम स्वरूपाची ठेवणे, ती टिकविणे हे अमेरिकेसारख्या राष्ट्राच्या हाती आहे. आज तरी शांतता निर्मितीची चिन्हे दिसत आहेत पुढचे भविष्यकाळच ठरविणार आहे.

याशिवाय भारताला अवर्षण अतिवर्षण, रोगराई आदिसारख्या संकटांचाही मुकाबला करावा लागत आहे. परंतु त्यातही आम्ही यशस्वीपणे या संकटांवर मात केली आहे.

औद्योगिक क्षेत्रात, वैज्ञानिक क्षेत्रात, अन्नधान्याच्या प्रश्नात आम्ही स्वयंपूर्ण होण्याचे अविरत प्रयत्न करीत आहोत. राष्ट्राला स्वास्थ्य मिळाले तर या सर्वच क्षेत्रात आम्ही नेत्रदीपक प्रगती करू असा विश्वास आहे. संक्रमणावस्थेत प्रगतीचा मार्ग आक्रमण करणाऱ्या लोकशाहीवादी राष्ट्राला लोकशाही समाजवादाचा पल्ला गाठताना अशा अवस्थेतून जावे लागतेच. लोकशाही समाजवादाच्या मार्गाने ही गोष्ट संथपणे का असा होईना, साध्य झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास वाटतो. आपल्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कुशल आणि खंबीर नेतृत्वाने आम्ही लोकशाही समाजवादाचे ध्येय निश्चित गाठू यात संदेह नाही.




**ऋणनिर्देश:**

महाविद्यालयाच्या नियतकालिकाची जबाबदारी ही एक फार महत्त्वाची बाब आहे. या वर्षी ही जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. या अंकाची उभारणी करतांना त्याला नेटका आणि सुंदर आकार देतांना या कामी मला माझ्या सर्व सहकारी प्राध्यापकांचे आणि महाविद्यालयाच्या कार्यालयातील लेखनिकांचे सर्व प्रकारचे उत्तम सहकार्य मिळाले. परंतु त्यातही आमचे प्राचार्य श्री. सनत्कुमार भोरे, प्रा. डॉ जे. के. गोधा, प्रा. बी. बी. पाटील, प्रा. रघुनाथराव चाफेकर प्रा. शरद नवाथे यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनाचा आणि सक्रिय सहकार्याचा मी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो. त्यांचा मी सदैवी ऋणी राहीन. त्यांच्या सहकार्याशिवाय ही जबाबदारी नेटकेपणाने पार पाडणे केवळ अशक्य होते. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला आनंद आहे, भूषण आहे.

याशिवाय संपादक मंडळातील माझे मित्र प्रा.डॉ. सुर्वे, प्रा. लोंढे, प्रा. नायगावकर, प्रा. बकील, प्रा. शेटी, प्रा. शरद कुलकर्णी यांनीही सर्वतोपरी सर्व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

नियतकालिक विभागाचे विद्यार्थी-प्रतिनिधी श्री. मुकुंद टाकसाळे यांनी तर साहित्य मिळविण्यापासून जाहिराती मिळविण्यापर्यंत सर्वच बाबतीत उत्साहाने काम केले.

विद्यार्थी बंधु-भगिनींनी साहित्याचा विपुल पुरवठा केला. जाहिरातदारांनी आम्हाला जाहिराती देऊन आमच्यावरील लोभ कायम ठेवला. नियतकालिकाची छपाई वेळेवर करून दिल्याबद्दल ज्योती प्रिंटिंग प्रेसचे श्री. शहा बंधु, सुंदर मुखपृष्ठ, ब्लॉकची उत्तम निर्मिती व सुंदर छपाई करून दिल्याबद्दल पुण्याचे व्ही. जोशी या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. या सर्वांनी आमच्यावर असाच लोभ ठेवावा ही विनंती.

**उणीवांची जाणीव:**

या नियतकालिकाची उभारणी नेटकी व निर्दोष व्हावी या दृष्टीने आम्ही सर्वतोपरी काळजी घेतलीच आहे. तरी सुद्धा अनवधानाने त्यात काही उणीवा असल्याची जाणीव आम्हाला आहे. तरी विनंती की आमच्या रसिक वाचकांनी क्षमाशीलतेनें आणि सहृदयतेने या उणीवांकडे पहावे. शेवटी एकच प्रार्थना...

'न्यून ते पुरते। अधिक ते सरते।
करूनि घेआवे तुमतें। विनवितु असे॥'

— ज्ञानेश्वरी

आपला,

**प्रा. दयाराम पाटील,**
प्रमुख संपादक



# : दुष्काळाचे आव्हान :

स्वातंत्र्योत्तर भारताला समस्यांवर स्वार होऊन कालक्रमणा करावी लागावी
यामध्ये नियतीचा निश्चित काही हेतु असावा असे मला नेहमी वाटते. या समस्या
निरनिराळ्या काळात वेगवेगळी रूपे धारण करून देशासमोर उभ्या ठाकल्या आणि
त्या प्रत्येक वेळी देशाला किंमत मोजावी लागली आहे. समाधान एकच मानावे
लागते की, यातील प्रत्येक समस्या ओलांडून भारताने प्रगतीचे एक नवे पाऊल
पुढेच टाकले आहे. संकट, मग ते आक्रमणाचे असो, अंतर्गत तेढीचे असो, राष्ट्रीय
एकात्मतेला आव्हान देणारे असो, पुराचे असो किंवा अवर्षणाचे-वा दुष्काळाचे असो
यातील प्रत्येकाने भारतीय राज्यकर्त्यांना नवा दृष्टिकोन मिळवून दिला आहे.
प्रगतीसाठी नवा अनुभव देशाने गाठी बांधला आहे.

भारत हा शेतीप्रधान देश आहे असे येथे परंपरागत समजले जाते, म्हटले
जाते. सुजलाम्, सुफलाम् अशी ही भूमि सुवर्णभूमि म्हणून मानली गेली. इतिहासात
हा वारसाच नोंदवला गेला. पण ही शद्बांकित सुवर्णभूमि खऱ्या अर्थाने सुजलाम्,
सुफलाम् बनवण्याचे व इतिहासाचा वारसा टिकविण्याचे नवे आव्हान या वर्षीच्या
दुष्काळाने देशासमोर नव्या स्वरूपात उभे केले आहे. या वर्षीच्या दुष्काळाने भार-
तीय शेतीचे नवे प्रश्न जनमानसासमोर आले आहेत. भारतातल्या शेतीव्यवस्थेतील
कच्चे आणि कमकुवत दुवे कोणते, शेती-अर्थव्यवस्था सुस्थिर पायावर उभी करण्या-
साठी नेमके काय करावे याचा सखोल विचार केलाच पाहिजे असे या दुष्काळाचे
आव्हान आहे.

दुष्काळाचे संकट उभे राहताच पहिली प्रतिक्रिया जी उमटली ती 'भारता-
च्या शेती क्षेत्रात प्रगतीच झाली नाही' अशी उमटली. पण हा समज म्हणजे गैर-
समज आहे असे मी हिशेबाने म्हणू शकतो. किंबहुना 'काही घडलेच नाही' हा
दृष्टिकोन एकांगीच म्हणावा लागेल. शेती अर्थ-व्यवस्थेत काही दोषही असू शकतील
पण हे दोष दूर करण्यासाठी योग्य मूल्यमापन करावे लागेल आणि या संदर्भात
आस्तीपक्ष आणि नास्तीपक्ष विचारात घ्यावा लागेल.

**ना. श्री. अण्णासाहेब शिंदे**
केंद्रीय कृषी राज्य मंत्री
श्री. रामभाऊ जोशी यांना दिलेल्या
मुलाखतीतून
सह्याद्रि - मार्च १९७३

# महाविद्यालयाच्या परिसरात

## महाविद्यालयाचा वर्धापनदिन २३ जून १९७२

महाविद्यालयाचा वर्धापनदिन छत्रपति सहकारी साखर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दिनकरराव
उर्फ अप्पासाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. त्याच वेळी पुणे जिल्हा परिषदेवर
निवडून आलेले सभासद सर्वश्री. शिवाजीराव ताकवणे, कमलाकर पाटील, का. मा. आगवणे; धुळे यांचा
महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## प्राचार्य डॉ. अक्कोळे यांचा सत्कार व भावपूर्ण निरोप.

प्राचार्य डॉ. अक्कोळे प्राचार्यपदाची सूत्रे सोडली आणि ते संस्थेच्या जयसिंगपूर येथील कॉलेजात मराठी
विभागाचे प्रमुख म्हणून गेले. त्या निमित्त त्यांचा कॉलेजचे विद्यार्थी प्राध्यापक-कर्मचारी यांच्यावतीने
दि. ४ जुलै १९७२ रोजी जयसिंगपूर कॉलेजचे प्राचार्य आ. सी. मुळे यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात
आला त्यावेळी प्राचार्य भोरे, डॉ. जे. के. गोधा, प्रा. दयाराम पाटील, डॉ सुर्वे, प्रा. संगई. डॉ. वर्धमान
कोठारी, श्री. माणिकलाल वाघोलीकर, विद्यार्थ्यांपैकी सर्वश्री मुकुंद टाकसाळे, सुभाष सावंत, अशोक
ललगुणकर, गोसावी, प्रभुणे वकील माजी विद्यार्थी यांची डॉ. अक्कोळे यांच्या गौरवपर भाषणे झाली. प्राचार्य
सनतकुमार भोरे यांनी डॉ. अक्कोळे यांना पुष्पहार आणि गुच्छ अर्पण करून त्यांचा सत्कार केला.

## प्राचार्य डॉ. एम्. एस्. गोसावी बी. वाय्. के कॉलेज ऑफ कॉमर्स नाशिक,

यांनी दि. ५।९।७२ ला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात आजचा विद्यार्थी आणि
शिक्षण या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले ते आपल्या भाषणात म्हणाले.

' जीवन समर्थपणे जगण्यासाठी विद्यार्थी शिक्षण घेतो. शिक्षणाची पूर्तता झाल्यावर तो जगात येतो. व

कोणत्याहि नोकरीत किंवा व्यवसायात तो तेव्हाच यशस्वी होतो जर निवडलेला व्यवसाय किंवा स्वीकार-
लेली नोकरी तो उत्तम प्रकारे करीत असेल तर !

अन्यथा त्यात त्याला यश मिळणार नाही. हे कसब, ही कुशलता शिक्षणाच्या द्वारा प्राप्त होणे आवश्यक
आहे. आजचा विद्यार्थी त्या दृष्टीने कमकुवत आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी बदलत्या परिस्थितीचा विचार करून
या स्पर्धेच्या जगात यशस्वी होण्यासाठी डोळसपणे ज्ञानसाधना करणे आवश्यक आहे.

आपल्या देशाला अजून प्रगतीचा फार मोठा पल्ला गाठायचा आहे. तेव्हा ही प्रगती साधण्यासाठी
आपणही प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत जपान या छोट्याशा राष्ट्राने केलेली प्रगती मोठी कौतुकास्पद आहे
तेव्हा आपणही सामुदायिक हिताची व कल्याणाची दृष्टी बाळगून प्रयत्न केला पाहिजे. कार्यरत झाले पाहिजे;
राष्ट्रीय भावनेचे संवर्धन करून राष्ट्राला मोठे केले पाहिजे. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त गोष्टी करणे
वेळेचे संयोजन करणे महत्त्वाचे आहे. मानवाच्या व्यक्तिगततेला मर्यादा पडतात पण सामुदायिकतेत त्याचे
सामर्थ्य वाढते. या सामुदायिक कार्यक्षमतेचा जपानने अंगीकार केला म्हणून ते राष्ट्र अल्पावधीत संपन्न झाले
म्हणून आपणही संघटितरित्या कार्य करण्याचे महत्त्व लक्षात घेऊन त्या प्रमाणे प्रयत्नशील राहिले पाहिजे.
स्वातंत्र्याच्या काळात आपल्याला पुढे येण्याची संधी आपणास मिळाली आहे ह्या संधीचा आपण फायदा
करून घेणे आवश्यक आहे. आणि या साऱ्या गोष्टी विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार, चारित्र्य या द्वारा आपल्या
व्यक्तित्वाचा विकास करून साध्य केल्या पाहिजेत.

**श्री. पं. धन्यकुमार भोरे**

विद्यार्थी युवकांना उद्देशून श्री. पं. धन्यकुमार भोरे यांनी प्रारंभी भारतीय संस्कृतीचे माहात्म्य विशद केले
आणि तिचे अधिष्ठान धार्मिकतेत कसे आहे याचे सोदाहरण विवेचन केले. व हेच तिचे मोठेपण आहे थोरवी
आहे, याचे विवेचन करून ते म्हणाले; "आजच्या विद्यार्थ्यांपुढे धार्मिकतेचा अभाव निर्माण झाला आहे. पण
त्याची जागा अजून कोणत्याही निष्ठेने किंवा श्रद्धेने घेतलेली नाही त्यामुळे विद्यार्थी युवकांचा दुर्दम्य उत्साह
दिशाहीन झालेला आहे. त्यांच्यापुढे निश्चित ध्येयाचा अभाव आहे.

तेव्हा आजच्या विद्यार्थी युवकांनी संयमहीन जीवनाचा त्याग करून प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करण्याची
जिद्द मनी बाळगली पाहिजे. एकाग्रतेच्या बळावर यश प्राप्ती होते याची जाणीव ठेवली पाहिजे. आणि
अध्यात्मिक मूल्याची जोपासना केली पाहिजे.

**श्री. राहुलकुमार बजाज,** मॅनेजिंग डायरेक्टर, 'बजाज ऑटो' पुणे.



दिनांक १७ डिसेंबर ७२ रोजी श्री. राहुलकुमार
बजाज यांनी कॉलेजला भेट दिली. त्यावेळी त्यांनी
विद्याप्रतिष्ठानच्या वतीने सुरू केलेल्या दुष्काळग्रस्त
विद्यार्थ्यांच्या भोजनव्यवस्थेची पाहणी केली आणि कॉले-
जच्या विविध भागांना भेट देऊन कॉलेजने केलेल्या
प्रगतीची प्रशंसा केली.

नंतर प्राचार्य भोरे यांच्या अध्यक्षतेखाली प्रश्नो-
त्तराचा चर्चात्मक कार्यक्रम झाला. यावेळी श्री. राहुल-
कुमार बजाज याना विद्यार्थी व प्राध्यापकांनी कामगार
कल्याण योजना, उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, बेकारी-
निवारण आणि त्यादृष्टीने आजच्या शिक्षणाचे स्वरूप,
बोनसचा प्रश्न, उत्पन्नावरील मर्यादा, कामगारांचे प्रति-
निधित्व, औद्योगिक क्षेत्रातील कलहांची कारणें, काम-
गार संघटना आदि औद्योगिक क्षेत्रातील समस्यांवर प्रश्न विचारले. श्री. राहुलकुमार यांनी सर्व प्रश्नांचा
चोखंदळ व अभ्यासपूर्ण उहापोह केला. हा कार्यक्रम मनोरंजक तर झालाच, पण औद्योगिक क्षेत्रातील विविध
समस्याची माहितीही श्रोत्याना मिळाली.

सुरूवातीला प्राचार्य सनत्कुमार भोरे यांनी त्यांचे स्वागत करून त्यांचा परिचय करून दिला. शेवटी
विद्यार्थी प्रतिनिधींनी दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी जमा केलेला निधी जनरल सेक्रेटरी श्री. दिलीप
करे यांनी श्री. राहुलकुमार यांच्या हस्ते प्राचार्य सनत्कुमार भोरे यांच्या स्वाधीन केला.

**पद्मभूषण डॉ. मोदी यांची भेट**



बारामती शहराची होमगार्ड संस्था ही मोठी
कार्यक्षम अशी संस्था आहे. या संस्थेने जनहितासाठी
अनेक कार्यक्रम यशस्वीपणे कार्यान्वित केले आहेत.
विशेषतः डॉ. मोदी यांचे नेत्रदान शिबिर यशस्वी
रितीने आयोजित करण्यातले त्यांचे कौशल्य मोठे
कौतुकास्पद आहे या वर्षी देखील जिल्हा कमांडट
श्री. एम्. एन्. संगमनेरकर, श्री. जिवराज कोठारी,
श्री. मोतीलाल शहा (वाघोलीकर) डॉ. वर्धमान
कोठारी, श्री. जोगळेकर यांनी नेत्रदान शिबिराचे आयो-
जन केले होते. व त्यामुळेच डॉ. मोदी यांच्या
भेटीचा योग आम्हाला प्राप्त झाला आणि एका विचार
प्रवर्तक व्याख्यानाची मेजवानीही आमच्या विद्यार्थ्यांना
मिळाली. नगराध्यक्ष विनोदकुमार गुजर अध्यक्षस्थानी
होते. यावेळी केलेल्या भाषणात डॉ. मोदी म्हणाले;

“ मी जगाच्या पाठीवर प्रवास केला आहे. आणि या अनुभवावरून मी सांगतो की, बारामती नगराला लाभलेले आजचे तरुण नेतृत्व बारामतीचा कायापालट करीत आहे. बारामती नगरातील लोक समाजसेवे साठी आसुसलेले आहेत. मानवाच्या सेवेतही देवाची सेवा आहे असे मानणारे ते आहेत. आणि म्हणून त्यांची हाक ऐकल्याबरोबर मी येथे धावत येतो.

येथील नेत्रदान शिबिराचा श्री गणेशा महाविद्यालयाच्या याच वास्तूत झाला. येथेच मी अनेक ऑप- रेशन्स केली. अनेकांना दृष्टी दिली. मी या वास्तुला प्रणाम करतो. मी फक्त एकच काम उत्तम प्रकारे करु शकतो आणि ते म्हणजे डोळ्याचे ऑपरेशन, या कामात मी इतका तन्मय होऊन जातो की; हेच काम सतत करीत राहावे असे मला वाटते. हे काम यशस्वी रितीने करता यावे म्हणून मी परमेश्वराला प्रार्थना करीन की माझा देह गेला तरी चालेल पण ही बोटे जाऊ नयेत. अंधाना दृष्टी देण्याचे काम मी रात्रंदिन करीत राहीन.

आपले काम तन्मयतेने व उत्तम प्रकारे करण्याचे प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावेत. आमच्या सारखी माणसे आता परनिर्वाणाच्या मार्गाला लागली आहेत तुम्ही विद्यार्थी गमनाच्या मार्गावर आहात. तुमच्यावर सर्व जबाबदारी आतां आम्ही सोपविणार आहोत. तेव्हा आजची पिढी, आजचा विद्यार्थी किती कर्तव्य तत्पर आहे याचा विचार करणे आवश्यक आहे.

सध्याचे विद्यार्थीविश्व तापलेले आहे. विद्यार्थ्यांना विध्वंसककृत्ये करण्यात समाधान वाटते. परंतु विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवावे की; त्यांना मिळणारे शिक्षण हे जनतेच्या पैशावर होत असते. म्हणजे पर्यायानें ते ज्यांचा नाश करतात. विध्वस करतात; त्यात त्यांचीच हानी असते. विध्वंसाने विद्यार्थी काय मिळवितात?

शिक्षण घेणारे सुजान म्हणून ज्यांच्याकडे पाहता येते तेच जर असा विध्वंस करू लागले तर त्यांच्या शिक्षण घेण्याला, त्यांना विद्यार्थी म्हणवून घेण्याला काय अर्थ आहे. बऱ्याच वेळा दुसरे कोणी मुठभर लोक हुल्लड करतात. म्हणून आपणही तसे करावे ही प्रवृती वळावते. व विद्यार्थी तसे करतात. पण तसे करू नये. विवेकाचा लगाम आपल्या वृत्तोला लावावा. आणि विद्यार्थ्यांनो ज्ञान संपादनावर लक्ष केंद्रित करावे. विद्या हे असे धन आहे की ते दिल्याने वाढते. त्याच्यावर कोणताहि कर लादता येत नाही त्याची चोरी करता येत नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन हे आपले प्रथम कर्तव्य मानावे ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात फार फार बदल झाले आहेत ते समजून घ्यावे. त्यात केवळ अनुकरण न करता आपलेहि काही असेल ते मिळवावे. आणि आपल्या ज्ञानाचा आपल्या देशाच्या उद्धारासाठी उपयोग करावा.

सन १९४३ साली डोळ्यांच्या ऑपरेशनची जी पद्धती होती ती आज राहिली नाही. त्यात आमुलाग्र बदल झाला आहे. तेव्हा त्यात आपल्या देशाला मानवेल, पेलवेल अशा पद्धतीने काम करण्याची तयारी ठेवली पाहिजे. परिस्थितीशी आपण सर्वांनीच जमवून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

त्यानुसारच मी डोळ्यांची ऑपरेशन्स करत आहे. आणि झोपडीमध्ये टेन्टस्मध्ये केलेली ऑपरेशन्स यशस्वी झाली आहेत. अद्यायवत् इस्पितळातहि मिळणार नाहीत असे रिझल्टस् त्यात मिळाले आहेत. याचे कारण जे करायचे आहे ते तन्मयतेने करावे म्हणजे त्याचे फळ उत्तम मिळते. सर्वच बाबतीत हा नियम लागू पडतो.

मी या जगातील विन तिकीटाचा प्रवासी आहे. परमेश्वराने मला नेत्रांच्या ऑपरेशनसाठी उत्तम हात दिले आहेत. युवतीची बोटे दिली आहेत. गरुड दृष्टी दिली आहे, मातृवात्सल्य दिले आहे, सिंहसदृश अंतःकरण दिले आहे, हे सारे मला प्राप्त झाले आहे मी माझे कर्तव्य चोख बजावित आहे. मी एक नामधारी व्यक्ती आहे. सारी सूत्रे देवा हाती आहेत. त्याने दिलेल्या कलेचा मी जनसेवेसाठी उपयोग करीत आहे, जगाच्या कल्याणा साठी झटणाऱ्या वारकऱ्यांच्या मेळाव्यातील मी एक वारकरी आहे; भक्त आहे.

आपला भारत देश महान् आहे, मी जग पर्यटन केले पण भारतासारखा सुंदर देश मला कोणताच वाटला नाही. ‘ दुर्लभं भारते जन्म ’ म्हणतात ते अगदी खरे आहे.

असा हा आपला देश सुखी संपन्न व्हावा म्हणून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. हे जग सर्वांचे आहे. ते कोणा एकट्याचे नाही. प्रत्येक मनुष्य हा या जगाचा यात्रेकरु आहे.

आज असे दिसते की भारताचे तात्त्विक विचार, आध्यात्मिक विचार लयाला जात आहेत आणि केवळ अनुकरणातून निर्माण झालेली कृत्रिमता अस्तित्वात येऊ लागली आहे.

तेव्हा अशा परिस्थितीत आपल्या देशाच्या वैभवशाली परंपरेचे जतन आजच्या पिढीने केले पाहिजे. या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या हातून भारताची महान् सेवा घडो. हे विद्यार्थी महान् होवोत. आणि परमे- श्वराला मी प्रार्थना करतो की; ‘ तमसो मा ज्योतिर्गमय ’ अंधकाराचा नाश होवो आणि तुमच्या जीवनात सर्वत्र ज्ञानाचा प्रकाश निर्माण होवो डॉ. मोदी यांचे व्याख्यान म्हणजे मानवतावादी दृष्टीकोनाचा आविष्कार होता. याच वेळी वालचंदनगर येथील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ‘ फनफेअर ’ च्या कार्यक्रमात दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी जमविलेले रुपये १०११ श्री. बद्रिनाथ मूर्ति यांनी डॉ. मोदी यांच्या हस्ते प्राचार्यच्या स्वाधीन केले.

डॉ. मोदी यांनी केलेली जनसेवा ही राष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविली जाईल असे उद्गार अध्यक्ष विनोदकुमार गुजर यांनी काढले.

## प्राचार्य एस् डी. पाटील, श्री. सद्गुरु गंगागीर महाराज कॉलेज; कोपरगाव

आमच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील विविध विषयांची माहिती मिळावी वैज्ञानिक प्रगतीचा आलेख त्याना समजावा म्हणून विज्ञानमंडळ चालविले जाते. या वर्षी या मंडळाचे उद्घाटन प्राचार्य एम्. डी. पाटील श्री. सद्गुरु गंगागीर महाराज कॉलेज, कोपरगांव यांच्या हस्ते झाले. त्यांनी आजच्या युगा- तील विज्ञानाचे महत्त्व विशद केले. आणि विज्ञानाने आतां फार मोठी प्रगती केली असून त्याच्या साहाय्याने मानव चांद्रयानाच्या द्वारा पृथ्वीवरुन चंद्रावर आणि चंद्रावरुन पृथ्वीवर उतरला आहे. मानवाने केलेली ही प्रगती गौरवास्पद आहे. भौतिक प्रगतीची ही वेगवान वाटचाल विज्ञानाच्या स्थंडिलावर उभी आहे. आजच्या युगात विद्यार्थ्याला तो कोणत्याही शाखेचा अभ्यास करणारा असो. विज्ञानाच्या साहाय्याने मानवाने केलेल्या महान् पराक्रमाची दखल घेणे आवश्यक ठरले आहे. विज्ञानातील विविध क्षेत्रात होणारी प्रगती ही नेत्रदीपक आहे. त्याचा डोळसपणे अभ्यास करून आपली ज्ञानसाधना आजच्या विद्यार्थ्यांनी केली, तर ते खरे राष्ट्रसेवक बनतील आणि राष्ट्राला वैज्ञानिक क्षेत्रात वैभवाच्या क्षितीजावर नेतील. यास्तव विद्यार्थ्यांनी विशेषतः विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानाच्या विविध शाखांचा परिचय करून घेतला पाहिजे.

## प्राचार्य डॉ. आर् जी. चौधरी कॉलेज ऑफ एज्युकेशन खिरोदा

विद्यार्थी विश्वासंबंधी–प्राचार्य चौधरी यांनी मार्मिक विचार मांडले. ते आपल्या भाषणात म्हणाले; आजचे विद्यार्थी अशांत आहेत असे म्हटले जाते. पण सूक्ष्म दृष्टीने त्यांचे निरीक्षण केले असता असे दिसते की तो केवळ अशांत नाही तर तो चैतन्याने मुसमुसलेला आहे. त्याला बदल हवा आहे. प्रस्थापिता विरुद्ध बंड करण्याची त्याची मनिषा आहे. पण महत्त्वाचा प्रश्न हा आहे की; ही बंडखोरी तो कशा विरुद्ध करीत आहे ?

या पूर्वी ज्ञानदेव, सिद्धार्थ यांनी अशीच प्रस्तापिता विरुद्ध बंडखोरी केली. याचा अर्थ असा की केवळ जुन्याचा नाश करण्याचाच या बंडखोरीचा हेतु नाही तर त्या बंडखोरी मागे काही विचारधारा आहे, प्रणाली आहे, निष्ठा आहे. म्हणजे बंडखोरीला काही तरी निष्ठा प्रणाली आवश्यक असते. आजच्या विद्यार्थ्यांनी याचा विचार करणे अवश्यक आहे.

आंजच्या विद्यार्थ्यांची मन:स्थिती महाभारतातील भ्रांतचित्त अर्जुनासारखी झाली आहे. अर्जुनाने आपल्या तत्त्वज्ञानाचे मिथ्या समर्थन केले. ( Ratinalisation ) आजचा विद्यार्थीही आपल्या विवेकहीन बंडखोरीचे मिथ्या समर्थन करीत आहे की काय किंवा प्राप्त परिस्थितीशी समतोल समायोजन करण्या–ऐवजी त्यापासून पलायनवादी बनतो आहे काय अशी शंका येते कोणत्याहि परिवर्तनाला विवेकाचे अधिष्ठान असावे लागते. असे नाही कां वाटत ? विद्यार्थी हा राष्ट्र घडणीच्या कामी उपयोगी पडणारा महत्त्वाचा घटक आहे. त्याला त्यास्तव कसा प्रवृत्त करता येईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आज आपल्या देशाला निकड आहे ती या देशामध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही समाजवादाची प्रस्थापना करण्याचा ! ती अंमलात आणण्याची

वस्तुत: लोकशाही आणि समाजवाद ही दोन टोके आहेत. यादोहोंचा समन्वय घालणे आवश्यक आहे. आणि ही गोष्ट विवेकनिष्ठ पिढीलाच शक्य आहे.

बरट्रॅंडरसेल सारखा व्यवितवादी आणि मार्क्स सारखा समाजवादी तत्त्वज्ञानी सुद्धा आपापल्या तत्वज्ञानाचा एकांतिक पुरस्कार करतांना आढळतात.

आपल्याला जर खऱ्या अर्थाने लोकशाही समाजवादाची प्रस्थापना करायची असेल तर सत्य परिस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे.

'Truth is the expression of Reality' सत्य हे वास्तविकतेचा आविष्कार असते. याला अनुसरून आपल्यापुढे प्रामुख्याने प्रश्न उभा राहतो तो हा की, आपल्याला योग्य नागरीक बनावयाचे आहे की व्यक्ति म्हणूनच जगावयाचे आहे? कारण व्यक्ति वादात फक्त हक्कच महत्वाचे ठरतात, जबाबदाऱ्या नव्हेत तर नागरिकत्वात हक्क, जबाबदाऱ्या आणि कर्तव्य यांचा समन्वय असतो. नागरिकत्व म्हणजेच सामाजिकता व व्यक्तिवाद म्हणजेच लोकशाही. या दोहोंचा समन्वय साधणे ही आज महत्वाची गरज आहे, निकड आहे.

यास्तव विद्यार्थ्यांचे चैतन्य जर विवेकाच्या मार्गाने कार्यरत झाले तर भारतात वर्गविहीन लोकशाहीनिष्ठ नवीनच पिढी निर्माण होईल.

## प्रा. डॉ. मु. श्री. कानडे - मराठी विभाग, पुणे विद्यापीठ

प्रा. डॉ. कानडे यांनी आमच्या महाविद्यालयास भेट देऊन 'आचार्य अत्रे यांचे साहित्य' या विषयावर अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले.

आपल्या भाषणात त्यांनी आचार्य अत्रे यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे सुंदर दर्शन घडविले. अनुभवाला शब्दरूप देण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी होते. दु:खिताचे दु:ख ते समजून घेत. फुलावर कविता करीत. मुलावर कविता करीत. सर्वांना हसवीत, रिझवीत. जीवनाच्या विविध क्षेत्राचे त्यांनी निरीक्षण केले होते आणि त्याचा सुंदर आविष्कार त्यांच्या वाङ्मयात झालेला आपणास दिसतो. त्यांची सुप्त विडंबन शक्ती उफाळून आली व त्यांनी 'झेंडूची फुले' या काव्यसंग्रहाद्वारे विडंबन कविता मराठी काव्यात सुंदरपणे साकार केली. अजूनही ही फुले ताजी व टवटवीत वाटतात.

नाटककार आचार्य अत्रे याविषयी बोलताना ते म्हणाले, 'चांगले नाटक लिहावे, नटांनी बसवावे लोकांनी पहावे या उद्देशाने त्यांनी गुरुदक्षिणा, वीरवचन ही नाटके लिहिली व ती अतिशय लोकप्रिय झाली. समाजजीवनातील अनेक वैशिष्टचे, गुणदोष त्यांनी नाटकाद्वारे रंगभूमीवर आणले. त्यांचे साष्टांग नमस्कार, घराबाहेर, भ्रमाचा भोपळा, उद्याचा संसार, मी उभा आहे, पराचा कावळा, डॉ. लागू, तो मी नव्हेच इत्यादि नाटके याची साक्ष देतात. सर्वसामान्य व्यवहारात बोलली जाणारी भाषा त्यांनी आपल्या नाटकातील पात्रांच्या तोंडी घातली त्यामुळे ती नाटके जिवंत वाटतात. त्यांच्या आत्मचरित्रपर लेखनात त्यांचे व्यक्तिमत्व प्रभावी–पणें साकार झालेले दिसते. रंगभूमीच्या उतरत्या काळात तिला नवचैतन्य प्राप्त करून देणारा, आपल्या काव्याद्वारे रसिकांचे मनोरंजन करणारा, आपल्या चरित्राने इतरांना स्फूर्ती देणारा आचार्य अत्रे यांच्यासारखा साहित्यिक विरळाच !'

## प्रा. डॉ. प्र. चि. शेजवलकर - उप प्राचार्य बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स. पुणे आणि संचालक एम्. बी. ए. पुणे विद्यापीठ



"राष्ट्राच्या निर्मितीत विद्यार्थ्यांचे स्थान महत्त्वाचे आहे"

आमच्या विद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या निमिताने डॉ. शेजवलकर यांचे आजच्या विद्यार्थी जगताविषयीचे मौलिक विचार ऐकावयास मिळाले. ते आपल्या भाषणात म्हणाले–

'कालमान, परिस्थितीनुसार आजच्या विद्यार्थी जगताचेहि चित्र बदलले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आम्ही बऱ्याच नव्या परंपरा निर्माण केल्या. या नव्या निर्मितीमध्ये आजच्या विद्यार्थ्यांचा देखील फार मोठा वाटा विधायक कार्यात आहे परंतु आजच्या या बदलत्या काळात त्यांच्या आकांक्षेनरुप त्याला अग्रस्थान मिळत नाही. हे स्थान त्याला मिळणे आवश्यक आहे.

आजचा विद्यार्थी स्वाभिमानी, जिद्दी आणि तळमळीने काम करणारा आहे. मात्र त्याला योग्य ते चांगले मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

संकटाच्या काळी आजचा हा तरुण विद्यार्थी जीवाची तमा न बाळगता कर्तव्याच्या कामात उडी टाकतो हे अनेक उदाहरणांनी सिद्ध करता येईल. बारामतीच्या जिनिंग फॅक्टरीला लागलेल्या आगीच्यावेळी येथील विद्यार्थ्यांनी केलेले कार्य गौरवास्पद मानावे लागेल.

संस्था चालक, प्राचार्य, प्राध्यापक या बरोबरच संस्था चालविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीही असते. आपल्या महाविद्यालयाला शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठेपण प्राप्त करून देणे हे विद्यार्थ्यांच्या हाती असते. ती कर्तव्याची जाणीव आजच्या विद्यार्थ्यांत आहे म्हणूनच वास्तविक आजच्या पिढीविषयी काळजी करण्याचे कारण नाही. आज विज्ञान युगात सर्वच क्षेत्रात वेगाने परिवर्तने घडत आहेत. या परिवर्तनाचा परिणाम मानवी जीवनावर झाला आहे. या बदलत्या परिस्थितीनुरुप विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोभूमिकेत बदल घडविणे आवश्यक आहे. आपण कुटुंबाला, समाजाला, देशाला भारभूत न होता त्यांना पोषक कसे होऊ यादृष्टीने त्यांनी हा बदल घडवून आणणे आवश्यक आहे. आणि त्यादृष्टीने आजच्या विद्यार्थ्यांनी दुसऱ्याच्या मदतीशिवाय योग्य तो निर्णय घेऊन काम करण्याची पात्रता अंगी निर्माण केली पाहिजे. ही पात्रता त्याच्या अंगी आली की तो सर्व क्षेत्रात स्वावलंबी होऊ शकेल. यादृष्टीने आजच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्याच्या इतिहासाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या काळात आमच्या विद्यार्थ्यांनी जे केले तसे काहीतरी भव्य दिव्य करण्याची प्रेरणा आपणास मिळेल. स्वातंत्र्याच्या इतिहासाच्या अभ्यासाने आपली मान ताठ होईल. एकीकडे आपण खूप प्रगती करीत आहोत पण त्याबरोबरच अनेक समस्या निर्माण होत आहेत. या प्रगतीबरोबरच निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करणें आवश्यक आहे. आपल्या देशाला अजून प्रगतीचा फार मोठा पल्ला गाठावयाचा आहे. प्रगतीच्या कार्यात या नवनिर्मितीत विद्यार्थी विश्व हे फार मोठे आशेचे स्थान आहे. त्यास्तव आजच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भवितव्याचा योजनाबद्ध असा विचार करावा त्यात स्वत: विद्यार्थी, शिक्षण-संस्था, समाज, राष्ट्र याचा समावेश असावा. त्यास्तव उत्तम मनोवृत्ती जोपासावी. त्या दृष्टीने विद्यार्थी जगत कार्यरत होईल अशी आशा व्यक्त करून प्रा. डॉ. शेजवलकर शेवटी म्हणाले, 'बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने आज शैक्षणिक जगतात मानाचे स्थान प्राप्त केले आहे यापुढेही त्याला फार मोठे महत्व प्राप्त होण्याची संधी आहे आणि म्हणूनच आजच्या या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या या संस्थेला मातृस्थानी मानून तिची प्रतिष्ठा वाढवावी, तिचा लौकिक वाढवावा त्यास्तव परिश्रम करावेत. मला आशा आहे, या महाविद्यालयाचे विद्यार्थी त्यादृष्टीने परिश्रम करून आपल्या संस्थेची कीर्ती वाढवतील व तिला उज्ज्वल यशाचे वारस बनवतील.'



**मा. श्री. का. मा. आगवणे, उपाध्यक्ष जिल्हा परिषद, पुणें**

मा. श्री. का. मा. आगवणे हे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी व्यक्त केलेले विचार – हरिजनांचा प्रश्न – कालचा आणि आजचा –

आपल्या देशात परंपरावादी प्रवृत्तीनुसार जातीच्या हरळीचे मूळ खोलवर रुजलेले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात हा प्रश्न तीव्रतम व ज्वलंत होता. त्याकाळी स्पृश्य आणि अस्पृश्य हे भेद कटाक्षाने पाळले जात. समाजातील या खालच्या थराकडे पाहण्याचा त्यावेळच्या उच्चभ्रू लोकांचा दृष्टिकोन तुच्छतेचा होता.

परंतु स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या महाराष्ट्र शासनाने हा अस्पृश्यतेचा कलंक नाहीसा करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न चालविलेले आहेत परंतु अजूनही हा प्रश्न पूर्णांशाने सुटलेला नाही. म्हणून कोणा एका व्यक्तीला, घटकाला किंवा शासनाला याबद्दल दोष देता येणार नाही. शासनाने हा प्रश्न मोठ्या आत्मीयतेने हाताळला असल्याने शासनाला तर मुळीच दोष देता येणार नाही.

हा प्रश्न समाधानकारकपणे सोडविण्यासाठी अस्पृश्य समाजाने प्रामुख्याने बऱ्याच गोष्टी केल्या पाहिजेत यास्तव हरिजनांची काही खास कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या आहेत. त्यांनी आपले अंतर्गत मतभेद नाहीसे करून समाजातील सर्व थरांशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षण घेतले पाहिजे, त्याद्वारा विचार ग्रहण केले पाहिजेत, त्यानुसार विचारांची चांगली परंपरा जोपासली पाहिजे व अशा रितीने या समाजाने एकूण सर्व समाजाशी समरस झाले पाहिजे. असे निर्धाराने व निर्भयतेने केल्यास हा प्रश्न सुटेल.

शासनाकडून मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या सवलतींचा योग्य तो फायदा करून घेणे, आपल्या जीवनाची सर्वांगीण उन्नती करणे हे या समाजाने प्रामुख्याने केले पाहिजे. आणि विशेषत: या समाजातील सुशिक्षित वर्गाने त्यांना यादृष्टीने मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. तसे योग्य मार्गदर्शन झाले तर स्पृश्य आणि अस्पृश्य ही समाजात दिसून येणारी दृश्ये विरघळून जातील. असे करण्याऐवजी अस्पृश्येतरांचा द्वेष करून, त्यांना शिव्याशाप देऊन, धार्मिक ग्रंथांची होळी करून हा प्रश्न कदापि सुटणार नाही. उलट स्पृश्यांशी सलोख्याचे संबंध ठेवले पाहिजेत. त्यांचा सत्संग आपणास कसा लाभेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आपला मान आणि स्वाभिमान कायम ठेवून आजच्या अस्पृश्य समाजातील सुशिक्षितांना आपल्या समाजासाठी हे सहज करता येण्याजोगे आहे. सामाजिक न्याय मिळविण्यासाठी समाजात समरस होण्याची पात्रता अंगी बाणविणे आवश्यक आहे. संघर्ष हा काही त्यावरचा इलाज होऊ शकत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात परिस्थितीत आमूलाग्र बदल झाले आहेत. पूर्वी इतकी तीव्रता या प्रश्नाची वास्तविक राहिली नाही. जी आहे ती नाहीशी करण्यासाठी शासनाच्या प्रयत्नाला सर्वांनी साथ देणें आवश्यक आहे.

**प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे यांचा सत्कार–**

प्रा. डॉ. कृ. मं. सुर्वे यांना पुणे विद्यापीठाने पीएच्. डी. ही पदवी प्रदान केल्याबद्दल दि. ३ जानेवारी १९७३ रोजी श्रीमान् माननीय माणिकचंद तुळजाराम शहा ( वाघोलीकर ) यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी व प्राध्यापकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

**मा. ना. श्री. मोहन धारिया व मा. ना. श्री. शरद पवार यांची भेट –**

अध्यक्षस्थानावरुन बोलताना मा. ना. श्री. शरद पवार म्हणाले 'या महाविद्यालयाने पुणें विद्यापीठात चांगला दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त केली आहे. या ठिकाणी विविध खेड्यातून विद्यार्थी येतात, याचे श्रेय येथील मॅनेजमेंट व गुणी विद्यार्थ्यांना आहे.' विद्यार्थ्यांच्या चळवळीचा निर्देश करून ते म्हणाले, 'ज्या प्रमुख चळवळीत विद्यार्थी होते, त्यात बारामती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे वैशिष्टय असे की तो आगी न लावता आगी विझवितो. ह्याचे प्रत्यंतर त्यांनी बारामती येथील जिनिंग फॅक्टरीमधील कापसाच्या गाठींना लागलेल्या आगीच्या वेळी त्यांनी केलेल्या कामावरून आलें. त्यांचे अभिनंदन, कौतुक! ही अनुकरणीय गोष्ट आहे.' विद्याप्रतिष्ठानचा उल्लेख करून ते म्हणालें, 'गुणी विद्यार्थ्यांचे प्रश्न सरकारनेच नव्हे तर समाजाने देखील हाताळावेत. तरच ते उत्तम तऱ्हेने आपण सोडवू शकू व सर्वांगिण विकास साध्य करू शकू.'

मा. श्री. मोहन धारिया आपल्या भाषणात म्हणालें की, 'पाचवी पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९७४
पासून सुरू व्हावयाची आहे. ह्या योजनेची पूर्वतयारी म्हणून सरकारने एक विस्तृत निवेदन तयार केले आहे.

स्व. पं. नेहरूंच्या प्रभावी नेतृत्वाखाली 'नियोजित अर्थव्यवस्था' (Planned Economy) निर्माण
केली. अणुशक्तिनिर्मिती, पोलादनिर्मिती आणि वीजनिर्मिती ह्या क्षेत्रात भारतानें गेल्या २५ वर्षात नेत्रदीपक
प्रगती केली आहे. पंजाबने दर एकरी गव्हाच्या उत्पादनात जागतिक विक्रम केला आहे.' शैक्षणिक प्रगतीच्या
संदर्भात ते म्हणाले की, 'शिक्षण घेणाऱ्यांची संख्या सुमारे ८ कोटी आहे. नियोजनामुळे आजचा माणूस खऱ्या
अर्थाने सामर्थ्यशाली होईल असा प्रयत्न आहे.

नियोजनाच्या प्रयत्नांना खीळ बसली ती बांगला देशातून आलेल्या एक कोटी निर्वासितांमुळे ! पण नंतर
साडेसात कोटींचा एक नवा देश निर्माण करून आम्ही एक इतिहासही निर्माण केला आहे.

दारिद्रयाची दोन सूत्रे– १) मागासलेपणा व २) विषमता ह्या दोन्हींचा निःपात आम्ही करू शकू. पण
त्यासाठी आमच्या नियोजनाची सांगड विज्ञान व तंत्रज्ञानाशी घातली गेली पाहिजे.

पंचवार्षिक योजनेमुळे आत्मनिर्भरता यावी आणि आमचा समतोल विकास (Balanced Growth)
व्हावा असा प्रयत्न होत आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत आमची विदेशी मदत शून्यावर आली पाहिजे
देशात सर्व प्रकारची साधनसामग्री असताना आम्ही साधन-संपन्न होऊ शकत नाही काय ?' असा प्रश्न त्यांनी
विचारला. नियोजनाबाबत ते पुढे म्हणाले, 'राज्याराज्यात प्लॅनिंग बोर्डस् हवीत. शिवाय प्लॅनिंग हे खालून वर
आले पाहिजे व येणारे आकडे खरे व वस्तुस्थितीस धरून असले पाहिजेत. यासाठी निवडून दिलेले प्रतिनिधी
गोवले पाहिजेत. नियोजनाच्या बाबतीत आमचा ध्येयवाद जपानसारखा राष्ट्रीय ध्येयवाद असला पाहिजे.
नुसती साधनसामग्रीची जाळपोळ करून चालणार नाही. जाळायचेच असेल तर जुन्या रूढी जाळा.'

तरुणांना आवाहन करून ते म्हणाले, 'तरुणांनी मार्ग काढताना अग्रेसर असले पाहिजे. आपण नेतृत्व
करणारे विद्यार्थी व्हा. वैफल्य सोडा, जिद्द धरा. आपण सामर्थ्यवान् नवा भारत नव्या जबाबदारीने निर्माण
करू या !'

**मान्यवरांच्या भेटी –**

याशिवाय आमच्या महाविद्यालयात या ना त्या निमित्ताने पुढील नामवंत व्यक्तींनी भेटी दिल्या, त्याबद्दल
आम्ही त्यांचे अत्यत आभारी आहोत.

डॉ. पां. रा. घोगरे, धुळे, श्री. महाजन इन्कमटॅक्स कमिशनर, श्री. वालचंद देवचंद शहा सोलापूर,
पोलीस सबइन्स्पेक्टर श्री. आफळे, प्राचार्य शेख पनवेल, प्रा. नेमिनाथ जैन नागपूर, प्रा. एस्. टी. किल्लेदार
नागपूर, डॉ. कोठुरकर, प्रा. बापट, प्रा. शेवडे पुणे.

# जन्मशताब्दीनिमित्त आदरांजली

## साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांना अभिवादन !

महाराष्ट्र सारस्वतात 'साहित्यसम्राट' ही बहुमानाची पदवी प्राप्त केलेल्या
तात्यासाहेब केळकरांचा जन्मशताब्दी महोत्सव सर्वत्र साजरा होत आहे.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे सहकारी म्हणून त्यांनी 'केसरी' संस्थेत प्रवेश केला.
आणि 'केसरी' 'मराठा' ह्या दोनही वृत्तपत्रांची जबाबदारी त्यांनी मोठ्या कुशलतेने सांभाळली
आणि त्या वृत्तपत्रांना लोकमान्य टिळकांच्या अनुपस्थितीतही मोठा लौकिक प्राप्त करून दिला.
तात्यासाहेब केळकरांनी राजकारण, समाजकारण आणि साहित्य या सर्वच क्षेत्रात मोठे भरीव
कार्य केले आहे. आपली लेखणी आणि वाणी आपल्या देशातील जनतेच्या कल्याणासाठी आयुष्याच्या
शेवटच्या क्षणापर्यंत राबविली. विद्वत्ता, रसिकता, सार्वजनिक हिताची, जनकल्याणाची तळमळ
आदि विविध गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व साकार झाले होते.

" दिसो लागे मृत्यु, परी न भिववू तो मज शके "

असे म्हणत त्यांनी मृत्यूचे स्वागत केले. वेदांत्याला शोभतील असे त्यांचे हे विचार आहेत.

तात्यासाहेबांची जन्मशताब्दी २४ ऑगस्ट १९७२ पासून वर्षभर साजरी होत आहे.

त्यांच्या स्मृतीला आम्ही भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत आहोत.

## नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर

जाज्वल्य देशभक्ती असणारे स्वातंत्र्यवीर, थोर नाटककार आणि वृत्तपत्रकार म्हणून
खाडिलकर सर्वांना परिचित आहेत.

केसरी, लोकमान्य, नवाकाळ या वृत्तपत्रांचे संपादन करून व त्यात लेखन करून त्यांनी
वृत्तपत्रसृष्टीला आगळे आणि वेगळे असे जोमदार स्वरूप प्राप्त करून दिले.

नाटककार म्हणूनही त्यांनी लोकप्रियता संपादन केली. त्यांच्या कीचकवध, द्रौपदी, स्वयंवर,
भाऊबंदकी, विद्याहरण, प्रेमध्वज आदी नाटकांनी रसिकांना अपार आनंद दिला आहे. राष्ट्रोद्धा-
राच्या प्रखर तळमळीने त्यांनी ही साहित्यनिर्मिती केली व मराठी नाटकाच्या इतिहासात
'खाडिलकरयुग' निर्माण केले. त्यांच्या ह्या कर्तबगारीमुळे त्यांना 'नाट्याचार्य' ही पदवी शोभून
दिसते. तेजस्वी व लढाऊ वृत्तीचे पत्रकार व नाटककार म्हणून त्यांचे नाव अजरामर झाले आहे. या
वर्षी त्यांची जन्मशताब्दी सर्वत्र साजरी केली जात आहे. आमचे त्यांना विनम्र अभिवादन!

## अर्वाचीन मराठी काव्यातील राष्ट्रीय भावनेचे उद्गाते– कवी विनायक

कविवर्य विनायक म्हणून मराठी काव्यात ज्यांनी मानाचे स्थान प्राप्त करून घेतले आहे,
त्यांचे संपूर्ण नाव विनायक जनार्दन करंदीकर. त्यांचा जन्म धुळे येथे दि. २०–१–१८७३ रोजी
झाला. आणि वयाच्या अवघ्या तीसएकतिसाव्या वर्षी त्यांचे देहावसान झाले.

परंतु अल्पावधीत त्यांनी जी काव्यसंपदा निर्माण केली ती अमर ठरली. त्यांच्या कवितेचा
स्थायीभाव जाणवतो तो राष्ट्रभक्तीचा आणि राष्ट्रप्रीतीचा. शिवसंदेश, महाराष्ट्रलक्ष्मी, हतभागिनी
आदि कविता एकाहून एक सरस मानाव्या लागतील.

प्रसादपूर्ण रचना हा त्यांच्या कवितेचा एक उल्लेखनीय विशेष आहे.

ऐतिहासिक कविताही विनायकांनी लिहिल्या. त्यात 'कृष्णाकुमारी' ही कविता करुण–
रसयुक्त आहे.

**शिवचरिताचे चिंतन आशेचे सजविते मनी बीज ।**
**केल्या उद्योगाचें, कळवी, केव्हा तरी घडे चीज ।**

असे आपल्या कवनातून मनोगत व्यक्त करणाऱ्या अभिजात प्रतिभेच्या अल्पायुषी कवीला
जन्मशताब्दीच्या निमित्ताने आमची भावपूर्ण आदरांजली !

# पदव्युत्तर विभाग

(Post Graduate Department)

जून १९७० पासून आमच्या महाविद्यालयात पदव्युत्तर विभाग सुरू करण्यात आला.एम्. ए. (संपूर्ण मराठी) ; एम्. कॉम आणि एम्. ए. अर्थशास्त्र-राज्यशास्त्र – सी. डी ग्रुप या विषयांच्या अध्यापनाची सोय करण्यात आली.

सुरुवातीला या विभागात ४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यात एम्. ए. मराठीला १४ विद्यार्थी होते. एम्. कॉम. ला २० विद्यार्थी होते. तर एम्. ए. राज्यशास्त्र अर्थशास्त्र–सी. डी. ग्रुप या विभागात १० विद्यार्थी होते.

या विभागाची पहिली तुकडी एप्रिल १९७२ ला झालेल्या विद्यापीठ परीक्षेत पास होऊन बाहेर पडली.

त्यात एम्. ए. मराठी या वर्गाचा निकाल शंभर टक्के लागला. त्यात ७ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. कु. शशिकला शिंदे ही विद्यार्थिनी महाविद्यालयात मराठी विभागात पहिली आली. एम्. कॉम. ला दोन विद्या-र्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश प्राप्त केले व त्यात श्री. गोविंद धोंडोपंत देशपांडे हे महाविद्यालयात प्रथम आले. दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एम्. कॉम. चा निकाल ७५ टक्के लागला. एम्. ए. सी. डी. ग्रुप यात एक विद्यार्थी उत्तीर्ण झाला व शंभर टक्के निकाल लागला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो.

या वर्षी या विभागात ८३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बाहेरगावच्या त्या त्या विषयातील तज्ज्ञ आणि विद्वान व्यासंगी प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात.

मराठी विभागात डॉ. मु. श्री. कानडे, डॉ. भालचंद्र फडके यांची व्याख्याने झाली.

एम्. ए., एम्. कॉम्‌च्या विद्यार्थ्यांना पुण्याच्या मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य लिमये, सांगली येथील चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य सी. जी. वैद्य, पुण्याच्या बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचे उपप्राचार्य प्र. चिं. शेजवलकर, नासिकच्या बी. वाय. के कॉलेजचे प्राचार्य डॉ. मो. स. गोसावी, एस. पी. कॉलेजचे प्रा. केरूर, पुण्याच्या गोखले इन्स्टिट्यूट मधील प्रा. शरद कुलकर्णी या तज्ज्ञ प्राध्यापकांच्या व्याख्यानांचा लाभ झाला.

पुणे विद्यापीठाने आमच्या महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागासाठी

१९७०-७१ मध्ये ३००० रुपये

१९७१-७२ " २००० "

१९७२-७३ " २२१८ "

अनुदान दिले आहे. त्याबद्दल आम्ही विद्यापीठाचे आभारी आहोत. पदव्युत्तर विभागाची होणारी वाढ व विकास लक्षात घेता या विभागाला स्वतंत्र इमारत व स्वतंत्र ग्रंथालय याची अत्यंत निकड आहे. त्यास्तव आम्ही विद्यापीठ अनुदान मंडळाकडे अनुदानाची मागणी केली आहे.

**डॉ. जे. के. गोधा**
M. Com., B. A., LL. B., Ph. D.
प्रमुख, पदव्युत्तर विभाग

# दिवंगतांना श्रद्धांजली

## चक्रवर्ती राजगोपालाचारी

भारताचे थोर मुत्सद्दी, श्रेष्ठ साहित्यिक आणि राजकारणी चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचे २५ डिसेंबर ७२ रोजी दुःखद निधन झाले. राजाजी म्हणजे स्वातंत्र्याच्या आंदोलन काळचे एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ प्रतिनिधी होते.त्यांनी गांधीजींच्या समवेत राजकीय आंदोलनात आणि राष्ट्रसेवेसाठी आपले आयुष्य वेचले. त्यांच्या मृत्यूने भारत एका जेष्ठ आणि श्रेष्ठ अशा द्रष्टया मुत्सद्याला आणि देशभक्ताला मुकला. त्यांच्या स्मृतीला आमचे विनम्र अभिवादन.

## आचार्य भागवत

महाराष्ट्रातील एक विचारवंत, शिक्षण तज्ज्ञ आणि गांधीवादाचे भाष्यकार आचार्य स. ज. भागवत यांचे दि. ८ जानेवारी १९७३ रोजी दुःखद निधन झाले. आचार्यांच्या प्रयाणाने स्वातंत्र्याच्या आंदोलनातील एक महत्त्वाचा दुवा निखळला. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या युवकांचे भावनिक आणि वैचारिक पोषण करण्याचे कार्य आचार्य भागवत, आचार्य जावडेकर आणि साने गुरुजी या त्रिमूर्तींनी उत्तम प्रकारे केले. रवींद्रांच्या साहित्याचा आचार्यांनी मूळ बंगालीवरून सखोल अभ्यास केला होता. गांधीजींच्या नव्या शिक्षण पद्धतीवर त्यांची झालेली भाषणे फारच उद्बोधक असत. विद्वत्ता, सौहार्द, त्याग या त्रयीचा संगम त्यांच्या जीवनात झाला होता. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची फार हानी झाली आहे.

आचार्यांच्या स्मृतीला आमचे प्रणाम !

## 'सकाळ'कार डॉ. ना. भि. तथा नानासाहेब परुळेकर

सामान्य परिस्थितीतून आपल्या कर्तबगारीने एक श्रेष्ठ वृत्तपत्रकार म्हणून नानासाहेब परुळेकर यांनी लौकिक संपादन केला. पुण्याच्या अनाथ विद्यार्थी गृहात राहून त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. अमेरिकेतून उच्च विद्या संपादन करून ते भारतात परत आले. आणि स्वतःची अशी वृतपत्रसृष्टी त्यांनी निर्माण केली. 'सकाळ'चे स्वरूप त्यांनी इतके लोकाभिमुख ठेवले की महाराष्ट्रातील सामान्य माणसातही वृतपत्र वाचनाची गोडी निर्माण व्हावी.

सामान्य परिस्थितीत वाढलेल्या नानासाहेबांनी वृत्तपत्रसृष्टीत असामान्य कर्तृत्व गाजविले. दि. ८ जानेवारी १९७३ रोजी निखळलेल्या या वृत्तपत्रसृष्टीतील 'ध्रुवताऱ्या'ला आमचे प्रणाम!

## मोहन राकेश

मोहन राकेश वयाच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी (दि. ३ डिसेंबर १९७२) आकस्मिकपणे निधन पावले. मराठी भाषिकाना 'आधे अधुरे' या नाटकाच्या रूपाने नुकताच कुठे मोहन राकेशचा परिचय झाला होता. कालिदासाच्या जीवनावर 'आषाढ का एक दिन' नाटक लिहून त्यांनी 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळविला, तर गौतम बुद्धाचा भाऊ नंद व त्याची रूपगर्विता पत्नी सुंदरी यांच्या जीवनाचे भावोत्कट चित्रण 'लहरों के राजहंस' नाटकातून केले. प्रत्येक वेळी त्यांनी नवाच मार्ग पत्करला आणि त्याचे प्रत्यंतर आधुनिक जीवनातील कडवटपणा व कुरूपपणा दाखविणाऱ्या वास्तववादी 'आधे अधुरे' नाटकात येते. याशिवाय आपल्या 'अंधेरे बंद कमरे' कादंबरीतून काळोखात गुरफटलेल्या मानवी जीवनाचे पोत पारखले; 'न आनेवाला कल' मधून त्यांनी एका शिक्षकाच्या त्यागपत्राभोवती इतर भीरू शिक्षकांची चित्रे रेखाटली; 'अन्तराल' मधे त्यांनी स्त्री-पुरुषातील पारस्परिक शारीरिक व मानसिक अपेक्षांचा परिचय करून देऊन दोघांमधील अनामिक संबंधही खोल व सूक्ष्म आसतात हे दर्शविले आहे. त्यांच्या 'मलवें का मालिक' कथेतून साहित्याच्या देशकालातीत दृष्टीचे प्रत्यंतर येते आणि 'आर्द्रा' कथेतील 'बिन्नी'च्या रूपाने जणू मोहन राकेशच मातेच्या मायेची पांखर प्राप्त करतो. या समर्थ लेखणीच्या नि जिवंत प्रतिभेच्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची शान न्यारीच! गर्दीतही एकटा असलेला, मनमुराद हसणारा हा लेखक कधी रागाने सभेतून 'वाक-आउट' करायचा! त्याने आज ही 'वाक-आउट' केला आहे खरा, पण पुढच्या सभेला पुन्हा न परतण्यासाठीच!

मोहन राकेश यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो!

## —आणि आमचे विद्यार्थी

आमच्या महाविद्यालयातील एफ्. वाय्. बी. कॉम्च्या वर्गात शिकणारा विद्यार्थी चंद्रमोहन देशपांडे हा दि. ३-१-७३ रोजी सकाळी ८-१५ वाजता अल्पकालीन आजारानंतर देवाघरी निघून गेला. चंद्रमोहन हा एन्. एस. एस.चा लीडर होता. आणि सर्वांचा आवडता विद्यार्थी होता. मोहन या नावाने त्याला सारे हाक मारीत. २७ ते ३० डिसेंबर १९७२ ला झालेल्या राष्ट्रीय खो खो स्पर्धेच्यावेळी त्याने मोठ्या उत्साहाने काम केले.पण मृत्यूने अकल्पित त्याच्यावर झडप घातली. आणि एकुलत्या एक मुलाच्या वडिलांना आणि एका बहिणीला शोकसागरात लोटून बालचंदनगरचा हा चंद्रमोहन निघून गेला.



**चंद्रमोहन देशपांडे**

तसेच आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. व्ही. व्ही. अकोलकर व श्री. एम. एस. शिगाडे हे सुद्धा अकल्पित दिवंगत झाले.

या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर दिवंगतांच्या आत्म्यास शांती देवो!

## आमुचा स्वाभिमान !

## आमुची प्रतिष्ठा !



जनरल सेक्रेटरी श्री. दिलीप करे.



कु. लता भालेराव.
बी एस.सी (गणित) विद्यापीठात
प्रथम वर्ग, तिसरा क्रमांक
विशेष प्राविण्यासह
मार्च १९७२



श्री. अदलिंग एस्. जी.
बी. एस्सी. (रसायन शास्त्र)
विद्यापीठात विशेष प्राविण्यासह
प्रथम वर्ग.
मार्च १९७२



मुकुंद टाकसाळे.
(मॅगेझिन सेक्रेटरी)
आंतर विद्यापीठ कथाकथन स्पर्धा
तसेच किर्लोस्कर, मनोहर, राजस
या मासिकांच्या स्पर्धेत विनोदी
साहित्यास पारितोषीके.

# पारितोषिक स्वीकारतांना



श्री. एन. एम. सावंत



श्री. बी. जी. भोसले



कु. विजया प्रभुणे



कु. संतोष खत्री.



कु. लता भालेराव



श्री. एस्. जी. अर्दलिग.

## रौप्यमहोत्सवी--स्वातंत्र्य दिन--१५ ऑगस्ट १९७२



मशाल मिरवणूक

राष्ट्रीय खो–खो स्पर्धा, बारामती १९७२

## — महाराष्ट्र संघाची महाविद्यालयास भेट —



प्राचार्यासमवेत संघ व्यवस्थापक



महिला संघ



मोठा गट



कुमार गट

## राष्ट्रीय सेवा योजना—



**श्रमशिबिर–जळोची**



श्री. बद्रीनाथ मूर्ती



राष्ट्रीय सेवा योजना
प्रमूख श्री. सणगर के. एस्.



श्री. अनंत कुंभार



कु. सरोज देशपांडे



कु. विद्या उपाध्ये



जळोची– श्रमशिबिर दृश्ये–

## एन्. सी. सी.—



श्री. भुजबळ आर. के. कॅडेट सिनियर अंडर ऑफिसर



श्री. भट एस. एच. श्री. गवळी बी. डी. श्री. शिंदे बी. एल.
कॅडेट ज्युनियर अंडर ऑफिसर्स



श्री. स्वामी ए. एस्. कंपनी सार्जंट मेजर



मा. प्राचार्य भोरे व एन्. सी. सी. ऑफिसर प्रा. किणिगे यांच्या समवेत–– रँकहोल्डर्स

विविध खेळात प्राविण्य प्राप्त केलेले आमचे विद्यार्थी व विद्यार्थिनी–



१) एम. एम. सावंत व्ही. टी. जाधव सी. जी. मोरे एस. बी. इगवले व्ही एस निकम

२) कु. विजया प्रभुणे कु. संध्या उपाध्ये कु. रेखा पेंढारकर आर. व्ही. दुबे के. बी. आटोळे

३) कु. संतोष खत्री कु. शकुंतला डाई कु. वासंती जाधव कु. सुषमा देशपांडे डी. एल. वडदे

४) वी. जी. भोसले एस. एम. जमदाडे व्ही. एस. भोसले डी. एल. गायकवाड टी. एस. आटोळे कु. रेखा लोंढे.

मार्च १९७२ च्या विद्यापीठीय परीक्षेतील उज्ज्वल यशाचे मानकरी–



पी. डी. सायन्स–ए आर. देशपांडे. व्ही. पी. भुसे. एस. जे गुगळे. डी. पी. जोशी. कु. एस. एस शहा. के, बी. आटोळे.
कु. आर. पी. जोशी पी. डी. सायन्स. कु. ए. के. भालेराव पी. डी. कॉमर्स जे. जे. रणदिवे पी. डी. कॉमर्स.
एस. आर. मठ पी. डी. कॉमर्स व्ही. के. गाँधी प्री-प्रोफेशनल. एस. के. शहा प्री-प्रोफेशनल.
प्री-प्रोफेशनल–जी. एच. भट. पी. एम भुंजे. पी. जे. भगत. वाय. आर. देशपांडे. जी. जी. खन्ना. व्ही. वाय. साळुंके.
कु. यू. एम. गांधी प्री-प्रोफेशनल डी. एल शिंदे प्री-प्रोफेशनल. जी. एस. बोराडे प्री-प्रोफेशनल.
ए. बी. गायकवाड बी.एस्सी. आर. के. दाते बी.एस्सी. यू. डबल्यू. जोशी बी.एस्.सी.
व्ही. जी. डिसळे बी.एस्सी. कु. यू व्ही. घारपुरे बी.एस्सी. कु. के. के. कोल्हटकर बी.एस्सी.

## विद्यार्थी प्रतिनिधी पाहुण्यांच्या समवेत.



पाहुण्यांच्या समवेत प्राचार्य व विद्यार्थी प्रतिनिधी.



श्री. मुकुंद टाकसाळे पारितोषिक स्वीकारतांना.



कु. कोल्हटकर पारितोषिक स्वीकारतांना.

क्रीडांगणावर ..........आंतरमहाविद्यालयीन सामने.........



कबड्डी (मुली)
विजयी संघ.



कबड्डी (मुले)
उपविजयी संघ.



व्हॉलीबॉल
उपविजयी संघ.

## क्रीडांगणावर



खो, खो (मुले)
उपविजयी संघ



खो, खो (मुली)
उपविजयी संघ



रिले संघ

## असे वक्ते.......... ....  अशी व्याख्याने ..........



प्राचार्य डॉ. एम्. एस्. गोसावी.



श्री. वसंतराव जोगळेकर व श्री. वसंतराव काणे.



प्रा. डॉ. जे. के. गोधा.



श्री. पं. धन्यकुमार भोरे.



नाटककार श्री. शाम फडके.



प्रा. शरद् कुळकर्णी.



डीन डॉ. कोठुरकर व्ही. के. प्रा. शेवडे, प्राचार्य बापट बी. व्ही. यांच्या समवेत– डॉ. जे. के. गोधा, प्राचार्य भोरे, व बी. बी. पाटील.

विज्ञान् मंडळाचे उद्घाटन–

विद्यार्थ्यांशी हितगुज–



प्राचार्य एस्. डी. पाटील.



प्राचार्य डॉ. चौधरी.



पारितोषिक मान्य कलाकृती–

**रांगोळी फोटो–**
प्रशांत मेहता.

# मला काही सांगायचंय

माझ्या मित्रमैत्रिणींनो,

अकराव्या वर्षाचा हा अकरावा अंक आपल्या हाती देताना मला अतिशय आनंद होतो
आहे. यंदाचं वर्ष आलं तेच मुळी दुष्काळाचा टाहो फोडत– (छे छे! असं 'बोअर' होऊ नका.
दुष्काळाचा विषय बंद! बस्स?). ... . तर या वर्षी आम्ही 'लिहा' असं आवाहन केलं आणि
आमच्यापुढं लेख, कविता, कथा यांचा हा ऽ ढीग येऊन पडला. मुदतीनंतरसुद्धा काहीजण कथा–
कवितांचे कागद नाचवत 'घ्या–घ्या' असं आम्हांला म्हणत होते. पण आम्ही चक्क 'सॉरी' म्हणालो..
आमचा नाइलाजच होता (असो. मुदतबाह्य लेखक–लेखिकांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.)
आलेल्या भरपूर साहित्यातील निवडक साहित्य या अंकात समाविष्ट केलेलं आहे. मराठी, हिंदी,
इंग्रजी या भाषेत आलेले हे साहित्य विविध प्रकारचं आहे. **'उडत्या तबकड्यां'**ची माहिती देणारा
**चंद्रकान्त नातू** यांचा विज्ञानविषयक लेख किंवा एन. एस. एस., एन. सी. सी. वरचे माहितीपूर्ण
लेख जसे या अंकात आहेत तसाच **बद्रिनाथ मूर्ति** यांचा 'Do you know this?' हा विवेकानंद,
कै. राजगोपालाचारी, योगी अरविंद यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना सांगणारा अभ्यासपूर्ण
लेखही या अंकात आहे. योगी अरविंदांना त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त या लेखाद्वारे श्रद्धांजली
वाहून लेखकाने औचित्य साधलेले आहे. तसेच आजच्या शिक्षणामध्ये दिसून येणाऱ्या सर्व प्रकारच्या
समस्यांचा उहापोह **डॉ. गोधा** यांनी Student Unrest & Indiscipline या लेखात केला असून
शिक्षण क्षेत्रातील या समस्यांचे निराकरण कसे व्हावे त्याचेही सडेतोड विवेचन त्यांनी केलेले आहे.
ह्या विषयाचा अभ्यास करणाऱ्यांना हा लेख निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

## चालू घडामोडीचे चित्र

नियतकालिकात त्या त्या काळाचे चित्र उमटले जाणे जरूर असते. स्वातंत्र्याच्या रौप्य–
महोत्सवानिमित्त **नारायण खटके** यांनी लिहिलेला **'वा! रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्य दिना!'** हा लेख
भावनाप्रधान आहे. **विलास जाधव** यांनी आपल्या **'आजादी के पचीस साल'** या लेखात 'स्वातंत्र्य
मिळालं खरं पण पंचवीस वर्षात आपल्या पदरात काय पडलं' हा मनाला खिन्न करणारा विचार
प्रभावीपणे मांडला आहे. **शशिकांत मेणसे** यांनी **'पंचवीस वर्षांपूर्वीचा विद्यार्थी आणि आजचा
विद्यार्थी'** यांच्यातील फरक स्पष्ट केलेला आहे. खाडिलकर जन्मशताब्दीनिमित्त आलेला **कु. रेखा
भागवत** यांचा **'खाडिलकरांच्या नाटकातील प्रतीकात्मता'** हा लेख आणि केळकरांसारख्या
**'साहित्यसम्राटाला श्रद्धांजली'** वाहणारा केळकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त आलेला **कु. पुष्पा
जवळेकर** यांचा लेख ह्या दोन्ही लेखांत लेखिकांचा त्या त्या विषयांसंबंधीचा अभ्यास दिसून
येतो. नुकतेच दिवंगत झालेले परंतु 'आधेअधुरे' सारखे नाटक लिहून अमर झालेले हिंदी नाटक–
कार स्वर्गीय **मोहन राकेश** यांचा **परिचय** करून दिलेला आहे. **कु. शरदिनी देशपांडे** यांनी. हिंदूंच्या
धर्मग्रंथांची जाळपोळ करून **'येन केन प्रकारेन'** प्रसिद्धी मिळवणाऱ्यांना गीतातत्त्वाची महती पटवि–
णारा **'न बुद्धिभेदं जनयेत्'** हा लेख लिहिला आहे **कु. शोभा श्रोत्रीय** यांनी. दुष्काळाच्या भीषण
परिस्थितीवरील **बाळासाहेब शिंदे** यांची **'साथ'** ही कथा आपल्या डोळ्यात पाणी उभे करते.

## कथा : प्यार ही प्यार–बेशुमार

'साथ' या कथेचा एकमेव अपवाद सोडल्यास बाकी सगळ्या प्रेमकथाच आहेत. विशेष
म्हणजे बहुतेक कथा अयशस्वी प्रेमाच्या (च् च् च्!). सगळ्यांच्याच दिलाचे पार तुकडे तुकडे
झालेले. (दोस्तांनो, इतक्यांतच एवढं निराश का होता?) दोन मैत्रिणी आणि एक प्रियकर हा

प्रेमाचा सनातन त्रिकोण कु. आशाबी बागवान यांनी जीत या हिंदी कथेत रंगवलेला आहे. इष्का-मुळे निकम्मा झालेल्या तरुणाची दर्दभरी कहानी '**सजा**' लिहिली आहे **अनंत कुमार** यांनी. '**निनावी पत्रे**' केवढं भयानक वादळ निर्माण करू शकतात हे **जयकुमार गांधी** यांच्या कथेत दिसून येते. मात्र अशी पत्रे काही वेळा नवरा-वायकोमध्ये चहाच्या पेल्यातले गोड वादळ निर्माण करतात हे आपल्याला **कु. अलका मुश्रीफ** यांच्या '**दिल्लगी**' या कथेत दिसून येते. श्रीमंत नायिका आणि गरीब नायक हा **अशोक अवचट** यांच्या '**एक होती चिमणी**' चा विषय आहे. या उलट गरीब नायिका अणि श्रीमंत नायक यांच्या असफल प्रेमाची कथा आहे-प्रमोद शिन्दे यांची '**व्यथा**'. 'अत्यंत सुंदर शैली' असं जिचं आवर्जून कौतुक करावं अशी ही '**व्यथा**'! '**सोबरा**' ही **जगदीश वाळके** यांची कथा प्रेमभंगावरच आधारित आहे. **कै. चन्द्रमोहन देशपांडे** ची कथा प्रीति-विषयकच आहे. पण इतरांपेक्षा '**ही प्रीत न्यारी**' आहे ही कथा पाह्यला स्वत: मोहन आपल्यात नसावा ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे.

## विनोदाचा भीषण दुष्काळ

निरनिराळ्या नावाचा फोलपणा दाखवणारा **शिवाजी कोकरे** यांचा '**नावात नसे अर्थ काही**' हा विनोदी लेख आणि प्रेम, प्रेमभंग वगैरे गंभीर गोष्टींकडं खेळकर दृष्टीनं पाहणारी '**प्यार-मोहब्बत जिंदाबाद**' ही कथा! बस्स! एवढंच विनोदी साहित्य! मुलींनी विनोदी साहित्य नाही दिलं तर त्यामागील कारण सहज समजू शकणारे आहे. पण मुलांमध्ये विनोदबुद्धीचा एवढा भीषण दुष्काळ का?

## काव्यफुलांची उधळण

मला स्वत:ला अत्यंत आवडलेली कविता म्हणजे **कु. शोभा देशपांडे** यांची '**प्रतिबिंब**'! अर्थात ही कविता कुणालाही आवडेल अशीच आहे. प्रियकर-प्रेयसीमधील उत्कट अद्वैत चित्रित करणाऱ्या या कवितेतील कल्पनाविलास नि:संशय वाखाणण्याजोगा आहे. अशीच आणखी एक सुंदर कविता **सदानन्द करंदीकरांची** '**सीमोल्लंघन**' ही! या कवितेतील 'सीमोल्लंघन' सोवळ्या प्लेटोनिक लव्हवाल्यांना पटणारे नाही. ही कविता खऱ्या अर्थानं प्रेम 'विषयक' आहे. '**प्रतिबिंब**', आणि '**सीमोल्लंघन**' या दोन्ही कविता या अंकाचे भूषण ठराव्यात इतक्या उत्कृष्ट आहेत. **सुधाकर कुतवळ** यांनी प्रियकर-प्रेयसीचे मीलन '**नव्हती सकाळ-नव्हती संध्याकाळ**' या कवितेत दाखवलेले आहे. ('मग ती दुपार होती का?' असा एक चावट प्रश्न या कवितेच्या शीर्षकाच्या संदर्भात उगाचच मनात चमकून जातो.) **नंदकुमार चावरे** यांनीसुद्धा मीलनाचीच भावना आपल्या '**आठवण**' कवितेतून व्यक्त केली आहे. विरहव्यथेने पोळलेल्या मनांच्या तीन कविता आहेत. **नजमुद्दीन शेख** आपल्या कवितेत म्हणतात-

**'प्राणसखे तुजसाठी' प्रीत पुष्प जोगविले**
**तूच खुडता पाकळ्या विरहाने कोमेजले**

**एस. एन. सातव** यांच्या '**तळं**' या कवितेतील प्रेयसी 'ठेवुन हृदयी हुरहुर' निघून गेलेली आहे. **बद्रीनाथ मूर्तींची** '**कॅलेंडर**' ही छोटीशी कविता विरहाची जीवघेणी भावना तीव्रतेने प्रकट करते. बांगला देशाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली **प्रा. संगई** यांची '**कबूतर**' ही 'सत्यकथा' संप्रदायातील वाटते. '**मीरा बसली भजनाला**' ही कु. पुष्पा जगताप यांची कविता मनाला अध्यात्मिक वातावरणाने प्रसन्न बनवून जाते. कवितेत प्रेमकाव्याखालोखाल विनोदी कवितांची संख्या जास्त आहे. **पुढारी** या कवितेत **कु. एम. एस. बेलसरे** यांनी आजकालच्या पुढाऱ्याचे हुबेहूब चित्र उभं केलं आहे-

**यांचा देह भरलायं**
**खूपशा काळ्या पापानं**
**परि अंत:करण आहे स्वच्छ**
**दर्शवितात हे पांढऱ्या शुभ्र कपड्यानं**

**किसन कुलकर्णी** आणि **दिलीप लोणकर** यांच्या **वात्रटिका** चांगल्या आहेत. 'हा दैवाचा खेळ निराळा' या काव्यातील ध्रुवपदाचे विडंबन केलेले आहे **चं. रा. कुलकर्णी** यांनी '**कॅरमचा खेळ**' या कवितेत. सबंध गाण्याचे विडंबन त्यांनी केले असते तर ते अधिक चांगले झाले असते.

गरीबी-श्रीमंतीतील विषमतेने अस्वस्थ झालेले **हकीम नासिकवाला** आपल्या '**दो रंग दुनियाके** . !' या कवितेत कळवळून प्रश्न विचारतात-

**क्या यह सच है कि खुदा नामकी एक चीज भी है?**
**है, तो फिर..... क्या यह उसीकाही एक मजाक सा है?**

बहिणीच्या मृत्यूवर लिहिलेली '**बहन की यादमें**' ही **मनोजकुमार शहा** यांची कविता करुणरसप्रधान आहे. **शरद संत** यांच्या 'Life' या इंग्रजी कवितेत जीवनाची क्षणभंगुरता वर्णन केलेली आहे. एकंदरीत, काव्य विभाग हा अशा विविध विषयांवरील विपुल कवितांनी समृद्ध झालेला आहे.

## आभार : पारंपारिक 'गोड' कामगिरी

हे नियतकालिक तयार करताना प्राचार्य सनत्कुमार भोरे यांनी आम्हांला वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन केलं. प्रा. दयाराम पाटील सरांचे कष्ट तर प्रत्येक पानावर दिसून येतील. या बरोबर संपादक मंडळातील इतर प्राध्यापकांनीही या नियतकालिकासाठी श्रम केलेले आहेत.लेखक-लेखकांचे तर आभार मानायलाच हवेत. ज्यांचं लिखाण या नियतकालिकात प्रसिद्ध झालेलं नाही त्यांनी निराश न होता 'और भी लडेंगे' या जिद्दीने आपला प्रयत्न असाच चालू ठेवावा. वरील सर्वांचेच मन:पूर्वक आभार! जनरल सेक्रेटरी दिलीप करे याचे मात्र मी आभार मानणार नाही. (दोस्ताचे कसले आलेत आभार?)

या वर्षीच्या नियतकालिकाचे आकर्षक मुखपृष्ठ नियतकालिकाच्या सौंदर्यात नक्कीच भर घालते.

## ...... केली पण प्रीती!

खरं तर मित्र-मैत्रिणींनो, आपल्यापैकी प्रत्येकाचे आभार मानून आपल्या ऋणातून मुक्त होण्याची माझी इच्छा नाही. आपण 'नियतकालिक' विभागासाठी 'विद्यार्थी-प्रतिनिधी' म्हणून मला निवडून देऊन माझ्यावर जो विश्वास दाखवलात त्याबद्दल मी आपला कायम ऋणी आहे. 'विद्यार्थी प्रतिनिधी' या नात्याने मला फक्त मॅगेझिनचेच काम करण्याची संधी मिळाली असं नाही तर 'परिमल' 'बातमीपत्र' वगैरे सेवा करण्याचीही संधी आपण मला दिलीत. आज वर्षातले हे सारे सुखद प्रसंग माझ्याभोवती फेर धरून नाचताहेत. या सुखद आठवणी मनाला एक प्रकारची हुरहूर लावताहेत.तारुण्याच्या सळसळत्या रक्तामुळं क्वचित् प्रसंगी प्राचार्य, प्राध्यापक किंवा मित्र दुखावले गेलेही असतील. परंतु या चुकांकडे सर्वच जण उदार अंत:करणानं दुर्लक्ष करतील याची मला खात्री आहे. अखेर हे कॉलेज माझं आहे. इथल्या इमारतीशी, इथल्या सरांशी, इथल्या विद्यार्थी मित्र-मैत्रिणींशी माझं वर्धीही न संपणारं अतूट असं नातं आहे. या साऱ्यांवर मी मनापासून प्रेम केलेलं आहे. आणि म्हणूनच या कॉलेजचा आणि आपणा सर्वांचा निरोप घेताना-

**अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी-**
'लाख चुका असतील केल्या-केली पण प्रीती!'

**— मुकुंद टाकसाळे**
मॅगेझिन सेक्रेटरी

# वाङ्मयाचे हेतू

शेक्सपिअर किंवा कालिदास याचा आपले प्रत्येक नाटक लिहिण्यात नीतिबोध करण्याचा हेतू होता, की प्रतिभेचा उच्च दर्जाचा खेळ खेळण्याचा हेतू होता ? शाकुंतल नाटक हे नीतिबोधाच्या दृष्टीनेच पाहिले तर, कालिदासाने शाकुंतल प्रौढ विवाहाचे खंडन करण्याकरिता लिहिले, की मंडन करण्याकरिता लिहिले म्हणावे ! उत्तर रामचरित्र लिहिण्याचा हेतू तेजस्वी सीतेची स्तुति करण्याचा, की आत्मविश्वासशून्य रामचंद्राची निंदा करण्याचा मानावा ? उत्कृष्ट वाङमयात्मक शेकडो ग्रंथांसंबंधाने असेच प्रश्न विचारता येतील व एकावरहि ऐकमत्य होणार नाही. कलाविलासाच्या मागे हेतू संशोधनाचा गुप्त पोलीस लावून दिला तर अनर्थकारक परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. वाङमयाला नैतिक प्रबंध म्हणणे आणि साखरभाताला नुसत्या साखरेचा केलेला भात म्हणणे ही दोनही सारख्याच समंजसपणाची होत. शिल्पशास्त्रीय कलेच्या दृष्टीने निरनिराळे आकार बनविणे यात प्रतिमाकौशल्य दिसून येते. पण देवळाचे उंच शिखरच सुंदर का तर ते आकाशात ईश्वर आहे असे उंच बोट करून दाखविते म्हणून अथवा तीन तीन कमानींची जोडीच का शोभते तर तिजवरून त्रिमूर्ति ब्रह्माविष्णुमहेश्वराची आठवण होते म्हणून असे म्हणणं बरोबर होईल काय ? ताजमहालाच्या पांढऱ्याशुभ्र दगडात जी रंगीबेरंगी कुसर बसविली आहे तिचा नैतिक हेतू शोधून काढणाराने ताजमहाल पाहण्यास जाण्याचे श्रम न घेतलेलेच बरे. चित्रकार पौराणिक किंवा ऐतिहासिक चित्रे रंगवितो तेव्हा त्याचा हेतू कलेच्या दृष्टीने सुंदर चित्रे रंगविण्याचा असतो की नीतिबोध करण्याचा असतो ? पोहावयास पडणारा मनुष्य जलक्रीडा करतो ती स्नानाच्या हेतूने नव्हे. शिकारी क्षत्रिय अरण्यात मृगयाविलास करतो तो एक दिवस चांगले मांस खावयाला मिळावे म्हणून करीत नाही ! गवई दीपराग आळवितो तो धर्मशास्त्रदृष्टच्या मशालजीचा खर्च वाचविण्याकरिता नव्हे तात्पर्य, 'अधिकस्याधिकं फलं' या न्यायाने, कलेच्या दृष्टीने वाङमय सुंदर असून त्यातूनच नीतिबोध निघण्यासारखा असल्यास दुधात साखर पडेल; पण ज्याचा मूळ हेतू नीतिबोध नाही ते वाङमय नव्हे हे म्हणणे यथार्थ नाही. अशी काही स्थळे असलीच पाहिजेत की त्या पलीकडे जाऊन हेतूची पृच्छा करिताच येत नाही. हा रस्ता कोठे जातो तर अमुक गावाला असे सांगता येते. पण थेट गावाशी गेल्यावर हा गाव कोठे जातो असे विचारणाराला काय सांगावे? अध्यात्मज्ञानाचा किंवा ईश्वर-भजनाचा हेतू काय तर मोक्ष मिळविणे असे म्हणता येईल. पण फिरून मोक्षाचा हेतू काय असे विचारल्यास त्याला काय सांगावे? उत्कृष्ट वाङमयकला ही देखाल अशी गोष्ट आहे की, प्रायः तिचा हेतू व तिचे फल ही एकच असतात, दोन नसतात.

न. चिं. केळकर
मराठी साहित्य संमेलन
बडोदे, १९२१
अध्यक्षीय भाषणातून

# मराठी विभाग

## पसायदान-

आतां विश्वात्मकें देवे । येणें वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।
जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचे ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहों प्राणिजात ।।

– ज्ञानेश्वर

## मायमराठी-

माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा
हिच्यासंगे जागल्या मायदेशातील शिळा
कडे कपारीत उभी हिच्या शिवाची देऊळे
तेज सरिता मधुन स्वाभिमानाचे ओहळे

– कुसुमाग्रज

# मीरा बसली भजनाला

कारुण्याच्या सिंधुतील
भक्तीचा रस जाणवला ।
बैठक मांडुनी कृष्णासामोरी
मीरा बसली भजनाला ॥१॥
शांत, निरागस त्यातही गोंडस
चेहरा तो ठेविला ।
मिटोनि नेत्र घेवोनि चिपळ्या
मनी जप चालविला ॥२॥
दूजा हाती वीणा घेवोनि
मधूर सूर छेडिले ।
संसर्गानें झोत वायुचे,
सुगंध भरुं लागले ॥३॥
धवल अंगी, शुभ्र रंगी
वसन परिधानले ।
आणि आपुल्या विस्तीर्ण भाली
कुंकुमतिलक लाविले ॥४॥
कृष्णभक्तिचा मुखावाटे
पूर वाहू लागला ।
त्याच भावना, तोच सविनय
ओष्ठी ओथंबिला ॥५॥
मधुर रसानें अविट गोडीनें
गगन वेडे जाहलें ।
आनंदे लता लागल्या डोलू
पक्षी साथ देऊ लागलें ॥६॥
बहरला आनंद चोहीकडे
या मधूर क्षणाला ।
बैठक मांडुनि कृष्णासामोरी
मीरा बसलीं भजनाला ॥७॥

—कु. पुष्पा जगताप
पी. डी. आर्टस्

क
वि
ता

# कबूतर

नरमेधाचे संदेश घेऊन
दिक्कालाच्या गर्भात जाणवलेले
एक भिरभिरे कबूतर !
रक्तिम चंचू-रक्तातच बुचकळलेली
आणि क्षणांतच सारे बदलले
महावृक्ष उन्मळलें
जलपृष्ठी नग उलटले
स्फोट धुंदारलेल्या दिशा...आणि आग
आग आणि आवाज
चंद्रमौळी काफिल्यांचे ते भैरव-ताल
धाड् ऽऽ धुडूम ऽऽऽ धूम ऽऽऽ
संमिश्र चित्कार किंचाळण्याचे
किंचाळतांना संपल्याचें !
आदि - मध्य - अवसान
अवसानाचा आरंभ की
एका उद्दण्ड, उन्मत्त
युगाचें पतन ?
हा इशारा होता—
एक युग संपल्याचा !

प्रा. वर्धमान संघई
एम्. ए., बी. एड्.

★





# प्रतिबिंब

एका सुंदर जगात
आपण फक्त दोघं होतो
धुक्याच्या फिकट ओढणींतून
तुझे डोळे मलाच निरखित होते
मी तुझी झाली होते
तू माझा झाला होतास
मनं एक झाली होती.
तू म्हणालास किंचित् हसून
पहा ना- माझ्या डोळ्यात
तुझं प्रतिबिंब
पण तू कित्ती भोळा होतास
तू आणि मी एक झाल्यावर
प्रतिबिंब पहायला-
मला दुसरे डोळेच कुठं होते ?

कु. शोभा देशपांडे
टी. वाय्. बी. ए.

★

# अचूक उत्तर

"सायकलींला लाईट नाही लावलेला
चला गेटावर तुम्ही"
जेव्हा पोलिस बोले विद्यार्थ्याला,
तेव्हा, "विज कपात आहे,
एवढेही कळत नाही तुम्हाला ?"
उत्तर मिळे तयाला !

दिलीप लोणकर
एफ्. वाय. बी. कॉम्.

# आठवण

सहज एकदा रात्री पौर्णिमेच्या
सुधांशु होता सामोरी माझ्या
होतीं नभाला गहन निलीमा
निलीमांच्या सुंदर नभात
चांदणें होते वरुन पहात
पांढऱ्या शुभ्र आकाशात
पतंग होता प्रीतीचा
तूही दोरा ओढीत होतीस
आणि ...... आणि
मीही दोरा ओढीत होतो
पण तो तुटत नव्हता
कारण ———
देव सर्व पाहात होता
त्यावेळी तू माझी होतीस
आणि - - आणि - - आणि
मी तुझा होतो

नंदकुमार चावरे
पी. डी. आर्टस्

★

# कॅरमचा खेळ

हा कॅरमचा खेळ निराळा
नाही कशाचा मेळ कशाला
सोंगटी आधी स्ट्राईकर धावतो
डचू हा शेवटी पदराला

चं. रा. कुलकर्णी
टी. वाय्. बी. कॉम्

★

## नव्हती सकाळ नव्हती संध्याकाळ

नव्हती सकाळ, नव्हती संध्याकाळ
भिडले जेव्हा अधर अ.पुले,
रंग गुलाबी अमर प्रीतीचे
अचानक तुझिया गाली हसले
स्वप्नफुलांच्या शय्येवरती
सुगंध ओला दव बिंदुंचा
क्षणात मिसळे सुगंधात त्या
गंध लाजऱ्या प्रीत फुलांचा
स्वर्ग लाजुनी उतरे भूवर
मधूतम मीलन अपुले पाहुनी
उपमा नाही त्या सौख्याला
आनंदानें नाचली अवनी
आली सकाळ, आली संध्याकाळ
विसावली अन् तुझ्या हृदयी
कोमल तुझिया अधरावरतीं
इंद्रधनुची शोभा हसली

सुधाकर कुतवळ
टी. वाय्. बी.ए.

★

## कॅलेंडर

जेव्हा असहाय्यपणें तू
तोंड वळवून निघून गेलीस
कधीही न भेटण्यासाठीं
तेव्हापासून
मी म्हणजे झालो आहे
तारखेचे पान उलटणारे
चित्रहीन कॅलेंडर !

बद्रिनाथ मूर्ति
टीं. वाय्. बी. एस्सी.

## तळं

'नि पुन्हा कधी गाठ ?' म्हणत
वाहणाऱ्या गंधापरी
निघुन गेलीस दूरवरी
ठेऊनीं हृदयी हुरहूर......
निवळलेल्या तळ्यापरी......
परि आता अंतरीं
आहे फक्त तुझी मूर्ति हसरी
उभी मांडवात,
मोठ्या वृक्षांच्या छायेत---

एस्. एन्. सातव
एस्. वाय्. बी. एस्सी

★

## पुढारी

अहो हे आजकालचे पुढारी
नुसते आहेत नामधारी
पांढरे फटक कपडे खादी
कायतर म्हणे राहणीं साधी
कोच टोपीची अगदीच ताठ
जणू चाले पंढरीची वाट
करतात नेहमी परदेशाचा दौरा
पैसा बिचाऱ्या गरीब जनतेचा
पण यांना कोणी आवरा !
यांचा देह भरलाय
खूपशा काळ्या पापानं
परि अंतःकरण आहे स्वच्छ
दर्शवितात हे पांढऱ्या शुभ्र कपड्यानं

कु. एम्. एस्. बेलसरे
पी डी. आर्टस्

## सीमोल्लंघन

आजवर या सीमेवर
तुझे माझे होते
पाऊल सखे अडलें
ती ओलांडून सीमा
अन् ते 'नको-नाही' चे बंधन
एक सीमोल्लंघन घडलें
लुप्त झाली सीमारेषा
दोघांमधले अंतर सरता
घडला स्पर्श तो थरथरता
सुरु झाली स्पर्शाची भाषा
देहाला फुटले अवघ्या
शब्दांचे धुमारे
गळून पडली सारी संयमाची वसनें
आणि लुटले
देहानें देहाचें सोने

सदानंद करंदीकर
एम्. ए. पार्ट २

★

## वात्राटिका

आधी होती अबला
मग झाली सबला
कारण--
पायात होत्या तिच्या
उंच टाचेच्या चपला !

किसन कुलकर्णी
टी. वाय्. बी. कॉम्.

★

## प्राणसखे तुजसाठीं

ध्यास लावून तुझा मज आज तू अबोल का ?
प्रेम माझे सांगून आज तुला समजेल का ?
घायाळ हृदयाची ही व्यथा वाचून तुला कळेल का ?
घालीत होतीस वेणीत गुलाबाचे चंद्रफूल
मधुवेष्टित बोलांनी पाडलीस मला भूल
बोल तुझे मधुर-मधुर नजर तुझी करुण-करुण
हास्य तुझे मधुन-मधुन जणू आहे मंद पवन
प्राणसखे तुजसाठी प्रीत पुष्प जोगविलें
तूच खुडता पाकळ्या विरहाने कोमेजले
बाहेर ग्रीष्माचा उष्माघात हृदयी दुःखाचे आघात
प्रीतीच्या वेलीवरती तुजसाठी झेलले मी कैक घात
म्हणून माझ्या इच्छांची पाखरे तहान घेऊन वणवण फिरली
आणि अखेरीस घरी येऊनि पंख मिटून मुकाट पडली
या माझ्या इच्छांचे ताज मनोरे झाले असते
तर मग इतके सुंदर डोळे अश्रूंनी कधी भरले नसते

नजमुद्दीन शेख
पी डी आर्टस्



You must cultivate Banking Habit

For your future life

*Learn the Banking Habit with*

**BANK OF MAHARASHTRA**

: HEAD OFFICE :
1177, BUDHWAR PETH; POONA-2

-: YOUR BANK :-

with the personal touch
at your service for years to come.

C. V. JOAG
*Chairman & Managing Director*



# बा ! रौप्य महोत्सवी स्वातंत्र्य दिना !

**नारायण खटके**
एस्. वाय्. बी. ए.

**सुस्वागतम्-**

बा ! रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्य दिना ! तू तेजाने तळपत २५ व्या वर्षात पदार्पण केलस ! खरच तुझं आगमन झालं नि आमची आळसावलेली मने जागृत झाली आमची अकर्मण्यता दूर करुन तू उगवलास हे आमचे भाग्यच नव्हे का ? तुझ्या आगमनामुळे आज आम्हाला किती आनंद झाला आहे म्हणून सांगू ! हे स्फूर्ति दिना तू वर्षोवर्षी असाच येत रहा तुझ्या आगमनाने नवनवे पराक्रम गाजविण्यास आम्हास अशीच स्फूर्ति देत रहा.

**देशभक्तांची पुण्याई–**

बा ! रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्य दिना ! तू आज उगवलास ! पण तुझं हे आगमन झालं कसं ? तुझ्या ठायी असलेली अलौकिक शक्ति तुला मिळाली कशी ? राष्ट्रभक्तांनी शिरकमल वाहून तुझी पूजा केलो त्यातून तर तुला ही चेतना मिळाली नाही ना ? " हे परमेश्वरा मानव जातीच्या सेवेसाठी आणि तिच्या वैभवासाठी कार्य करण्यासाठी माझी मातृभूमि स्वतंत्र करीपर्यंत मला परत याच भारतमातेच्या पोटी जन्म घेऊ दे व मला तिच्या साठी मरु दे " असे म्हणणाऱ्या स्वातंत्र्यवीर मदनलाल धिंग्रा, क्रांतीवीर तात्या टोपे, सरदार भगतसिंग यांच्या आत्मसमर्पणामुळे तुला ही शक्ति मिळाली की " हे परमेश्वरा माझ्या हृदयातील भावना तू ओळखतोस ज्या पवित्र देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी आज मृत्यू पत्करीत आहे त्या देशाच्या संरक्षणाचा भार तुझ्यावर आहे. भारत स्वतंत्र व्हावा ही माझी एकमेव इच्छा आहे. " असे म्हणणाऱ्या हुतात्मा मोरोपंत पिंगळे, वासुदेव बळवंत, लाला लजपतराय यांच्या बलिदानातून तू हे सामर्थ्य प्राप्त केलस ? " यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत " असे अखेरचे उद्गार काढणाऱ्या लोकमान्य टिळक, कविवर्य टागोर, न्या. रानडे यांच्या देशसेवेतून तू बलवान बनलास की आगरकर, महर्षि कर्वे, भांडारकर, साने गुरुजी यांच्या समाज सेवेतून तू अमर झालास ? महात्माजींच्या सत्य अहिंसेच्या मार्गावर चालत राहून तू शक्तिशाली बनलास की नेताजींच्या क्रांतिकारी मार्गावर तू ताठर बनलास ? की बाबू गेनू, शिरिषकुमार, यांच्या तरुण रक्ताने तळपत राहिलास ? मला वाटत या आणि अशासारख्या अन्य देशभक्तांच्या पुण्याईमुळेच तुला हे सामर्थ्य प्राप्त झाल असाव.

**विकास–**

बा ! रौप्य महोत्सवी स्वातंत्र्यदिना ! गेली २५ वर्षे तू उगवत राहिलास. प्रत्येक वेळी आम्हास तुझ दर्शन वेगवेगळ्या रुपात दर्शन घडलं प्रथमवेळी तुझ दर्शन घेणारे लोक खरोखर भाग्यवान होते. त्यावेळी तुझ्या आगमनान आबालवृध्दांना आनंदसागरात न्हाऊन काढलं

होत त्या नंतर प्रत्येक वर्षी तू प्रगतीच माप घेंऊन आलास आमच्यावर येणाऱ्या असंख्य संकटाना तोंड देण्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये निर्माण करीत आलास ! नेहरु, शास्त्री, पटेल यांच्या खंबीरपणात तुझी नवनवी रुपे आम्ही पाहिली तुझ्या आगमनानंतर आम्ही जाति भेद नष्ट केले, प्रचंड धरणांची निर्मिति केली, शाळा उघडल्या, कारखाने उभे केले, योजनावध्द विकासाच्या मार्गाला तिरंगा प्यारा हाती घेऊन आम्ही लागलो श्रांत जिवांना संगीताच्या सुरात सुख देण्यासाठी घरोघर रेडिओ झाले प्रवास सुखकर व जलद होण्यासाठी रेल्वे आणि मोटारगाड्या आमच्या सोयीनुसार जास्त प्रमाणात धावू लागल्या, वैद्यकीय मदत खेडोपाडी पोहोचली. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या सोयी झाल्या खेड्यातील तालुक्याच्या ठिकाणी, कांही खेड्यातसुद्धा महाविद्यालये उघडली गेली. खेड्यातील गरीब, हुशार बुद्धिमान, होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता येऊ लागले. सहकारी क्षेत्रातही आम्ही क्रांतिकारक प्रगति केली.

## संकटांची परंपरा-

वा ! रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्य दिना ! या २५ वर्षात आमच्यावर कितीतरी संकटे कोसळली परंतु आम्ही धीर खचू दिला नाही. महात्माजी, पटेल, नेहरु शास्त्री यांच्यासारखे मोहरे हरपले. आम्ही शोकविव्हल झालो तरीही चालत राहिलो क्षणभर चरण थिजले पण पुन्हा तोल सावरुन भारतरत्न इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली चालू लागलो. चीनने आमच्यावर आक्रमण केलं, पाकिस्तानने आमच्यावर चढाई केली, आम्ही खवळून उठलो, 'जिंकू किंवा मरु' म्हणत "बचेंगे तो और भी लडेंगे" ही दत्ताजी शिंदे यांची वृत्ती धारण करुन शत्रूवर तुटून पडलो. विवेकी नेत्यांमुळे विध्वंसक कृत्यात रममाण न होता वेळ पाहून डोळ्यात तेल घालून सीमेचे रक्षण करु लागलो. प्रांतीयवाद निर्माण झाले, भाषिक वाद निर्माण झाले, हास्याचा धबधबा, अष्टपैलू बुद्धिमत्तेचे महान साहित्यिक आचार्य प्र. के. अत्रे हरपले सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार ना. ह. आपटे देवाघरी गेले, 'या जन्मी इतुकेच पुरे !' म्हणणारे आणि क्षणिकत्वाला चिरंजिवत्व देण्याचे सामर्थ्य साहित्यिकात असतं हे सामर्थ्य अजोड आहे असे म्हणणारे नाथ पै आपणास सोडून गेले नोबेल पारितोषिक विजेते, भारतरत्न डॉ. चंद्रशेखर व्यंकटरामन यांचे दुःखद देहावसान झाले. जनहिताचा ध्यास घेतलेले, ध्येयपूर्तिसाठी चंदनासारखा देह झिजविणारे, डी. लिट् ही सर्वोच्च पदवी मिळविलेले निरलस कार्य करणारे महाराष्ट्राचे महापुरुष कर्मवीर भाऊराव पाटील अनंतात विलीन झाले सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ, भाभा यांच दु.खद निधन झाले. याशिवाय थोर देशभक्त रामानंद तीर्थ, सहजानंद भारती, कर्मवीर दादासाहेब गायकवाड या सर्वांच्या निधनानं महाराष्ट्र, पर्यायाने देश पोरका झाला आहे. याशिवाय मातृभूमीच्या संरक्षणासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या सैनिकांचं मनोरंजन करुन अखिल मानवजातीला कलेपासून आनंद देणारे महान कलाकार शा. अमरशेख, अभिनेते पृथ्वीराज कपूर, संगीतकार जयकिसन, कारुण्यमूर्ति अभिनेत्री मीनाकुमारी यांना आपण मुकलो. यातूनही तोंड काढत शोक दुःख आवरुन दिवंगत महान नेत्यांची, साहित्यिकांची, कलाकाराची, वुद्धिवंतांची, देशभक्तांची प्रेरणा घेऊन आम्ही पुढे चाललो.

## मानवता-

वा ! रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्यदिना ! ज्या वीर व थोर विभूतींनी आपले प्राण पणाला लावून आणि स्वसंसाराला मातीत मिळवून नको त्या कठोर शिक्षा भोगून आपल्याला स्वातंत्र्य प्राप्ती करुन दिली. त्यांचीच प्रेरणा घेऊन आम्ही पुढे वाटचाल करीत आहोत. पण सध्या त्या वाटचालीत अनंत अडचणी, अनंत प्रश्न, अनंत खाचखळगे भरलेले आहेत. आज आम्ही बिकट परिस्थितीतून पुढे जात आहोत. महागाई, दुष्काळ, नफेबाजी व साठेबाजी यांनी आम्हाला बेजार केलं आहे. पुरेसं अन्न मिळविण्णासाठी आमची धडपड चालली आहे. त्यातच अन्यायाचं, वशिलेबाजीचं भूत आमच्या मानेवर थैमान घालतंय. 'लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार' अशी स्थिती झालीयं. 'लबाड झोडितो इमले माड्या। गुणवंतांना मात्र झोपड्या। पतिव्रतेच्या गळचात धोंडा। वेश्येला मणिहार,' असं विदारक, भयाण, दारुण चित्र आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहतोयं.

'वाईट तितुके इथे पोसते। भलेपणाचें भाग्य नासते।
या पृथ्वीच्या पाठीवर ना माणसास आधार॥'

अशी स्थिती ऐखाद्या वारा भरलेल्या शिडाप्रमाणं माणसाची झालीयं. केवळ पैशाच्या लालचेने एकमेकांचे गळे केसाने कापले जात आहेत. आजकाल मनुष्याला हे का कळत नाही ? सर्व काही कळत, पण वळत नाही, अगर मनुष्य वळविण्याचा प्रयत्नच करीत नाही. मनुष्य उच्च पदावर असला, त्याच्या हाती अधिकार असला आणि चार पैंसे खिशात खुळखुळायला लागले म्हणजे तो इतरांच्य। माणुसकीला जाणीत नाही तो जाणतो फक्त पैशाला ! 'जगात नाही राम वेड्या, दाम करी काम' अशी त्याची स्थिती होते. तो जाणतो फक्त त्याच्या वैयक्तिक नातेवाईकांना, मित्रमंडळींना. पण 'हे विश्वचि माझे घर' ही उदात्त, विशाल भावनेची जाणीव त्याला असत नाही. विश्वबंधुतेला तो विसरुन जातो. म्हणूनच लाच, लबाड्या, दरोडे, दंगे, वशिलेबाजी वगैरे दुष्कृत्ये 'सुजलाम्, सुफलाम्, मलयज शीतलाम्, सस्यशामलाम्' अशा या भारतभूमीत घडतात. हीच का आपल्या पूर्वजांची, स्वातंत्र्यवीरांची, संतमहामुनींची शिकवण आहे? म्हणून आपण आपल्या मातृभूमीसाक्ष असे वर्तन करतो? अरेरे ! परंतु यापेक्षा जर स्वकष्टाने, स्वबुद्धीने आपली कर्मे केली तर वाईट काय ?

## लोकशाही-

वा! रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्यदिना ! लोकशाहीचा खरा अर्थ काय? लाचलुचपत, चोऱ्या, लबाड्या, वशिलेबाजी, अन्याय इ. दुष्कर्मे करणें याचा अर्थ 'लोकांचे राज्य' नव्हे ! तर आपले नागरिकत्व व्यवस्थित ठेऊन, आपले कर्तव्य बजावून एकमताने वागणें. यापेक्षा लोकशाहीचा बडा अर्थ मला माहीत नाही ! दुसरी अनिष्ट गोष्ट म्हणजे पक्ष. ज्या पक्षामुळे आपसात वितुष्ट येऊन अशा संधीचा फायदा परकीय घेतात. आणि मग मलाही नाही नि तुलाही नाही अशी स्थिती होऊन बसते. नंतर आपल्या डोक्यात प्रकाश पडतो. यात काही अर्थ आहे का ? गटागटांचे एकमत होवून आपल्या मातृभूमीचे रक्षण होईल या स्तव पक्ष असतात. टिळक व आगरकर यांचे दोन वेगवेगळे पक्ष नव्हते काय ? त्यांनी का आपसात भांडणें केली ? कधीच नाही. हे सर्वांना मान्य आहे मग जागून बुजून असे का बरे व्हावे ? मातृभूमीचे सेवक ना आपण ? मग असे करणें इष्ट का ?

## अद्वैत-

वा ! रौप्य महोत्सवी स्वातंत्र्यदिना ! आजकाल लोकांची स्थिती का बिघडली ? त्याचे मूळ कारण म्हणजे एकसूत्रता नाही, कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. खरा शांतीचा, क्रांतीचा मार्ग सोडून लोक निराळयाच मार्गानें जाऊ लागले तेव्हा बंधूंनो-भगिनींनो मित्रांनो-मैत्रिणीनो विचारी, सदाचारी व्हा आणि हृदयात हृदये विलीन होऊ द्या ! 'प्रेम द्यावे, प्रेम घ्यावे, प्रेमानें जग जिंकावे' ही उदात्त भावना उरीं राहू द्या ! अविचाराने भडकून जाऊ नका ! लाचलूचपत, लबाडी, वशिलेबाजी, गोरगरिबांची मुंडी मुरगुळून मिळविलेल्या पैशाच्या धुंदीत राहू नका ! अजून सुमार्ग धरा! अजून संधी आहे. ही संधी दवडू नका! ही संधी दवडून मृत महात्म्यांच्या शापास पात्र होऊ नका. वैकुंठवासी हुतात्मे कदाचित आकाशातून ही कृत्ये पाहत असतील. त्यांचे मातृदेवीच्या प्रगतीची प्रतिक्षा करणारे डोळे उत्सुक असतील. त्यांना निराश करु नका ! म्हणून मातृभूमीची प्रगती पाहण्यासाठी आतुरलेल्या मृत-महात्म्यांची आत्मशांती करा ! कदाचित त्यांचाच आशीर्वाद कामी येऊन आपल्या भावी उज्वल कालास कारणीभूत होईल. आणि खऱ्या अर्थाने हा रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे श्रेय आपल्या पदरी पडेल !

० ० ०

# ही प्रीत न्यारी

कु. चंद्रमोहन देशपांडे
एफ्. वाय्. बी. कॉम्.

रमेश टाईप करण्यात गुंग होता. त्याच्या जीवनात आता फक्त टाईपरायटरचाच आधार होता. टाईपरायटरच्या खडखडाटात त्याला रस होता आणि आनंद वाटत होता. त्या खडखडाटाची त्याला सवय झाली होती. पण आज अचानकच एक कोमल मंजूळ आवाज आला

'मे आय कम इन सर ?'

'यस् कम इन'

'सर माझं नांव मिस् अनिता रेगे. मी आपल्या क्लास-मध्ये टायपिंग शिकू इच्छिते.'

'नो सॉरी, सध्या जागा शिल्लक नाही.'

'सर, मी आपल्या क्लासची कीर्ति ऐकली आहे चांगला कोणता टायपिंग क्लास असेल तर तुमचाच असं म्हणतात; शिवाय आपली शिकविण्याची पद्धत फार सोपी आहे असं म्हणतात. सर एवढ्या मोठ्या क्लास-मध्ये मला जर जागा मिळाली नाही तर कुठल्या क्लास मध्ये मिळणार ?'

'असं प्रत्येक जण म्हणतो, मी तरी काय करणार ?'

'सर, प्लीज बघाना एखादी जागा'

रमेशची दृष्टी काही काळ अनितावर स्थिर झाली. आणि तो म्हणाला, 'ठीक आहे. उद्या भेटा, मग सांगेन काय ते'

रमेशचे एक मन– 'काय रमेश, सेम शीला आहे ना ? नव्हे शीलाची डुप्लिकेट कॉपीच.'

दुसरे मन– 'अरे वेड्या, शीला तुला केव्हाच सोडून गेली उगीच नसता मूर्खपणा करु नकोस.'

अशा रीतीने दोन मनाच्या द्वंद्वाने रमेशला रात्रभर झोप लागली नाही. तशाच अस्वस्थ स्थितीत रमेशपुढे सकाळी सकाळीच अनिता क्लासमध्ये हजर झाली.

'मग सर मी येऊ ना ? मला प्रवेश देणार ना ?' अ... एकना अनेक प्रश्न विचारुन अनिताने रमेशला बेजार केले रमेशने शेवटी वैतागून पटकन हो म्हणून टाकले.

'ठीक आहे. उद्यापासून या'

'सर, उद्याचं काम आजच करावं असं म्हणतात. मी आज पासूनच येते. नव्हे आतापासून. शुभ कार्यास विलंब कशाला ?'

'ठीक. इच्छा तुमची.'

काळाच्या गती प्रमाणे अनिताने टायपिंगचे धडे संपविले होते. शिकण्याचं बाकी होतं ते स्टेटमेंट ते सुध्दा ती आज शिकून घेणार होती.

'सर आज मला स्टेटमेंट शिकवणार ना'

'ओ यस्. व्हाय नॉट? जरूर जरूर. एवढं हातातलं काम पूर्ण करतो आलोच मी तोपर्यंत तूं कागद लाव हं शीला'

'शीला ? कोण शीला ? सर माझं नांव शीला नव्हे अनिता आहे म्हटलं'

'सॉरी हं, मला अनिता म्हणायचं होतं पण शीला आलं.'

'सर, एक विचारू कां ?'

'ओ यस्, विचार ना'

'सर ही शीला कोण ?'

अनिता, प्लीज नको ग हा प्रश्न विचारु मला सहन होत नाही ते दुःख. का विनाकारण जखमेवरच्या वाळलेल्या खपल्या काढून पुन्हा ओली करतेस'

अनिताने मुकाट्याने कागद लावला. रमेशने तिला स्टेटमेंट कसंबसं समजावून दिलं व निघून गेला.

अनिता क्लासची वेळ संपल्यावर रमेशच्या केबिनकडे गेली रमेश केबिनमध्ये मख्ख चेहरा करून दोन्ही हातांनी डोके घट्ट पकडून बसलेला होता.

'सर मी आत येऊ ?'

रमेशने कावऱ्याबावऱ्या नजरेने तिच्याकडे पाहिले. 'हं ये. काय काम काढलंस ?'

'सॉरी सर, मी मघाशी नको तो प्रश्न विचारला. तुम्ही माझ्यावर रागावलात ?'

'छे छे नाही. जरा डोकं दुखतंय म्हणून बसलोय'

'सर आज संध्याकाळी तुम्ही माझ्या घरी या. बाबांना तुम्हाला भेटायचं, बाबांना तसे मी सांगितलयं.'

'पण अनिता ........'

'सर पण परंतु कांही चालणार नाही. बाबा तुमची वाट पहाताहेत आणि मी सुद्धा. या बरं कां ? 'असं म्हणून अनिता घाईघाईने निघून गेली,

'मिस् अनिता रेगे इथंच राहते कां ?'

'आपण ?'

'मी रमेश कुलकर्णी, लक्ष्मीकांत टाईप–रायटिंग क्लासेसचा मालक'

'अरेच्या, या या बसा ना म्हणजे तुम्ही आमच्या अनुचे टीचर की. अनू माझी मुलगी. अनू ! बाळ अनू अग बाहेर तुझे टीचर आलेत अरेच्या हे काय ? अहो पाया कां पडता ? उठा. असे म्हणून अनिताच्या बाबानी रमेशचे हात धरुन त्याला उभं केलं; 'आणि हे काय तुमच्या डोळ्यात अश्रु ? प्रथम ती आसवं पुसा बरं आसवं ढाळणे पुरुषाचं काम नव्हे'

'काका आज मला तुमच्या रुपात माझे बाबा भेटले. मी तर दुर्दैवी. मातापिताहीन. माझ्या जीवनात आता गतस्मृतीवर आसवे ढाळण्याखेरीज राहिले तरी काय ? मानव हा जन्माला येतो रडत. आसव ढाळत आणि मृत्यूला सामोरा जातो रडत रडत आणि दुःखानं. मृत्यूला हसतमुखाने सामोरे जाणारे फारच थोडे'

'बरं कां रमेश–ओ सॉरी रमेशराव.'

'काका. तुम्ही मला नुसतं रमेशच म्हणा.'

'बर ठीक तर. रमेश मानव हा जरी जन्माला रडत आला तरी तो आपल्या कर्तृत्वावर पुढे जाऊ शकतोच की प्रतिकूल परिस्थितीवर मात करण हा मानवाचा स्वभावधर्मच आहे की. तू नाही कां मात केलीस'

तेवढ्यात अनिता फराळाचे घेऊन आली इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पाटप्पा झाल्या नंतर रमेशने अनिताच्या बाबांची निघण्यासाठी परवानगी मागितली.

'बर मी आता येऊ कां ?'

'ठीक आहे रमेश हे घर तुझंच समज, केव्हांही घरी येत जा बर कां. ... ...'

---

'गुड मॉर्निग सर.'

'कोण ?'

'मी राकेश' असे म्हणताच रमेशने एकदम नजर फिरवली तर एक काळी कुट्ट, धिप्पाड, उंच, बऱ्याच मोठ्या मिशा, व कल्ले राखलेली व्यक्ती दारात उभी होती

'मला राकेश म्हणतात आपल्या अनिताच्या घरासमोर मी राहतो शिवाय आपल्या सारख्या प्रेमवीराचा हित–चिंतक आणि सल्लागार.'

'बस. पुरे करा बडबड. काम काय ते बोला'

'काही नाही आपण अनिताचा नाद सोडा. ती नीच आहे तिने तुमच्या सारख्या बऱ्याच जणाना नादी लावलं आणि झुरत ठेवलं.'

'हे पहा माझा तिचा काहीही संबंध नाही. या पेक्षा मी जास्त बोलू इच्छित नाही. आपण जाऊ शकता'

'ठीक आहे मी जातो पण या अपमानाचा बदला जरूर घेईन राकेश माझं नांव संध्याकाळी समजेलच. अच्छा वीश यू बेस्टलक'

रोज 'सर सर' करून सतावणारी अनिता आज काही न बोल्ता टायपिंग करत बसली होती जातांना ती म्हणाली, 'सर मी उद्यापासून क्लासला येणार नाही घरी येण्याचीसुद्धा गरज नाही.

'पण का ? अनिता ! अनिता थांब.'

अनिता तेथून केव्हांच निघून गेली होती रमेशने क्लास बंद केला व आपल्या घराकडे निघाला तेवढ्यात 'वाचवा वाचवा' अशा आरोळ्या ऐकू आल्या. त्या आवाजाच्या दिशेने रमेश काही अंतर चालून गेला तर त्याला राकेश अनिताला आपल्या गाडीकडे ओढत नेत असलेला दिसला

रमेश तीरासारखा धावत गेला आणि राकेशच्या हातातून अनिताचा हात सोडविला. राकेश त्याच्याकडे पाहून म्हणाला, "सर, अखेर आलातच ना?" रमेशने राकेशला बेदम मारले आणि पळवून लावले. रमेशने अनिताकडे पाहिले तर ती दूर गेली होती.

'अनिताऽ अनिताऽऽ थांब.' त्याने हाक मारली.

'सर, बस करा हे नाटक. एकीने ठोकरलं की दुसरीकडे जायचं. पण मी नाही आता फसायची. तुम्हा पुरुषांची रीतच तसली. शीलाला फसवलं. मलाही फसवाल.'

'अनिता. शीला माझी प्रेयसी नव्हे.'

'काऽय ?' असं म्हणून अनिता जागेवरच थांबली

'होय अनिता, शीला माझी प्रेयसी नव्हे. ती माझी धाकटी बहीण होती. तिचं माझ्यावर खूप प्रेम होतं. माझ्या पायात काटा मोडला तर तिच्या डोळ्यात अश्रू येत. मी खूप वैभवात असावं, माझा मोठा क्लास असावा असं तिला वाटायचं. पण परमेश्वराला ते प्रेम सहन झालं नाही. त्यानं तिला माझ्यापासून कायमचं दूर केलं. तू मला प्रथम दिसली ती शीलाच्या रुपात. तेव्हापासून मी तुला बहीण मानली.'

'रमेशदादा, आज तू नसतास तर . . . .असू दे. काही हरकत नाही. उद्या राखी पौर्णिमा. मला भाऊ मिळाला. तुला बहीण मिळाली. मी राखी बांधणार. तू उद्या घरी ये बरं का!'

'उद्या कशाला ? चल, आपण आताच जाऊ या. काकांना भेटू. खूप आनंद होईल नाही का त्यांना? चल लवकर.'

०००

★

आधुनिक पद्धतीने
लाकडी घाण्यातून काढलेले
करडईचे शुद्ध तेल
मिळण्याचे एकमेव ठिकाण
हरीभाऊ
तुळजाराम
पोटे
सुनील बिल्डिंग
डॉ. शहा यांचे दवाखान्यासमोर
बारामती







# एक होती चिमणी

अशोक अवचट
टी. वाय्. बी. कॉम्

कॉलेज आणि त्यांचं वसतिगृह म्हटलं म्हणजे, हजार प्रकारची निरनिराळ्या स्वभावाची पुष्कळशी मुलं ही एकत्र येणारच. त्यात या आमच्या कॉलेजचं वसतिगृह ही अपवाद नव्हतं.

वसतिगृहातील ती एकच खोली अशी होती की, तिथे दोन निरनिराळ्या गावची, दोन निरनिराळ्या-स्वभावाची, दोन मुलं एकत्र आली होती एकजण मनीष मुलींच्या टिंगली करून, आणि आहे ते जीवन निरस आहे,

**"रब्बीलाले जिंदगीका मजा उडाले!**
**अरे मर गये तो हो गये कबरके हवाले ।।"**

अस मानणारा होता. एकंदरीत अल्लड वृत्तीचा होता. पण, पण कधीतरी विचारात, भतकांळात गुंगलेला दिसावयाचा, व मग मनाशीच म्हणावयाचा, "जाऊ दे! व्हायचं होत ते होऊन गेलं." आणि मग पुन्हा विचारातून बाहेर पडून आपल्या अल्लड वृत्तीशी एकरूप व्हायचा.

दुसरा श्रीराम सकाळी लवकर उठणे आंघोळ उरकून खोलीतल्या गणपतीच्या फोटोची पूजा करणे गणपती स्तोत्र, आरत्या मोठ्याने म्हणणे. आणि मग शांतपणे अभ्यासाला बसणे. ह्या जगात काय आहे व जे काही बदल होतात ते सर्व परमेश्वरावर अवलंबून आहेत. परमेश्वर हाच मुख्य तारक आहे असे मानून जीवन कंठणारा होता. एकंदरीत देवभक्त होता.

एक दिवस सकाळ अशीच उगवली. मनीष पहाटेच्या गोड गुलाबी थंडीत खोलीत अंगाभोवती पांघरुण घेऊन झोपला होता तेव्हां त्याला अचानक जाग आली, ती मोठ्यानं गणपती स्तोत्र म्हणणाऱ्या श्रीराम मुळेच 'काय त्रास आहे बुवा!" असं पुटपुटत त्याने पुन्हा झोपण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. तेवढ्यात त्याची झोप पुन्हा उडाली. कारण आता गणपती स्तोत्र तर होतेच, पण त्या बरोबर तो ज्या पलंगावर झोपला होता 'त्याच्या वरच्या धुणं वाळत घालण्याच्या काठीवर बसलेल्या चिमणी आणि चिमणा यांचे प्रेम संभाषण रूपी चिवचिवणे अगदी जोरात चालले होते, "आता मात्र बंदोबस्त करावयालाच हवा," असे मनाशीच म्हणून मनीषने डोक्याखालची उशी अशी अचानक त्या चिमणा-चिमणीच्या युगुलावर मारली की, अचानक झालेल्या हल्ल्यामुळे चिमणा ताडकन् पडला, कारण तो चिमणी वर प्रेमवर्षाव करण्यात रमून गेला होता. ताडकन् पडला आणि भिंतीवर आदळून जमिनीवर पडला व थोड्याच वेळात जमिनीवर तडफड तडफड करून गतप्राण झाला.

पलीकडच्या इराण्याच्या हॉटेलातील रेडिओवर गाणे लागले होते

" चांदीकी दीवार ना तोडी, प्यार भरा दिल तोड दिया ।
एक धनवानकी बेटीने निर्धनका दामन छोड दिया ।।

चिमणी कुठे गेली, म्हणून मनीषने आजूबाजूला पाहिले तो ... तीच चिमणी, खिडकीच्या गजावर बसून दुसऱ्या चिमण्याबरोबर प्रेमसंभाषण करून, आणि त्याचा चुंबनांचा वर्षाव आनंदाने स्वीकारीत बसली होती. थोड्याच क्षणापूर्वी तिचा सोबती असलेला तो चिमणा मेल्या बरोबर ही दुसऱ्या चिमण्याकडे गेली. मनीषच्या डोळ्यातून अश्रूंची धार लागली. तो रडत असलेला पाहून श्रीराम त्याचे जवळ आला आणि म्हणाला,'

"मनीष, अरे जाऊ दे आता, रडून काय उपयोग. तो चिमणा मेला, अरे! तूच मारलंस आणि तूच रडतोस?"

त्यावर मनीष म्हणाला, 'नाहीरे ऽऽ श्रीराम नाही. मी का रडत आहे, आणि इतके दिवस विचारात गुंग-ल्या सारखा आणि एकदम विचारातून बाहेर पडलेला दिसायचो, असं का? तुम्हाला अचंबा वाटला असेल ना? पण मी तुला आज सारे सारे सांगणार आहे"

'ती बघ ती चिमणी कशी दुसऱ्या बरोबर गप्पा मारण्यात दंग झाली आहे. मघाचीच बरंका ती चिमणी. तिच्या जागी मला अरुणा दिसत आहे, आणि...आणि तो मेलेला चिमणा आहे ना? त्याच्या जागी मला माझा परमप्रिय दोस्त राजेश दिसत आहे. लहानपणापासून तो आणि मी एकाच वर्गात शिकत आलो. कॉलेजला आल्यावर एकाच खोलीत राहू लागलो. नंतर नियतीला आमची मैत्री पाहवली नाही. राजेश तसा हळवा, आणि कुठलीही गोष्ट चटकन मनाला लावून घेणारा होता. आणि त्याच त्याच गोष्टीचा विचार रात्रंदिवस करीत बसणारा होता.

श्रीराम, राजेश आणि अरुणा यांचे नांव ऐकल्या बरोबर तुला वाटले असेलना, की त्यांचे प्रेम होते म्हणून. अरे! प्रेम होते काय? होतेच मुळी! नुसते प्रेम नव्हते, तर ते प्रेम अगाध होते, अमर होते, निरपेक्ष होते.-होते ते फक्त राजेशचे अरुणावर होते. पण अरुणाचे मात्र तसे नव्हते, हे मला नंतर समजले.

" अरे श्रीराम ! स्त्रीचा मोह दुनियेत कोणत्या पुरुषाला सुटलाय? महादेवा पासून तर धर्मराजा पर्यंत आणि विष्णूपासून विश्वमित्रा पर्यंत सर्वांना लोळवलंय या स्त्रीनं आपल्या पायावर. पुरुषाच्या मनात फक्त तीनच मोह असतात.-संपत्ती, सत्ता आणि स्त्री-संपत्ती फक्त व्यावहारिक सुख देते, आणि सत्ता बौद्धिक सुख देते. पण.... पण स्त्री मात्र आत्मा, बुद्धी, मन, शरीर या सर्वांना तृप्त आणि शांत करते आणि तेही एकाच वेळी. आणि म्हणूनच स्त्रीचा मोह आवरणं कठीण जातं पुरुष जितका सुसंस्कृत, जितका उन्नत, शिकलेला त्याच्या अपेक्षा जितक्या उच्च, तितकं त्याच्या जीवनात स्त्री विषयीचं असमाधान आणि त्यामुळं त्यानं जी कल्प-नारम्य स्त्री आपल्या मनात निर्माण करून ठेवलेली असते तिच्या नादात आणि शोधात केव्हा केव्हा पतन ही होऊन जातं त्याचं. स्त्रीचा मोह हे एक मृगजळच आहे. फक्त अधिक मोहक, अधिक वेधक, आणि अधिक दाहक."

MANNEYS
FOR BOOKS
7, Arsenal Road, POONA-1





मग सांग श्रीरामऽ सांग ! यातून राजेश तरी का सुटावा? त्याने अरुणावर प्रेम केले, अगदी निरपेक्ष प्रेम केले रे! पण श्रीराम . . . मी तुला एक सांगतो. अरे या नीच. पापी स्त्री जातीवर कधीच विश्वास ठेवू नको रे! अरे, ही स्त्री लहान असते तेव्हा तिच्यावर निर-पेक्ष मायेने आई-वडील निस्सीम प्रेम करतात. ते प्रेम ही स्त्री पार विसरते. लग्न झालं म्हणजे आपण सगळं जग जिकलं असं वाटतं तिला. ती बहीण भावांची माया तोडते. ती सर्वांचीच माया तोडते. श्रीमंती, वैभव हे या स्त्रीला फार आवडते. श्रीमंती असली म्हणजे सर्व काही आहे असंच वाटतं या स्त्रीला. त्यांना श्रीमंती कशासाठी पाहिजे असते? त्यांना श्रीमंती फक्त प्रतिष्ठेसाठी हवी असते. स्त्रिया संपत्तीला फार लालचावलेल्या असतात. केवळ संपत्तीसाठी त्या आपल्या प्रियकराला सोडून दुसऱ्याशी लग्न करतात. एवढेच नाही तर आपली लाज सोडायलाही त्या कमी करीत नाहोत. याची या जगात कितीतरी उदाहरणे पाहवयास मिळतील. एका पुरुषावर प्रेम करून शेवटपर्यंत एकनिष्ठ राहणाऱ्या स्त्रिया समा-जात फारच थोड्या आढळतात. त्याच देवता होत. जाऊ दे! मी तुलाच उपदेशाचे डोस पाजीत बसलो.

श्रीराम, ही अरुणा अशीच संपत्तीला लालचाव-लेली होती असं म्हणावं लागेल. राजेश गरीब असला तरी खाऊन-पिऊन सुखी होता. आई.वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. शेवटपर्यंत दुसऱ्याच्या जीवावर जग-ण्याची त्याला कधीच वेळ आली नसती. तो गरीब होता पण स्वाभिमानी होता. कुणाजवळ कशाचीच केव्हाच भीक मागणारा असा तो नव्हता. पण ... पण अरुणानं ह्याचा विचार करावयाला पाहिजे होता. तो तिने कधी केलाच नाही.

राजेशवर आपले अगाध, निरपेक्ष प्रेम आहे असं ती त्याला नुसतं भासवायची. पण राजेशला याची कल्पना नव्हती की-

**'धनवानकी दुनियामें दिल तो एक खिलौना है।'**

हे श्रीमंत लोक निस्सीम असं प्रेम कधीच करीत नाहीत. एखाद्या खेळण्याबरोबर खेळावं तसं ते हृदयाबरोबर खेळत असतात. खेळणं जुनं झालं की लहान मूल जसं नव्या सुंदर खेळण्याकडे जातं, तसं हे श्रीमंत लोक जिथें श्रीमंती दिसेल तेथे धाव घेत असतात. राजेश बरोबर मजा करून त्याच्या जवळचे पैसे संपवून अरुणा दुसऱ्या-कडे गेली. ह्या श्रीमंत लोकांना गरीबांच्या हृदयाची किंमत नसते. ते जगातील सर्व गोष्टींची तुलना केवळ पैशाबरोबरच करीत असतात.



जेव्हा अरुणाच्या वडिलांना समजले की अरुणा गरीब मुलावर प्रेम करीत आहे तेव्हा त्यांनी पैशाच्या जोरावर तिला तावडतोब वळविले. 'एखादा चांगला श्रीमंत मुलगा पाहून तुझे त्याच्याशी लग्न करून देतो. असे सांगीतले. अरुणाला आपल्या डोळ्यापुढे ऐषारामा-तील, प्रतिष्ठेचे, श्रीमंतीचे जीवन दिसू लागले. त्यावरच ती खूष झाली.

याला तीन चार महिने होऊन गेले. परीक्षा अगदी तोंडावर येऊन ठेपल्या होत्या. आमचे अभ्यास अगदी जोरात चालू होते. एके दिवशी सकाळी मी अगदी लवकर उठलो. तोंड धुण्यासाठी बाथरुमकडे निघालो तर दाराजवळ मला एक जाड पाकिट दिसले. डोळे चोळतच मी ते उचलले. त्यावरील राजेशचे नाव पाहून मी ते टेबलावर ठेवले. राजेशला उठवून मी तोंड धुण्यासाठी निघून गेलो. मी जेव्हा परत आलो तेव्हा राजेशच्या हातात पाकीट नव्हते. त्याचे तुकडे मात्र त्याच्या पायाजवळ पडले होते. तो एकटक समोर बघत होता. त्याच्या डोक्यात विचारांचे काहूर माजले होते. त्याने डोके गच्च धरले होते. आणि . . . . तो पडणार इतक्यात मी त्याला सावरलं. 'राजेश, अरे काय झालं?' असे मी विचारताच त्याने फक्त कागदाच्या तुकड्यांकडे बोट दाखविले. मी त्या तुकड्याकडे नीट पाहिले.त्यावर लिहिलेले 'विवाह स्थळ' आणि 'अरुणा' हे शब्द वाच-ताच काय ओळखायचे ते ओळखले.

मी त्याची खूप समजूत घातली. पण त्याच्या मनातून तो विचार जातच नव्हता. तो आज खानाव-ळीत जेवायला यायचा नाही, म्हणून मीच दोघांचाही डबा घेऊन आलो. पण राजेश खोलीत नव्हता. कधीही सिगारेट न ओढणारा राजेश, पण त्याच्या कॉटजवळ बरीच थोटकं पडलेली होती.

राजेश कुठं तरी बाहेर गेला असेल तो पर्यंत आपण खोली साफ करावी या विचाराने मी खोली साफ करू लागलो. तोच एका कोपऱ्यात टेबलावरून उडून पडलेली राजेशची चिठ्ठी दिसली. त्यावर माझे नाव पाहून मी ती पटकन् उचलली आणि वाचू लागलो–

'ओ. के. मनीष, या जीवनात काही राहिले नाही. मी अरुणावर अगाध, निरपेक्ष प्रेम केले होते. पण माझे काचेसारखे जपलेले हृदय तिने ताडकन् फोडून टाकले. ते तुकडे कागदरूपाने खोलीत पसरले आहेत त्यातून अरुणाचे असंख्य चेहरे माझ्याकडे पाहून हसू लागले व म्हणू लागले, 'तुझ्या जवळ पैसा असताना राजेश, तर सर्व काही ठीक झालं असतं. मी केव्हाच तुझ्याशी लग्न केलं असतं.' मनीष मजजवळ पैसा नाही, पण मी तिच्याशिवाय जगू शकत नाही रे! मनीष मला तुला सोडवत नाही रे! पण मी आता जातो. शेवटी तुला एकच सांगतो. स्त्रीवर प्रेम करताना विचार करून कर. पण प्रेम केल्यावर विचार करू नकोस. गुड-बाय्. पुन्हा आपली भेट माझ्या स्वतःच्या घरी – – स्वर्गात!'

मला भयंकर धक्का बसला. राजेऽऽश! म्हणून मी जोरात ओरडलो. शेजारच्या खोल्यांतून मुले पळत आली. 'अरे मनीष, काय झाले?' त्यांनी मला विचारले. मी फक्त चिठ्ठीकडे बोट दाखविले आणि माझी शुद्ध हरपली.

जेव्हा मी शुद्धीवर आलो तेव्हा मला समजले की रुम नं. २३ मधील राजेश सांगत होता, 'मी रेल्वेच्या रुळापर्यंत पोहोचलो. राजेशला हाका मारल्या. पण त्याने अजीबात मागे वळून पाहिले नाही. रेल्वे आली आणि त्याने स्वतःला झोकून दिले. मी एवढेच पाहिले.' ते ऐकून मी पुन्हा बेशुद्ध झालो.

श्रीराम, मी जेव्हा शुद्धीवर आलो तेव्हा मला समजले की राजेशच्या आई-वडिलांनी राजेशचे सामान घरी नेले होते. एकंदरीत मी खोलीत एकटाच राहिलो. मी परीक्षा बाजूला सारून गावी गेलो, पण राजेशच्या आई - वडिलांना मात्र मी भेटलो नाही. त्यांना भेटण्याचा मी प्रयत्नच केला नाही. कारण मला पाहून त्यांना राजेशची आठवण तीव्रतेनं झाली असती. त्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे झाले असते.

श्रीराम, मला हे तुला या चिमणा-चिमणी वरून सांगावे लागले.' असे म्हणून मनीषने गजावर बसलेल्या त्या चिमणा-चिमणीकडे पाहिले. चिमणी व तो चिमणा प्रेमसंभाषण करीत होते. आनंदाने चिवचिवत होते. नंतर चिमणा उडून गेला त्याच्या पाठोपाठ चिमणीही उडून गेली. राग अनावर होऊन मनीषने कॉटवरची उशी खिडकीच्या गजावर फेकली. पण गजावर आदळून ती खाली पडली. चिमणी आधीच उडून गेली होती. फक्त खोलीत पडून होता तो मेलेला चिमणा! त्याचा आत्मा केव्हाच अनंतात विलीन झाला होता. त्याचा देह मात्र खोलीत अस्तित्व दर्शवित होता.

'श्रीराम, पुरुषांचं प्रेम निरपेक्ष, निस्वार्थी आणि निस्सीम असते. पण स्त्री जे प्रेम करते ते त्याच्या पैशावर, याला मी दुजोरा देतो. अरे, जो पुरुष मनापासून स्त्रीवर प्रेम करतो, तो जात, कुळ, श्रीमन्त, गरीब हे काही पहात नाही. पुरुष निःस्वार्थी प्रेम करतो. परंतु श्रीमन्त स्त्रीला गरीबाच्या प्रेमाची किंमत नसते. त्या नेहमी आपल्याच तोऱ्यात वागत असतात. गरीबाच्या मनाची जाणीव नसते. प्रामाणिकपणा, अब्रू, माणुसकी, प्रीती, भक्ती हे सारे शब्द श्रीमंत स्त्रियांच्या बाबतीत पुस्तकातील आहेत. पण पुरुषांचं तसं नसतं रे श्रीराम!

श्रीराम आणि मनीष दोघेही त्या मरून पडलेल्या चिमण्याकडे पाहू लागले. दोघांचेही डोळे अश्रूंनी भरून आले. त्या धूसर पटामुळे तो चिमणा अस्पष्ट दिसू लागला. त्याचवेळी कुठूनतरी स्वर कानी आले–

**'चाँदीकी दीवार ना तोडी,**
**प्यार भरा दिल तोड दिया।**
**एक धनवानकी बेटीने,**
**निर्धनका दामन छोड दिया॥**





# खाडिलकरांच्या नाटकातील प्रतिकात्मता-

**कु. रेखा भागवत**
एम्. ए. प्रथय वर्ष

## नाटक हे साधन–

साहित्य हे केवळ साहित्य म्हणून जन्माला न येता समाज-समाजजीवन, राष्ट्र-राष्ट्रजीवन हा दुसराही एक पक्ष त्याला आहे. ह्या भूमिकेतून खाडिलकरांच्या नाटकांची निर्मिती झालेली आहे.

१८९३ ते १९३६ या प्रदीर्घ काळात खाडिलकरांनी जी नाटके लिहिली त्या सर्वांचे सामाजिक व राजकीय आशयाच्या दृष्टीने समीक्षण केले तर असे दिसेल की, त्यांना ज्या राष्ट्रोन्नतीला उपयुक्त अशा गुणांचे व तत्त्वांचे आकर्षण होते त्या गुणांचे व तत्त्वांचे संघर्ष त्यांनी आपल्या नाट्यकृतीन उभे केले. म्हणजेच कलेचे अवास्तव स्तोम न माजविता कला त्यांनी आपल्या तत्त्वविचारांसाठी राबविली. नाटक हे त्यांनी आपले साधन मानले. 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' व 'प्रेमध्वज' ही दोन नाटके सोडली तर खाडिलकरांची बहुतेक सर्व नाटके प्रतिकात्मक आहेत.

'कीचकवध' हे तर उघड उघड राजकीय पार्श्वभूमीवरील प्रक्षोभक संघर्षाचे नाटक होते. त्यातील प्रत्येक व्यक्तिरेखा, प्रत्येक संवाद हा तत्कालीन प्रचलित राजकारण ध्वनित करणारा होता. कोट्यावधी हिंदी लोकांना जे बोलावयाचे होते पण बोलता येत नव्हते, ते खाडिलकरांनी 'कीचकवधा' तून भरपूर बोलून घेतले.



'भाऊबंदकी' मध्ये जुन्या ऐतिहासिक कथानकाच्या माध्यमातून एका प्रचलित प्रसंगाचा आधार घेऊन एक व्यापक स्वरुपाचे तत्त्वज्ञान गोवले आहे. 'भाऊबंदकी'–मधील रामशास्त्र्यांनी प्रेक्षकांना लोकमान्य टिळकांच्या गरजणाऱ्या वाणीची आठवण करुन दिली. तर नव्या काळाच्या अरुणछटांचे रम्योज्ज्वल चित्र बारभाईच्या कारस्थानातून घडविले. 'मानापमान' सारख्या सकृत् दर्शनी कल्पनारम्य वाटणाऱ्या या नाटकातही प्रचलित परिस्थितीवर प्रकाश टाकणाऱ्या तत्त्वाचे पडसाद उमटविले होते. हिंदुस्थानातील राजे आणि लढवय्ये शोक तलवारीची ओळख विसरुन बदफैली विलासात लोळत पडले. राष्ट्रलक्ष्मीचे संरक्षण करण्याच्या कर्तव्यापासून च्युत झाले. आधी शौर्याचा नि पाठोपाठ स्वातंत्र्यलक्ष्मीचा लोप होऊन ती परक्यांच्या हातात गेली हे तत्त्व धैर्यधर-लक्ष्मीधर या पात्रांच्या द्वारे सूचित केले आहे. 'सत्त्वपरीक्षा' नाटकात 'भूक! भूक! अन्न! अन्न!' करीत मरणाऱ्या रोहिदासाच्या चित्रणातून परतंत्र हिंदुस्थानातील अन्नान्न करणाऱ्या बालकांचे हे चित्र हृदय पिळवटून टाकणारे आहे. 'गुलामगिरी म्हणजे अब्रूला येणारा मृत्यूच' हे आपले राजकीय तत्त्वज्ञान खाडिलकरांनी या नाटकातून गोवले आहे.

मी दासी नाही, मी स्वतंत्र आहे.' असे म्हणणारी तेजस्वी द्रौपदी त्यांनी 'संगीत द्रौपदी' मध्ये रेखाटली

आहे.

विश्वातील विराट शक्ती स्वतंत्रतेची भोक्ती आहे अशी द्रौपदीची दृढ शक्ती आहे. द्रौपदीच्या रूपाने त्यांनी हिंदुस्थान देश बोलका केला आहे. तत्त्वज्ञानाच्या निवेदनाकरिता नाट्यवस्तु राबविणें ही त्यांची वृत्ती "कांचनगडची मोहना" या दुसऱ्याच नाटकातही कार्यक्षम झाल्याचे दिसून येते. वैयक्तिक स्वार्थाकरिता राष्ट्राच्या राजकीय उध्दाराच्या प्रयत्नाना दगलबाजीने घात करण्यास आपल्यातीलच नीच लोक कसे प्रवृत्त होतात हे दाखवून स्वराज्य प्राप्तीकरिता स्वातंत्र्याचा त्याग करणाऱ्या वीर प्रतापरावांचे स्फूर्तिदायक जीवन चित्र या नाटकात खाडिलकरांनी रेखाटले आहे. 'सवती मत्सर' मधील रामचंद्रावर गांधीजींची छाप पडली आहे.

## कथानकांची निवड-

आपल्या तत्व प्रतिपादना करिता काकासाहेबांनी कथानके निवडली पौराणिक आणि ऐतिहासिक! पण या मूळ कथानकावर बसेल अशा राजकीय तत्त्वज्ञानाचा मुलामा चढविलेला आहे. मूळ कथानकात ज्याचा मागमूसही सापडणार नाही अशा आधुनिक काळाला लागू पडणाऱ्या कल्पना त्यांनी चातुर्याने गुंफल्या आहेत. अत्यंत भिन्न काळातील व परिस्थितीतील पौराणिक कथानकांमध्ये सद्यकालातील परिस्थितीचा आभास उत्पन्न करतील अशा छटा सफाईने मिश्रित करण्याचे त्यांचे चातुर्य अप्रतिम आहे.

४० वर्षापूर्वी म्हणजे आधुनिक पाश्चात्य नाट्यवाङ्मयाची आपल्याकडील लोकांना कल्पनाही नव्हती. अशा काळी समाजनिष्ठ विचारसरणीचा व राष्ट्रोध्दारक तत्त्वज्ञानाचा तेजोदीप आपल्या नाटकामध्ये उभारून त्यांनी समाजमनाला उद्दीपीत केले. हा प्रकार त्यांनी इतक्या प्रभावशाली पण बेमालूमपणे केला की त्यांच्या कलेचे रहस्य यातच आहे असे म्हणण्याचा मोह आम्हाला पडावा.

खाडिलकरांचे रंगभूमीवर पदार्पण करण्यापूर्वी ऐतिहासिक नाटके रूढ आणि लोकप्रियही झाली होती. खाडिलकरांनी त्यांना आपल्या तत्त्वज्ञानाचे व विचारसरणीचे वाहक बनविले त्यांनी नाटकांच्या दृष्टीने उपयुक्त



म्हणजे ज्यांच्यामध्ये संघर्षाची बीजे आहेत व भूमिकांच्या व्यक्तित्त्व दर्शनास वाव आहे अशी ऐतिहासिक व पौराणिक कथानके निवडली. त्यामधील वैयक्तिक स्वरूपाला, व्यक्तिनिष्ठ संघर्षाला तात्त्विक स्वरूप देऊन त्यांनी दोन परस्पर विरोधी राजकीय आणि सामाजिक विचारसरणीला कलहाचे रूप दिले. पूर्वपरिचित कथानके घेतल्यामुळे नाटकात अनुस्यूत केलेले तत्त्वज्ञान व प्रमेये यावर वाचक व प्रेक्षकांचे लक्ष खिळले गेले. द्रौपदी, हरिश्चंद्र, विश्वामित्र, रुक्मिणी इ. पौराणिक भूमिकांच्या तोंडी त्याच्या स्वभावधर्माला, परिस्थितीला आणि प्रसंगांना साजेसे विचार घालून आपल्या राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानाचे पैलू व्यक्त केले. सर्वच ऐतिहासिक-पौराणिक भूमिका उच्चपदस्थ असल्यामुळे त्यांच्या तोंडी ते तत्त्वज्ञान नि प्रमेये शोभून दिसली, स्वाभाविक वाटली.

## तत्त्वप्रतिपादन -

खाडिलकरांनी जी तत्त्वे किंवा प्रमेये प्रतिपादन केली आहेत ती केवळ संवादातूनच नव्हे तर घटना व प्रसंगातूनही परिस्फुट होणारी असतात. तत्त्वांवर नाटकाचा पेचप्रसंग आधारलेला हा तर त्यांचा विशेष. नाटकातील मुख्य घटना-प्रसंग कोणत्या सामाजिक वा राजकीय तत्त्वांच्या संघर्षामुळे उद्भवला असे दाखविले असता समर्पक आणि तर्कशुध्द दिसेल हे हेरून तत्त्वप्रतिपादनासाठी योग्य भूमिका निवडून तिच्या हातून घडणाऱ्या कृति स्वभावधर्माला आणि विचारसरणीला अनुरूप आणि अपरिहार्य आहे याकडे ते अवधान देतात. थोडक्यात म्हणजे घटना, भूमिका, स्वभावधर्म व प्रतिपाद्य प्रमेये आणि ध्येये यांची एकवाक्यता करून ते वाचक प्रेक्षकावर ठसवितात.

खाडिलकरांनी आपल्या नाटकात स्वीकारलेल्या भूमिका उच्चपदस्थ, प्रतापी आणि समाजाचे नेतृत्व करणाऱ्या आहेत. या व्यक्ति काही विशिष्ट स्वीकृत तत्त्वानुसार वर्तन करीत असतात. पण समाजात ज्या उच्चपदस्थ आणि अधिकारी व्यक्ति वावरत असतात त्या समाजातील सामान्य लोकांचे काय होते? सत्ताधारी लोकांनी स्वीकारलेल्या भल्या बुऱ्या ध्येयांचा व तत्त्वांचा सामान्य जनतेच्या जीवनावर काय परिणाम होतो.?



समाज-नेत्यांनी अवनतिकारक तत्त्वांचा अवलंब केला की समाजाचे एकंदर जीवन बिघडते, नासते व उन्नतिप्रद विचारांच्या, उदात्त ध्येयाच्या व्यक्तीकडे समाजाचे नेतृत्व गेले की त्यातील सामान्यांचेही जीवन शुद्ध होण्याच्या मार्गाला लागते. हे प्रतिकात्मक पद्धतीनेच खाडिलकरांनी सर्व नाटकांतून दाखविले आहे. उच्च स्तरातील नायक - नायिका दाखवून भूमिका निवडीतही प्रतिकात्मतेचा अवलंब केला आहे.

## आदर्शवाद-

काकासाहेबांच्या 'भाऊबंदकी' मधील रामशास्त्री, 'मानापमान' मधील धैर्यधर, 'विद्याहरण' मधील कच शुक्राचार्य आदि धीरोदात्त पात्रांचे चित्रण करताना काकासाहेबांच्या मनात आदर्शवाद होता. म्हणून त्यांच्या व्यवहारी जीवनात होणारे संघर्ष हा त्यांच्या नाटकांचा विषय झाला. एका अर्थाने काकासाहेबांना प्रिय झालेली व त्या काळात हवी असलेली जीवन मूल्ये व त्यांच्या जीवननिष्ठा यांचा व्यवहारी जगातील संघर्ष त्यातील नाट्य अचूक पकडून त्यांनी कलात्मकरित्या उभा केला. म्हणून खाडिलरांच्या नाटकांना शिळेपणा येणार नाही. मानवी मनातील संघर्ष व त्यातील नाट्य यांचा सखोल अभ्यास करून त्यांच्या नाटकांची उभारणी झाली आहे.

## वैशिष्ट्य-

पौराणिक, ऐतिहासिक वा सामाजिक कोणत्याही प्रकारातील नाटक असो काकासाहेबांचे त्या जीवनमूल्यावरील व तत्त्वावरील प्रेम त्यात दिसून येते आणि हे करताना त्यांचा कलात्मक दर्जा वरचा राहिला आहे. एखादी कलाकृती विशिष्ट सामाजिक चौकटीत बसविली तरी ती कलेला मारक ठरते असे नव्हे. समाजकारण, राष्ट्रकारण हेही मानवाचेच व्यापार व जीवन व्यवहार आहेत. त्यातही संघर्ष आहे. तेव्हा राष्ट्रीय संघर्षातील नाट्य नाटकाच्या माध्यमातून व्यक्त करणें यात कलेची सेवा आहे. एवढेच नव्हे तर त्यात अधिक जिवंतपणा येतो आणि त्यामुळे काळाच्या संदर्भात ती अधिक उठावदार दिसतात.

खाडिलकरांच्या सर्व नाट्यरचना किंवा गेल्या शंभर वर्षात राष्ट्रीय प्रबोधनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या अनेक वाङ्मयकृती यांचे हे मूल्य स्वयंसिद्ध आहे त्यांची नाट्यसृष्टी काळाचा 'मूड' व्यक्त करणारी होती आणि त्याच कालखंडातील इतर नाटककारांपेक्षा खाडिलकरांचे वेगळेपण !

० ० ०



Step in-
RAKA BOOK AGENCY
619, Shanwar Peth, Appa Balwant Chowk POONA 2
FOR
ARTS, SCIENCE, AGRICULTURE, COMMERCE, LAW
MEDICAL, ENGINEERING
BOOKS & GUIDES
We also buy & sell Secondhand Books at Reasonable Rates

# प्यार-मोहब्बत जिंदाबाद !

मुकुंद टाकसाळे
टी. वाय्. बी. ए.

समजा तुमचा प्रेमभंग झाला तर तुम्ही काय कराल? प्रश्न थोडासा राग येण्यासारखा आहे. म्हणजे तुम्ही विचाराल ( कदाचित् विचारणारसुद्धा नाही. ) 'इथं अजून प्रेमाचा पत्ता नाही तोच प्रेमभंगाचा अशुभ प्रश्न कशाला ?'– पण समजायचं.

तर तुम्ही ट्रकखाली किंवा रुळावर झोपाल अगर गळयाला दगड बांधून विहीरीत किंवा तळयात उडी घ्याल, एण्ड्रीन प्याल (यालाच काहीजण एल्ड्रीन असंही म्हणतात.), किंवा ढेकणाच्या औषधाची बाटली तोंडाला लावाल आणि अखेर मराल. मरायची छाती नसेल तर अगोदरच चिठ्ठीविठ्ठी लिहून पुरेसा बोभाटा कराल व औषध पिऊन झाल्याझाल्या लागलीच तिथं माणसं जमावीत अशी व्यवस्था कराल. थोडक्यात तुम्ही यशस्वी आत्महत्या कराल वा अयशस्वी आत्महत्या करण्याचा यशस्वी प्रयत्न कराल. हेही शक्य नसेल तर मुद्दाम वाढविलेल्या दाढी-मिशांच्या जंगलातून चारमिनारचा धूर सोडत 'माझ्या जीवनाच्या जंगलात, पेटला आहे एक वणवा' असल्या फडतूस कविता तुम्ही करत बसाल. खरं की नाही ?

आपण याच्या अगदी विरुद्ध आहोत. एका पोरीसाठी आपल्या बहुमोल जीवाशी खेळ का करायचा? का म्हणून रडक्या कविता करत बसायचं ? ती नाही तर दुसरी ! 'तू है हरजाई तो अपनाभी यह तौर सही - तू नहीं और सही - और नहीं और सही' असं पोरीला ठणकावून बजावण्याचं सामर्थ्य आपल्या अंगात पाहिजे.

माझा स्वतःचा प्रेमभंग झाला. साधासुधा नाही. अगदी दणदणीत प्रेमभंग ! दारुण प्रेमभंग !! जीवघेणा प्रेमभंग !!!

स्वतः शुभानं माझा प्रेमभंग केला असता तर तिला 'तू है हरजाई - - -' हेच उत्तर मी दिलं असतं. पण माझा प्रेमभंग केला तो तिच्या बापानं. (तो खत्रुड इसम दुसरं काय करणार ?) सदैव कोळशाच्या वखारीत काळा गंजिफ्रॉक आणि तसलंच धोतर घालून हा प्राणी दात किंवा कान कोरत बसलेला असतो. (बहुधा दातात किंवा कानात कोळशाचे कण जात असावेत.) शुभासारख्या रत्नाला जन्म दिला एवढंच त्याचं जन्मल्यापासूनचं एकमेवाद्वितीय कर्तृत्व !

शुभा म्हणजे कोळशाच्या खाणीतील हिरा होता हिरा ! मिर्झा ग़ालिबच्याच भाषेत सांगायचं झालं तर-

**'बला-ए-जाँ है ग़ालिब, उसकी हर बात ।**
**इबारत क्या, इशारत क्या, अदा क्या ।।**

तिचं बोलणं, तिचा नाज, नखरा, तिचे संकेत काय वर्णन करावेत ? तिची प्रत्येक हालचाल म्हणजे अक्षरशः जीवावर गुदरणारा प्रसंग ! आता ती मला जितकी सुंदर वाटते तितकी माझ्या दोस्तांना वाटत नाही. नसेलही वाटत. लैलाला पहायचं तर मजनूचेच डोळे हवेत.

तर अशा या मुलीला 'कायदेशीर' मागणी घालावी म्हणून मी तिच्या बापाकडं वखारीत गेलो. पण तेच चुकलं. कायदा गाढव असतो त्याप्रमाणे हिचा बापसुद्धा गाढव असेल याची मला काय कल्पना ?

"नमस्कार आबासाहेब" मी खोटं खोटं हसत म्हणालो.

"सुट्टा पन्नास पैसे - पोतं अकराच्या वर पडल - बारदाना तुमचा-'

माझ्याकडे त्याचं लक्षच नव्हतं. तो गिऱ्हाईकाशी बोलत होता. स्टार्च केलेली पांढरी पॅन्ट आणि पांढरा बुशशर्ट असा ड्रेस घातल्यामुळे मला अगदी अवघडल्यासारखं झालं होतं. मी इकडं तिकडं पहात उभा होतो. आबांच्या मागल्या बाजूला एक गांधीजींचा फोटो टांगला होता. (गांधीजींचा कुठलाही फोटो हा म्हातारपणाचाच असतो. त्यामुळे ते अगदी लहानपणीसुद्धा हातात लहानशी काठी, डोळयावर लहानसा चष्मा वगैरे घेऊनच जन्माला आले असावेत आणि हळूहळू तसेच वाढत गेले असावेत असं मला उगाचचं वाटतं. असो.)

माझ्याकडं त्याचं लक्ष गेलं आणि तो ताडकन् उठला "बसा-बसा साहेब. जरा गिऱ्हाईक पहात होतो. हें हें हें . . ." त्यानं स्वतःच्या धोतरानं तिथली एक पत्र्याची खुर्ची पुसली ( त्यामुळे ती आणखीनच काळी झाली. ) मी सुद्धा मूर्खच ! कोळशाच्या वखारीत बगळयासारखा पांढराशुभ्र पोशाख घालून गेलो होतो. आता बसणं भागच होतं. "हं . . काय घेणार ? कोकाकोला, गोल्डस्पॉट, कॉफी, सरबत, चहा . ."

"छे छे काही नको–"

'असं कसं साहेब ? 'उत्तम' त्यांनी गडयाला हाक मारली. 'दोन उत्तम चहा आणि दोन उत्तम लाडू सांग 'अंबिका' मध्ये. जाता जाता आबांनी उत्तमच्या नावावर फालतू कोटी केली.

उत्तम हॉटेलकडे पळाला. मला आबांच्या स्वागताने अगदी गहिवरून आले. 'आबा फार कडक आहेत असं शुभा म्हणाली होती, ते खोटंच निघालं. 'द डेव्हिल इज पेन्टेड मोअर दॅन ही इज !' आबांनी भिंतीवरचं फ्रेम केलेलं लायसेन्स माझ्यापुढं ठेवलं. लाचार हसत ते म्हणाले, 'हे लायसन – ह्या वह्या – चुकभूल द्यावी घ्यावी. हॅहॅं !'

माझ्या डोक्यात लख्खकन् प्रकाश पडला. मी ताबडतोब खुलासा केला, 'आबा. मी शॉप-इन्स्पेक्टर नाही.'

'नाऽही ?'

'नाहो.

'अरेरे ! उत्तम, एक चहा-एक लाडू कॅन्सल कर.' उत्तम पुन्हा पळाला. 'बोला, कोळसा पायज्येल आहे काय ?' आबांनी गिऱ्हाईकांशी बोलताना वापरायचा नेहमीचा 'मालकी' आवाज लावला.

'नको. त्याहीपेक्षा भारी वस्तू मागणार आहे मी. ' मी थोडं अलंकारिक भाषेत उत्तर दिलं.

हाच कोळसा आहे आमच्याकडं. रेल्वे लाईनीतून ह्याच्यापेक्षा भारी दगडी कोळसा आणून विकणे जमत नाही आपल्याला–'

'दगडी कोळसा नको - आपलं कन्यारत्न आहे ना–'

'त्याचा इथं काय संबंध ?'

'त्याला मागणी घालायला आलोयं मी. आमचं प्रेम आहे एकमेकावर. शुभानी वचन दिलंय मला लग्नाचं–'

'का ? तिचा बाप मेला होता का ?' हॉटलच्या पोऱ्याने आणलेला एक कप चहा तोंडाला लावून तो नरराक्षस ओरडला. (मी चहाचा हा अपमान मुकाटयाने गिळला.)

'नव्हता पण-

'लग्न करताय लग्न ! अरे, मागणी घालायला येताना शंभर वेळा विचार करायला हवा होता की आपण स्वातंत्र्य संग्रामात सक्रीय भाग घेतलेल्या व्यक्तीच्या मुलीला मागणी कशी घालावी ? आपली उचलली जीभ लावली टाळूला–'

'टाळूला नाही, टाळयाला.' मी आबांना सुधारलं.

'तेच ते. तुमच्या टाळूला फुटलंय बैलाचं शिंग. म्हणून हा प्रेम करण्याचा गाढवपणा सुचतोयं तुम्हाला. देशाबद्दल काय माहिती आहे ? सिमला कराराची एका वाक्यात

माहिती देता यईल?

'हो! तो सिमल्याला झाला.'

आता मात्र तो पेटून उठला. लाडूचा तुकडा तोंडात कोंबत त्याने भाषण सुरू केले–

'देश तिकडे दुष्काळाच्या खाईत सापडला आहे आणि तुम्हाला हे प्रेमाचे उद्योग सुचताहेत . . . .' तो माझ्या देखत लाडू खात असल्याने मी स्वतःच त्याच्याकडे दुष्काळातून आल्याप्रमाणे चेहरा करून पहात होतो. '. . . काय उपयोग झाला आम्ही स्वातंत्र्य मिळवून? कसली ही तरुण पिढी? माझ्या मुलीचं लग्न तुमच्याशी करून देण्याऐवजी तिला खंडाळ्याला नेऊन राजमाची पॉइंटवरून मी ढकलून देईन. काय समजला?'

'पण लग्नानंतर आम्ही जाणारच होतो खंडाळ्याला–'

'ते विसरा आता आणि चालते व्हा - चले जाव - क्विट इंडिया –' (तो काय मला स्वातंत्र्यपूर्व काळातील सैनिक समजला की काय?) उगाच जास्त शोभा नको म्हणून मी उठलो. माझा चेहरा काळाठिक्कर पडला होता. (आणि कपडेसुद्धा!)

झालं. त्या आबानं निर्घृणपणे माझ्या दिलाचे तुकडे तुकडे करून टाकले. मला फार उदास वाटायला लागले. वाटेत एक ट्रक उभा होता. त्याचा मागील भाग पाहून तर मला रडू कोसळेल की काय अशी भीती वाटू लागली. ट्रकच्या मागे एक दर्दभरा शेर होता–

**दूध जलता है, पानी जलनेके बाद।**
**आदमी रोता है, दिल टूटनेके बाद॥**

खरोखरच ग्रेट शेर! कॉलेजमधील मुलींच्या वह्या सोडल्या तर ही असली शेर-शायरी दुसरीकडे कुठंच सापडणार नाही याची मला खात्री आहे. हा शेर रचणाऱ्या त्या ट्रक ड्रायव्हरला जन्म देणारे माता-पिता खरोखरच धन्य होत. कारण खालीच 'धन्य ते माता-पिता' असाही उल्लेख होता.

आता हे प्रेमभंगाचे दुःख कमी कसं करायचं? मी जोरात शिट्टी वाजवली. पण दुःख कमी झालं नाही. (ती शिट्टी आपल्यासाठीच वाजवली असा गैरसमज करून घेऊन एक फालतू कॉलेजकन्या उगाचच लाजली. त्यामुळे मलापण लाजल्यासारखे झाले आणि दुःख थोडे



वाढलेच:) मग शिट्टीवर पिंजऱ्यातलं आख्खं गाणं वाजवलं. पण दुःख आपलं जिथल्या तिथंच! छ्या! 'गम जब सताए-सिटी बजाना' हा राजकपूरने सुचविलेला उपाय त्याच्या 'जोकर' इतकाच बंडल निघाला. चार दिवस मी प्रेमभंगाचा भोपळा पाठीशी बांधून दुःखसागरात डुबुक् डुबूक् पोहोत होतो. मग विचार केला. झाला एवढा शोक बस्स झाला. इनफ्! आता करायचं काय? अब करना क्या? व्हॉट् टू डू?

आबांच्या डोक्यात तिथलेच पाच किलोचे वजन मारावे, असा एक हिंसात्मक विचार मनात आला. पण या विचाराची माझी मलाच लाज वाटली. भारताची परंपरा काय? अहिंसेचे महत्व किती? (शिवाय जर आबांनी उत्तरादाखल माझ्या डोक्यात दहा किलो मारला असता तर 'उत्तम, पाणी आणून दे' एवढे चार शद्ब उच्चारण्याच्या आत चार माणसं बोलवावी लागली असती.) तेव्हा आबांचं मन कसं वळवायचं? मी ही समस्या दोस्त मंडळीत मांडली.

'मी सांगतो तसे कर–' दिल्या म्हणाला. दिल्या हा प्रेमप्रकरणातील आमचा बॉस. आत्तापर्यंत त्याने कमीतकमी पंधरा - सोळा पोरींवर तरी नक्कीच प्रेम केले असेल. (अर्थात वन् वे ट्रॅफिक-म्हणजे एकतर्फी.)

'येस बॉस?' मी उत्सुकतेने विचारले.

'पहिल्यांदा चार विल्स मागव–'

'विल्स? एरवी पिवळा हत्ती सुद्धा ओढाल. आता खर्च माझा आहे तर–'

'राहिलं. नको देऊस. हू इज इन् डिफिकल्टी? गरज कुणाला आहे?' बॉसने मला पेचात टाकले.

'घ्या लेकहो, विल्स घ्या म्हणतात ना अडला नारायण.'

चार विल्सची राख झाली. चार स्पेशल पोटात गेले. आणि एकेका दोस्ताला कंठ फुटू लागला.

'तू असं कर. तिच्या बापाविरूद्ध पोलीस कंप्लेंट कर.'

'मन्या, तू बुद्दू आहेस. पोलीस यालाच धरून नेतील. त्यापेक्षा तू 'खिलौना' मधल्या शत्रुघ्नप्रमाणे तिला पळवून ने–' हा शऱ्याचा उपाय.

'वा! पोरगी पळवणं हे काय लायब्ररीतील पुस्तक पळवण्याइतके सोपे आहे होय?' मी तो विचार झटकून टाकला.



'खरं सांगू का? तू तिचा नाद सोडून दे.'

'हे मात्र खरं. तू जर एवढे एम्. ए.चे शेवटचे वर्ष पुरे केलेस तर तुझ्या घरासमोर रेशन दुकानापुढे लागते तशी वधुपित्यांची रांग लागेल रांग–'

'अरेरे!' अखेर मी हताश होत्साता म्हणालो

**'वह कहाँ की दोस्ती है के बने है दोस्त नासेह।**
**कोई चारासाज होता, कोई गमसुगार होता॥**

'वाहवा! वाहवा! आता अर्थ सांग.' शऱ्या ओरडला.

'मित्रांनो, गालिब म्हणतो, 'ही कसली मैत्री आहे की मित्रांनी दुःखाचे वाटेकरी होण्याचे व सहानुभूती दाखविण्याचे सोडून उपदेशकाची भूमिका घेतली आहे. ? – यासाठीच का मी तुम्हाला विल्स दिली? यासाठीच का मी तुम्हाला चहा पाजला?'

माझं हे कळवळ्याचं बोलणं ऐकून मात्र सर्वजण सिरीयस झाले.

'आयडिया–' बॉस किंचाळला, 'तू उपोषण कर आणि तिच्या बापाचं हृदयपरिवर्तन कर. तो पक्का गांधीवादी आहे!'

'उपोषण!' मी हादरलोच.

'तू एवढा घाबरतोस का? आम्ही डबा आणू ना रात्री-'

'कर-कर. खरंच कर तू उपोषण.'

सगळ्यांनी माझ्यावर नैतिक दडपण आणून मला बळेच उपोषणाला तयार केलं. माझी दाढीही अनायसे वाढलीच होती. एका कॉटवर सतरंजी टाकून मी उपोषणाला बसलो. एका फळ्यावर खडूने लिहिले–

**– प्रेम आणि मरण --**

**प्रेम यशस्वी व्हावे म्हणून**

**श्री. राजाराम रसाळ यांचे**

**आमरण उपोषण!**

वरील मजकूरात आबांचे नाव आम्ही मुद्दामच टाळले होते. (हो! टाळक्यात दहा किलो मारला म्हणजे?)

RELIABLE TRADING COMPANY
128, Mangalwar Peth,
Pardeshi Wada, POONA 11

★

SUPPLIERS OF :
- SCIENTIFIC EQUIPMENTS
- FINE CHEMICALS
- CHARTS
- MODELS
- PLANT PHYSIOLOGY APPARATUS

मी उपोषणाला बसलो न बसलो तोंच एक कम्युनिस्ट कार्यकर्ता मला भेटायला आला. कॉंग्रॅच्युलेशन्स मि. रसाळ. मी भाई पांडुरंग. माझं नाव ऐकलंच असेल तुम्ही!'

'नाही–'

'हरकत नाही. तुमच्या उपोषणाला आमच्या पक्षाचा पूर्णपणे पाठिंबा राहिल.' असं म्हणून त्याने खिशातून एक लाल बावटा काढला आणि तो कॉटला बांधला. त्याचा परिणाम तावडतोब झाला. माझ्याशेजारी लागलीच एक पोलीस येऊन उभा राहिला. मला पाठिंबा देण्यासाठी भाई पांडुरंगनं सात-आठ लोकांचा एक प्रचंड मोर्चाही गावातून काढला. मोर्च्यात 'जिंदाबाद जिंदाबाद - प्यार मोहब्बत जिंदाबाद!', 'प्यार किया तो डरना क्या?' प्रेमाचा विजय असो!' वगैरे घोषणा दिल्या जात होत्या रात्री दोस्त डबा घेऊन आले. पण पोलीस पाहताच त्यांनी लांबूनच पळ काढला. दुसऱ्या दिवशी पोलीस मला म्हणाला 'तुमी खरंच उपोषण करताय की!'

'म्हणजे?'

'काल राती समद्या उपषोणवाल्या परमानं तुमचावी डबा यील म्हणून माजा घरनं येणारा डबा कॅन्सल केला.'

'छे! आपण तसलं काही करणार नाही. उपोषण म्हणजे हंड्रेड परसेंट उपोषण!'

एवढ्यात शुभा धावत आली.

'राजा, काय केलंस हे तू? आज पेपरात तुझं नाव वाचलं आणि तश्शीच धावत आले. खरंच, माझ्यासाठी केवढा त्याग केलास रे तू! (म्हणजे भाई पांडुरंगमुळे माझं नावसुद्धा पेपरात छापून आलं होतं तर!)

'शुभा, तुझ्यासाठी उपोषणच काय पण प्रत्यक्ष तापल्या तव्यावर सुद्धा चप्पल न घालता उभं राहण्याची माझी तयारी आहे.'

'अय्या! एम्. ए.ला मराठी घेतल्यामुळे कित्ती कित्ती छान बोलतं.यस रे तू ... अगदी खांडेकरासारखा!'

'कोण खांडेकर?

'खांडेकर माहीत नाई म्हणजे कमालच आहे तुझी! खांडेकर म्हणजे वि. स. खांडेकर रे - मृत्युंजयचे लेखक त्याचा आम्हाला एक धडा होता पी. डी.ला!'

'असं असं – मध्या आम्हाला 'अत्रे' नेमलेत.'

'मग तुला खांडेकर कसे माहीत असतील म्हणा? पण तू छानच बोलतोस. आम्हाला असं बोलताच येत नाही'

'खरं सांगू? तू बोलली नाहीस ना तरी चांगली दिसतेस.'

'चल. तुझं आपलं काहीतरीच-!' शुभी लाजली की 'कहर' दिसते. 'बर ते जाऊ दे. हे उपोषण तू सोड. काल दुपारपासून आज सकाळपर्यंत काहीच खाल्लं नाहीस तू-'

'उपोषण सोडणे या जन्मी शक्य नाही.' मी माझा निर्धार सांगितला. (पण असं म्हणत असतानाच माझ्या पोटात कावळे कोकलत होते.)

'पण का? आता तुझं पेपरात नाव आलंय ना-मग झालं तर! आणखी काय हवंय तुला?'

'काय हवंय?-ऐक. शुभे, जर तुझे वडील मला उपोषण सोडायची विनंती करतील तरच मी उपोषण सोडीन. आबांनी माझा केवढा कठोर अपमान केलाय ठाऊक आहे तुला? मला चालते व्हा म्हणाले, क्विट इंडिया म्हणाले.'

'आबा तुला 'चालते व्हा' म्हणाले?' क्विट इंडिया' म्हणाले?' शुभाने रडवेल्या स्वरात विचारले.

'होय शुभा, होय.'

'थांब, आबांकडेच जाते.' शुभा तरातरा वखारीत घुसली आणि आबांना घेऊन माझ्याजवळ आली.

'आबा, हा इसम काय वाईट आहे? सांगा–एम्. ए.ला स्वतःचं आहे. हुशार आहे. (?) स्कॉलर आहे(??), स्वतःचं घर आहे. शेती आहे... का? का अपमान केलात तुम्ही याचा?' शुभा रडायला लागली.

'शुभा, बेटी रडू नकोस– (बेटी, तूने आज मुझे मजबूर किया। दुनियाकी ऐसी कौनसी मजबुरी है कि एक बाप अपनी बेटीको रोते हुए देखे? नहीं, बेटी, नहीं। मैं सब बरदाश्त कर सकता हूँ - मगर अपनी लाडली बेटीके आँखोमें आँसू मैं देख नहीं सकता। हिंदी पिक्चरमधील हिरॉईनच्य। बापाच्या या असल्या डायलॉगचं मराठी रूपांतर आबांनी पुढं म्हणून टाकलं) 'शुभा, प्रथम मला हा माणूस फालतू वाटला-पण याचं शिक्षण, घरची स्थिती चांगली दिसतेय-'

खरं तर आबा चक्क खोटं बोलत होते. पहिल्या झूट ते मला 'फालतू' वगैरे कांही समजले नव्हतेच-शॉप-इन्स्पेक्टर समजले होते. पण मी त्यांच्या बोलण्याकडे विशेष लक्ष दिलं नाही.

'आबा, तुम्ही याला उपोषण सोडायला सांगा पाहू' शुभा.

'थांब, सांगतो – उतम, 'अंबिका'त लाडू - चहा घ्यायला सांग, पळ.'

पुढचा तपशील सांगण्यात काय अर्थ आहे? एकूण काय? शेवट गोड झाला.

(पात्र-प्रसंग काल्पनिक)




WITH BEST COMPLIMENTS FROM -

The Jawahir Trading Company

SUB DISTRIBUTORS:

'The Sirpur Paper Mills Ltd.'

STOCKISTS:

'Pudumjee Pulp & Paper Mills Ltd.'

Phone
Res. 57125
Office 57708

495, Shanwar Peth,
Mehunpura Corner,
POONA-30

# २५ वर्षापूर्वीचा विद्यार्थी आणि आजचा विद्यार्थी

**शशिकांत मेणसे**
एफ्. वाय. बी. कॉम्.

(स्वातंत्र्य महोत्सवा-निमित्त महाविद्यालयाच्या वाङ्मय व वाद-विवाद मंडळाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील प्रथम पारितोषिक मान्य निबंध)

### आधुनिक पिढी

दिवस आणि रात्रीच्या पायघड्यावर काळाची पाऊले सहजपणे पडत असतात. तंगतुमान, भडक गुरुकुर्ता असा पोशाख घातलेला, गालावरकल्ले वाढवलेला, मानेवर 'हिप्पीचे' अनुकरण केलेला निरनिराळया व्यसनांच्या आधीन झालेला, सिगारेटची वलयं वातावरणांत सोडण्यात भूषण मानणारा आजचा बेफीकीर विद्यार्थी पाहिला की वाटते, लेंगा, टोपी, व साधा शर्ट असा पोशाख असणारा माता, पिता व गुरूजन यांच्याशी आज्ञाधारकपणे वागणाऱ्या स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या विद्यार्थ्यांची हीच कां ती आधुनिक पिढी?

तेल न लावता तांबडसर वाढविलेले केस, विविध रंगी तंग पॅण्टस् व शर्टस् शिलाईच्या नवनव्या फॅशन्स देहयष्टी किडकिडीत, गवताच्या काडीसारख्या मनगटात कडे, दीडइंची पट्टा, गळयात मण्याची माळ हा आजच्या तरूणाचा मनपसंत वेष! खरे निरीक्षण केले तर हे त्यांनाही पटल. शिलाईत अधिक पैसा, शिवाय रूपही सोंगासारखे दिसते! हॉटेलात खाण्यापिण्यापायी ही पिढी पाण्यासारखा पैसा ओतते! वडील धाऱ्यांचे ऐकण्याचा धर्म नाही! तारूण्याच्या जोमात स्वतःचे व्यक्तिमत्व घडविण्याऐवजी केसांच्या मनपसंत रचनेसाठी आरशासमोर वीस पंचवीस मिनिटे मोडतात! हे सारे पाहिलं म्हणजे, तुकाराम महाराजांनी लिहिलेलं–

'बुडते हे जन न देखवे डोळा!'

अभंग स्मरतो. मन खट्टू होतं!

### विद्यार्थी शिक्षक संबंध

२५ वर्षापूर्वीचे शिक्षण म्हटले म्हणजे गुरूजी हे मन लावून विद्यार्थ्यांना शिकवीत असत. तसेच त्यावेळी विद्यार्थ्यांची संख्याही कमी असायची अर्थात विद्यार्थी देखील गुरूजनांना साथ द्यायचे, प्रेरणा द्यायचे. त्यामुळे शिक्षकवर्ग देखील आपले सर्वस्व ओतीत असत. त्या विद्यार्थ्यांना कल्पना असे की, हेच आपले गुरु हेच आपल्या ध्येयाची, यशाची वाट दाखविणारे आहेत. यांच्या बरोबर सौजन्यानें, प्रेमाने, वागावे. थोडक्यात सुसंस्कार हेच त्यांचे खरे धन असायचे. परंतु हल्ली विद्यार्थी व पालक यांचा संबंध फारच कमी येतो. अन्यथा येतच नाही. त्यामुळे पालकाला विद्यार्थी शिक्षण घेतो की, अन्य काही 'सुकर्म' करतो हे समजत नाही. त्यामुळे विद्यार्थी हळूहळू बेफिकीर होऊ लागला. गुरूजनांना मारण्यापर्यंत धाडस करू लागला. आपण कॉलेजमध्ये पहातो की, प्राध्यापक विद्यार्थ्यांना अहोजाहो बोलतात परंतु कमी प्रमाणात बरेचसे विद्यार्थी प्राध्यापकांना अरेतुरे बोलतात. (अप्रत्यक्ष) नंतरचा काळ असा येईल की, विद्यार्थी गुरुजनांच्या नावाने हाका मारतील.

### बदलती शैक्षणिक स्थिति

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक नव्या विचारांची, प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवली गेली. पूर्वीपेक्षां आजचा काळ फार पुढे गेला आहे. त्यास जेट विमानाचा वेग आला आहे, आजचे युग म्हणजे स्पर्धात्मक युग आहे. परंतु सध्याचें विद्यार्थ्यांचे तरूण मन थोडेसे उतावीळ असते. थोडा जास्त त्रास होवूं लागला, कष्ट पडू लागले की, त्यांचा उत्साह मावळू लागतो. आणि हे सर्वात वाईट. विद्यार्थ्यांनी स्वतःचे आत्म परिक्षण करण्यास शिकले पाहिजे. परिश्रम घेतले पाहिजेत. योग्य संधीचा फायदा घेतला पाहिजे. परंतु सध्याच्या विद्यार्थ्यांत ह्या तल काहीच आढळत नाही. ते आपला वेळ टिवल्या-बावल्या करण्यात घालवितात.

वस्तुतः आजच्या पेक्षा पूर्वी शिक्षण सुविधा अपुऱ्या होत्या. परंतु सध्या शिक्षणाची सोय खेडोपाडी देखील झाली आहे त्यामुळे विद्यार्थी भराभर शिक्षण घेऊन बाहेर पडू लागले आहेत. एस्. एस्. सी. होतात काय नि महाविद्यालयीन शिक्षण घेऊन पदवीधराची संख्या वाढते काय! याचा पत्ताच लागत नाही. परंतु या विद्यार्थ्यांना खात्री नाही, ते आशावादी नाहीत. कारण आपण शिक्षण घेतले खरे पण व्यवहारिक जीवनात, समाजात आपणास स्थान मिळेल कां? याबद्दल भिती वाटते. सामान्य नागरिक म्हणून जगतांना आपल्या कृतीला वाव मिळेल कां? याबद्दल शाश्वती नाही. त्यामुळे हे तरूणमन संतप्त झाले नि त्यामुळे गैरशिस्त बळावली. त्यांच्या कर्तृत्वाला दगलीचे स्वरूप येत आहे.

### बंडखोर विद्यार्थी

परदेशीय चळवळींचा भारतीय विद्यार्थ्यांवर परिणाम झाल्याने परिक्षा पध्दतीवरचा विश्वास उडाला त्यांना विफलतेने ग्रासले. राजकीय जीवनात ज्याप्रमाणे लाचलुचपत आणि स्वार्थ यांनी थैमान घातले आहे. त्याच प्रमाणे शिक्षण क्षेत्रातही अर्थात ह्या वृत्ती बळावल्या. ज्या मागण्या सरकार सरळपणे मान्य करीत नाही. त्या विरूध्द दंगे, चळवळीं केल्यावर मान्य करतात. हे विद्यार्थ्यांना (अर्थात आजच्या) कळून चुकले. विद्यार्थ्यांवर कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक यांचा प्रभाव कमी पडल्याने घेरावांना प्रोत्साहन मिळाले. अशा क्षेत्रात बहुधा उच्च, विद्वान व चारित्र्यशील व्यक्ती पाहिजे परंतु तशी व्यक्ती असली तरी ती कुलगुरूपद, प्राचार्य–पद स्वीकारत नाही.

पूर्वीचे विद्यार्थी बंड, चळवळी यांना भिऊन असत. परंतु आजच्या विद्यार्थ्यांना संप, घेराव, चळवळी यांचे आकर्षण वाढले आहे. गेल्या पंचवीस वर्षात भारतीय विद्यार्थ्यांनी चळवळीच्या ज्या नव्या वाटा शोधल्या, जी नवी वळणे घेतली ती पहाणे उद्‌बोधक आहे. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर जे बदल झाले त्याचा तीव्र परिणाम संवेदनशील तरूण मनावर तेव्हाच झाला हें तरूणमन बेचैन, प्रक्षुब्ध झाले. आणि त्याचा राग, अनुराग चळवळीतून व्यक्त होवूं लागला. असे मन सर्वस्थळी आणि सर्वकाली सारखेच रहाते. ती सर्व वैशिष्ठ्य आजच्या विद्यार्थ्यात दिसून येतात. त्यांचा राग, भावना, अनुराग उत्कट असतात. पराक्रमांचे त्यांना आकर्षण असते. ह्यातूनच चळवळीचे रूपांतर. अशा ह्या चळवळी!

परीक्षेत सुयश ★ चांगला अभ्यास
चांगले जेवण
म्हणजेच
**– प्रमोद पेइंग गेस्ट –**
प्रोप्रा.- सौ. कमलाबाई कुलकर्णी
दाते वाडा, सिद्धेश्वर आळी, बारामती
माफक दर, घरगुती वातावरण, चविष्ट जेवण स्वच्छता या साऱ्या गोष्टी म्हणजे मेंबर्सचे संपूर्ण समाधान! अर्थात हेच आमचे भांडवल, हाच आमचा नफा.

**विद्यार्थ्यांतील अपप्रवृत्ती –**

पूर्वीसारखे विद्यार्थी प्रामाणिक नाहीत. कारण ते अपप्रवृत्तींचा अवलंब करतात. परंतु त्यात अक्षरशः ते स्वत लाच फसवून बसतात. विद्यार्थ्यांत कॉपी करण्याच्या ज्या अपप्रवृत्ती बळावल्या आहेत, त्या विरुद्ध विद्यार्थ्यांनीच आवाज उठवले पाहिजेत. तरच शिक्षण क्षेत्रात प्रगति होऊ शकेल. चांगले विद्यार्थी व प्रामाणिकपणे शिकविणारे शिक्षक संघटित होऊन जर आवाज उठवू लागले तर अपप्रवृत्तींच्या गोंधळात तो आवाज कुठल्या-कुठे विरून जातो. हक्क-कर्तव्य हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे सांगण्याचे धाडस आमच्या मोठमोठ्या आदर्श नेत्यांनी केले तर विद्यार्थ्यांच्या चळवळीस विधायक वळण प्राप्त होईल.

**बदलत्या परिस्थितीचा परिणाम-**

वरील सर्व नव्या परिस्थितीमुळे विद्यार्थी शेवटी 'इंटरव्ह्यू' ला घाबरतात. चालू जमान्यात नोकरी महात्म्याच्या संदर्भात 'इंटरव्ह्यू' या प्रकाराला किती महत्त्व आहे हे मुद्दाम वर्णन करून सांगण्याची गरज नाही. नोकरी मिळवायची असेल तर इंटरव्ह्यू नामक प्राण्याशी मुकाबला करावा लागतो. आणि त्यात यशस्वी व्हावे लागते अर्थात् 'इंटरव्ह्यू' वगैरे 'सब झूठ है।' फक्त 'वशिला पाहिजे' किंवा अन्य काही मार्गांचा अवलंब केल्याखेरीज नोकरी मिळत नाही, असेही म्हणणाऱ्यांचा मोठा गट अस्तित्वात आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्याकडून सद्वर्तनाची अपेक्षा तरी कशी करावयाची!

सायंकाळ झाली, घरात दिव्यांच्या ज्योती तेवू लागल्या म्हणजे स्वातंत्र्यप्राप्ती अगोदरचे विद्यार्थी देवाला नमस्कार करीत. मोठ्या माणसाना नमस्कार करीत. देवापुढे 'शुभं करोति . .' म्हणत. पण आजच्या विद्यार्थ्यांना हे मान्य नाही. त्यांच्या तोंडात सदैव 'एक चीज मांगते हैं . .' 'कोई लडकी मुझे कल रात सपनेमें मिली . .' 'सुन चम्पा, सुन तारा . .' अशा प्रकारची गाणी असतात. सध्या लहान मुलांनाही नटांची नावे तोंडपाठ असतात आणि मनात देव आनंद, जितेंद्र होण्याची मनीषा बाळगून जया भादुरी, लीना चंदावरकर मिळविण्याचा अयशस्वी प्रयत्न करतात. एकंदरीत श्रद्धा नावाची चीज आता दुर्मिळ होत आहे हेच खरे!

**जीवनातील उथळपणा-**

विद्यार्थ्यांना मातृप्रेम, पितृप्रेम, गुरुप्रेम मान्य नाही. ते जन्मदात्री आईला विसरतात. ज्यांनी पालन-पोषण केले अशा वडिलांना गमावून बसतात. ज्यांचे ऋण कधीही फिटणार नाही अशा गुरुजनांना शिव्या देतात. आपण मात्र वेगळ्या प्रेमाच्या प्रवाहात वहात जातात. पण तो प्रवाह उथळ असतो याची कल्पना त्यांना नसते जग काय म्हणेल याची कल्पना नसते. 'आईसारखे दैवत नाही' असे म्हणण्यापेक्षा 'तूही मेरी जिंदगी' असे गुणगुणत असतात. 'तू नमशील तर मी जगूच शकणार नाही' असे म्हणतात काय, 'मी स्केलर होईन (दिशा नसणारा), रॅडिकल साईन मधून कधीच बाहेर पडू शकणार नाही.' असे म्हणतात काय, 'जीवनाच्या चेकवरच्या सहीची उपमा देतात काय, आपली फिलॅमेन्ट बनवितात काय नि रियल पार्ट होतात काय' आणि मी + तू = जीवन, जीवन – तू = ०' अशी अर्थशून्य काव्ये करतात काय!

आता फॅशनबद्दल बोलणे लाजिरवाणेच होणार आहे कारण विद्यार्थी हा प्रत्येक बाबतीत नॅरो व्हावयास पहात आहे. फॅशनमध्ये झालेला हा बदल थोडक्यात व्यक्त करावयाचा झाल्यास, धोतर नि बाराबदी घालणारे पणजोबा, उघड्या कॉलरचा सदरा, व कोट टोपी घालणारे आजोबा, सूट व टाय वापरणारा बाप आणि तंग तुमान व रंगीबेरंगी सदरा घालणारा अन डोक्यावर भरपूर केस ठेवणारा मुलगा असा दर पिढ्यात बदल होत गेला. हयाचा शेवट कोठे होणार आहे, तं सांगता येणे कठीण आहे. फॅशनच्या चक्रीवादळात आजचा तरुण विद्यार्थी भरकटत आहे, आवर्तात सापडलेल्या पाचोळ्यागत!

**अखेर-**

असा हा बदल प्रत्येक पिढीत होत जाणार आहे. प्रत्येकजण आपापल्या परीने ओरडणार की आमचीच पिढी चांगली व साहजिकच हा स्वाभाविक धर्म आहे. जुन्या पिढीने एवढेच म्हणावे की–

**'तुका म्हणे उगी रहावे, जे जे होईल ते ते पहावे'**

असा वागण्याचा संकल्प करायला पाहिजे. कारण विद्यार्थी जीवन बदलत जाणार आहे. शेवटी एवढेच म्हणायला हवे की, 'कालाय तस्मै नमः . . .' ★



# " नांवात नसे अर्थ काही ! "

**शिवाजी कोकरे**
एफ्. वाय् बी. ए.

आज काल 'नांव ठेवणे' ही प्रथा चालूच आहे. पण नांवाला तसे पाहिले तर काहीच अर्थ सुसंगती आणि वस्तुस्थिती यांचा मेळ असत नाही. असेच बहुधा आपल्याला दिसून येते. नांवाची सार्थकता आपल्या मनाला पटणे हे तर बाजूलाच राहू द्या, पण नांवातून वस्तुस्थितीचा बोध होईल अशी परिस्थिती सुद्धा या 'फॅशनेबल युगा' त दिसून येत नाही. आजच्या या 'समान हक्कांच्या युगात' तरुण–तरुणीना, स्त्री पुरुषांना एवढेच नव्हेतर लहान लहान मुलां–मुलींना सुद्धा 'समान हक्क' पाहिजेत. मग ते कोणत्याहि बाबतीत असोत, ते हवेच आहेत. त्यातील बरेचसे मिळाले पण आहेत. नांवे ठेवण्यांत (लहानपणी 'मूळ नांवे ठेवतांना) सुद्धा त्यांच्या आई वडिलांनी समान हक्काचा पुरस्कार केलेला आपणाला दिसून येतो. उदाहरणार्थ– 'विजू' हे एक दोन अक्षरी. बोली भाषेतील साधेच नांव घ्या. येथे 'विजू' म्हणजे मुलगा विजय, का मुलगी विजया? अशा वेळी आपणाला वस्तुस्थितीचा आधार घ्यावा लागेल, म्हणजे त्या 'विजू' ला पाहिल्याशिवाय आपण नक्की अनुमान करू शकत नाही. कारण म्हणतात ना प्रत्यक्ष डोळ्याने पहाणे आणि नुसते कानाने ऐकणे यात चार बोटांचे अंतर असते. मग नुसते 'विजू' हे शब्द कानाने ऐकण्यापेक्षां आपण प्रत्यक्ष 'विजू' लाच पाहिलेले बरे! आता 'विजू' ला पाहणें झाले तर ते सुद्धा चांगले बारकाईने निरखून पाहिले पाहिजे. या 'समान हक्कांच्या युगात' नुसते देवासारखे ओझरते दर्शन घेऊन विजू मुलगा कां मुलगी हे सुद्धा सांगता यावयाचे नाही. कारण विजय हा 'आधुनिक हिप्पी' बनला असेल. आणि नॅरो किंवा बेलबॉटमची पँट आणि ब्रासो मधील ब्लाऊज पीसचा मॅनिला वापरून एखाद्या प्रख्यात नटीसारखा चालत असेल तर...तसेच विजयासुद्धा त्याच पोशाखात असेल, तिने साधना कट केलेले केस आणि पुरुषी चाल ( चालण्याची ) अवलंबिली असेल कोणताही सामान्यच नव्हे तर धूर्त माणूस सुद्धा फसेल की नाही ?

नांवाला काही अर्थ नसतो असे म्हणतात पण मला तर नेहमी नांवाचा अर्थ लावून पहावेसे वाटते. प्रवासात एक वेळ मी सहज वर्तमान पत्रावर दृष्टिक्षेप टाकला होता. माझे डोळे एकाच ओळीवर स्थिरावले. ती ओळ म्हणजे– " कुप्रसिद्ध डाकू दयासिंगला अटक " म्हणजे 'दयासिंग' या नांवाची व्यक्ती दुसऱ्यावर दया दाखवायचे सोडून उलट दुसऱ्यांचे जीव घेत होती. लोकांना त्रास देत होती. दयासिंगाने दयेचा त्यागच केला होता की काय देव जाणे ! नांवात केवढी ही विसंगती !! त्याचप्रमाणे कथा कादंबऱ्यातील किंवा

चालू जमान्यातील एखाद्या वेश्येचे नांव सुद्धा 'सुशीला' असतेच की ! शील राखावयाचे बाजूलाच, त्यांतून चांगले शील संपादन करणें तर राहूद्याच पण उलट अब्रू वेशीवर टांगणाऱ्या किती सुशीला आज या जगात शीलाने सुशोभित आहेत माझ्या माहिती प्रमाणें पंढरपूर येथे तर एका भिकाऱ्याच्या दोन्ही डोळ्यानी आंधळ्या असणाऱ्या मुलीचे नांव तर चक्क 'सुलोचना' असे होते. जिला 'सु' लोचन राहिलेच पण लोचन तरी नीट असावेत की नाही. परवा तर बाजारात आजची एक 'सुधारलेली, सुशिक्षित महिला' आपल्या चुकलेल्या मुलीस "सुवर्णा ऽऽए ऽऽ सुवर्णा ऽऽऽ" असे म्हणून मोठ्याने हाका मारत होती. जेव्हा पोलीस दादाने त्या सुवर्णाला आणून तिच्या हवाली केले तेव्हा बऱ्याच लोकांना तिच्या त्या मुलीच्या काळेंशार वर्णाकडे पाहून शंका आली ती हीच का 'सुवर्णा !' नांवातील ही विसंगती आपणाला व्यवहारांत नेहमी जाणवते कळून येते, त्यामुळें नांवाची सार्थकता मनाला पटत नाहीच पण विसंगती मात्र दिसून येते.

पुष्कळ लोकांना आपल्या मुलांची नांवे थोर लोकांच्या नांवाप्रमाणें किंवा साधु संतांची, थोर महात्म्यांचीं अशी नांवे ठेवावीशी वाटतात आणि ते आपली ही हौस बारशाच्या दिवशी भागवूनही घेतात काहीना तर बालक जन्माच्या आधीच नांव ठेवण्याची लहर येते. तेव्हापासूनच 'नाव निश्चिती' मनांत फिक्स् झालेली असते. उदा. 'ज्ञानदेव' हे नाव घ्या. ज्या ज्ञानदेवानी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी 'ज्ञानेश्वरी' लिहिली. त्याचाच नांवकरी ( नांव धारण करणारा ) आजचा 'नामधारी ज्ञानदेव' वयाच्या १६ व्या वर्षी एस्. एस्. सी. सुद्धा पास होऊ शकत नाही तर पंढरी-आळंदीच्या ( मार्च–ऑक्टोबरच्या ) वाऱ्या करीत २५ वर्षे पर्यंत बसलेला असतो. असे कितीतरी 'ज्ञानदेव' आज समाजात आहेत. त्याचप्रमाणें 'तुकाराम', 'नामदेव' 'श्रीराम' 'रामपूरचे लक्ष्मण' ही सर्व आधुनिक संत मंडळी केवळ 'नामधारी' नव्हेत काय ? माझ्या शेजारी एक विद्याधर राहतो तो असा आहे की त्याला साधे पुस्तक हातात धरता येत नाही. एवढेच नव्हे तर साधा अक्षर–ओळखही नाही. त्याला शिक्षणाबद्दल चीड येते. जो प्रख्यात 'मटके बहाद्दर' आहे. त्याने किती विद्या धारण केली असेल ते देवच जाणो. कारण संस्कृतमध्ये म्हटलेच आहे की, स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम् देवो न जानाति कुतो मनुष्यः ।

नांवे ठेवताना ( लहान मुलांची नांवे ठेवताना ) काही लोकाना आपल्या मुलांची नांवे त्यांची जन्मपत्रिका पाहून, जन्मराशी व कुंडली अगदी काटेकोरपणे पाहून त्याप्रमाणे जुळणारी नांवेच ठेवण्याची सवय म्हणा अगर हौस म्हणा असते. त्यामुळे ती नांवे त्यांना आवडतात, मनाला पटतात पण बाह्य जगात त्याच नांवाचे हसे होते. अशीही काही नांवे उदा. सर्व दमन अधिकराव, धनराज, गिरिजाधर, शेषराव, नाशिकराव इत्यादि काही लोक आपल्या मुलांची नांवे जोडाक्षराने युक्त अशी मसालेदार ठेवतात की त्या नामधारी व्यक्तीला स्वतःचे नांव नीट लिहिता देखील येत नाही शाळेत तो गेला तरी पी. एस्. सी. ओलांडेपर्यंत नीट लिहिता येत नाही. कारण मराठी शाळेत आता नवा आणि जास्त अभ्यास अंतर्भूत झाला आहे मग नांवाची 'शुद्ध लेखन शैली' या विषयाला थाराच नसतो. अशी नांवे:– व्यंकटेश, त्र्यंबक, राजश्री, शत्रुघ्न, विष्णु, अहिल्या, ईश्वरलाल, अब्दुल, महंमद इत्यादि तसेच ही नांवे उच्चारावयास पण जरा अवघड होऊन ती अपभ्रष्ट होतात. उदा. 'त्रिबक' चा 'तिरमक' होतो शत्रुघ्न चा शतरूघन इत्यादि.

अलिकडे तर नित्य नवीन नांवे ऐकून काही काही पालकांना आपल्याची दोन दोन नांवे ठेवावीशी वाटतात. ते तशी ठेवतात ही ! परवाच माझ्या एका मित्राचा मुलगा 'गोपाल' याचा नामकरण समारंभ होऊन त्याचे नांव 'राजाराम' ठेवण्यात आले. यात त्या मित्राला अगर त्याच्या मुलाला काय लाभ झाला हेच न कळे मला ! पण मला प्रश्न एवढाच पडत होता की त्याने इतके दिवस गोपाल म्हणजे भगवान श्रीकृष्णाच्या नांवाचा जप केला आणि तो पूर्ण झाला असे समजून राजाराम या नावाने राम नामाचा जप सुरू केला वाटते, पुढे आणखी कोणत्या नामाचा जप करणार आहे ते त्यालाच ठाऊक !

नांवाचा अर्थाशी काही संबंध नाही असे दिसून आल्यावर 'नांवाचे' अन्य भाषेत रूपांतर करून काही अर्थ निघतो कां ? हे पाहण्याची मला खुमखुमी येते. त्याचे कारण असे की एकदा अडाण्याने मला विचारले होते, कायहो तुम्ही इंग्रजी शाळेत तर सांगा बरे माझे इंग्रजीत नांव काय ते ! मी त्याला विचारले 'सांगा आपले शुभनाम. तो म्हणाला माझे नांव 'ईश्वरनाथ' आहे ( मी मनांत विचार केला ईश्वर म्हणजे God आणि नाथ म्हणजे Master ) आणि मी सांगितले तुमचे नांव इंग्रजीत God Master असे होईल. त्याला बरेचसे नवल वाटले व तो जरा हसला, त्याला असे नवल कां वाटले असावे. हे मला अजूनही सांगता येत नाही. याचप्रमाणें मी आणखी अशाच प्रकारची नांवे Translation करून ठेवलेली आहेत त्यापैकी काही अशी– नागनाथ नाग + नाथ Snake + Master काळ राम = Black-Ram पांडुरंग=पांडु+रंग= White Colour कमल Lotus नामदेव Name-God एक नाथ = One Master. तरीहि असे Translation करून मनाचे समाधान होतच नाही.

पुष्कळशा लोकांना आपल्या नांवाची प्रसिद्धी करण्याची हौस असते. सत्कार्याने नांव प्रसिद्ध होत नसेल तर मग 'येन केन प्रकाराचा' अवलंब करावा लागतो. उगीच आवडी निवडीचा विचार न करता विविध भारतीला आपली गाण्याची ... ... गाणे ऐकण्याची.....पसंती कळवून आपले नांव स्वतः ऐकणे व दुसऱ्याच्या बहुमोल वेळ घेऊन त्याच्याहि कानी उतरविणें ही संवयच लागली आहे. आजच्या या फॅशनेबल दुनियेत दररोज नित्य नवीन अशी नाविन्यपूर्ण नांवे आपल्या कानावर पडतात उदा. जितेंद्र, धर्मेंद्र, राजेश, अभिताभ, रेहाना, संजाना, बबिता, शर्मिला, जया इ. अशी नांवे ठेऊन आजचे पालक आपल्या जीवनांत फिल्मसृष्टी आणू इच्छितात की काय ते, ते स्वतःच जाणोत. नांवे ठेवण्यात फॅशन तर आहेच पण त्याहूनहि खरी फॅशन ठेवलेली नांवे उच्चारण्यात, Short Cut च्या सौजन्याने म्हणण्यात आहे उदा. 'श्यामला' ला शामा सुवर्णाला 'सोना' रविंद्रकुमारला 'रवि' इ. अशी शब्दातही बचत !



सारांश, "नांवात नसे अर्थ काही" ही माझी व्यथा मी आपणापुढे मांडली आहे. आपणहि आपल्या शुभनामाचा अर्थ लावून पहा बरे ! आपल्या नांवात सार्थकता असेल, सुसंगति असेल, नसल्यास तो दोष तुमचा नाही. कारण 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' वास्तविक आपल्या नांवात अर्थ असो, नसो. पण नांव असणें हे अपरिहार्य आहेच. तर मग तुम्ही–आम्ही आपणा सर्वांच्या भावी पीढीच्या शुभनाम समारंभाच्या वेळी कर्तव्यदक्षतेने आपल्या बालकांची नांवे ठेवाल अशी अपेक्षा मी बाळगतो. नांवात काही तरी अर्थ असावा, सार्थकता असावी हा माझा एक आग्रह आहे. अतिआग्रह नव्हे पण नांवे ही नांवे मिळविता येण्याजोगी असावीत नाहीतर आपले चालूच आहे की, नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा !

• • • •

★ मे. कोठारी ब्रदर्स ★ फोन नं. ३६६

बारामती ( पुणे )

कोठारी मेडिकल अॅन्ड जनरल स्टोअर्स फलटण

★ सर्व प्रकारची देशी व विलायती औषधे,
★ मोटार सामान,
★ टायर व ट्यूब्ज,
★ इलेक्ट्रिक सामान,
★ बल्ब,
★ उपा शिवण यंत्रे व पंखे,
★ देशी व विदेशी पद्धतीचे खेळांचे साहित्य.

अत्यंत माफक दरात मिळेल.

अद्ययावत पद्धतीचे तयार कपडे
व
विनर होजियरीचे अधिकृत विक्रेते

महावीर
रेडिमेड स्टोअर्स

जैन मंदिरासमोर, मेन रोड,
बारामती (जिल्हा पुणे)

सावंत टुरिस्ट सर्व्हिस

सिनेमा रोड, बारामती (जि. पुणे)

प्रोप्राः- एस. एम. सावंत



# ★ व्यथा ...

**प्रमोद शिंदे**
पी. डी. सायन्स

तेव्हा मी कोणत्या वर्गात होतो बरं ? नक्की आठवत नाही. कदाचित् दहाव्या इयत्तेत असेन मी. कदाचित अकरावीत सुद्धा. तेव्हाची गोष्ट आज कशी आठवली ? एका मित्राने मला विचारले. सामान्य माणसाच्या जीवनात देखील अविस्मरणीय प्रसंग घडतांत कधी कधी ! ते घडतात तेव्हाच समजतात. त्यापूर्वी ते कधी घडतील अशी पुसटशी कल्पना देखील नसते मनुष्याला. असे प्रसंग अचानक घडतात: क्षणात घडून येतात. पण त्याचा ठसा दीर्घकाळ टिकतो, स्मृती फक्त मागे राहतात, आठवणी ?... अहो त्या आयुष्यभर पुरतात. काही आयुष्यभर गोडवा देणाऱ्या असतात काही अगदी उलट.

काय म्हणालात ? माझ्या वाटचाला कोणत्या आल्या ?

चांगल्या ? ..... साफ चूक !

अरे हो, पण वाईट सुद्धा म्हणता येणार नाहीत!

मग ? ...... चांगल्या आणि वाईट ? ....

हो, तसे म्हणायला हरकत नाही. पूर्वार्ध चांगला, आशा आकांक्षानी भरलेला त्यांत नशा होती, बेहोशी होती, ... ... ..

अन् उत्तरार्धात ? त्यांत निराशा होती. एक भंगलेले स्वप्न होते, आग होती.

त्या आगीमध्यें जळणारे एक मन होते. कदाचित् दुसरेही एक असेल. नाही पण ऽऽ

असेलच असे म्हणता येणार नाही.

कां ?... .. ... ... ...

अहो असे कां म्हणून काय विचारता ? दुसऱ्याच्या मनातलं आपल्याला काय माहीत ?......

मग एकच होते असे म्हणू ---- चालेल ?

वरं ऽऽ मी अन् माझी आठवण ---- चांगल्या वाईटाचं मिश्रण.

मिश्रण ? हो मिश्रणच, कां ?

त्यात चांगल्या आठवणी होत्या. एकत्र होत्या. पण त्यांची वैशिष्टचे भिन्न होती.

चांगल्या ...... अगदीच, सुखद, गोड ...... आणि वाईट, अतिशय वाईट, बोचऱ्या, चावऱ्या, झोंबणाऱ्या थंडी सारख्या ...... छे ! छे !! थंडी नेहमीच कांही वाईट नसते ! कधी कधी चांगली सुद्धा असते. मग उन्हासारख्या ? वैशाखातील, भाजणाऱ्या – जाळणाऱ्या ? तशा. पण अगदी तशाच नाही ...कारण ...

त्यांतून कांहीतरी चांगलं तरी निर्माण होतं. ... ...

यातून ?......यातून फार वाईट.
जाळणार एकाला.
एकाला ? ...... कोण तो ओळखा पाहू ? ...
बरोबर ओळखलंत !
मीच तो हतभागी, हतभागी !

असं काय घडलं ? काय घडायचं बाकी आहे ? सगळं संपलंय, घडून गेलंय पण विसरलं गेलं नाही; जाणार नाही. कां ? ...... घाव जिव्हारी बसलाय. जखम मोठी आहे, खोल आहे. न बरी होणारी, खपली न पडणारी, चिघळणारी.

मधुमेहाच्या माणसाच्या जखमेसारखी ?
हो अगदी तशीच.

केव्हा झाली ? ...... मधुमेहाच्या काळात. कुणी केली ? काळानं, नशिबानं ? समाजानं ? एखाद्या माणसानं !

नशिबानंच म्हणावं......
कारण ?......
एक स्त्री, तिचं मन......
कुठे भेटली ? केव्हा भेटली ? परिचय कसा झाला ? केवढी होती ? कोण होती ? राहायची कोठे ?
हो.....हो ! सांगतो, सर्व कांही सांगतो.

भेटली नदीच्या घाटावर, त्या गोष्टीला झाली जवळ जवळ ४० वर्षे. आता आमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या आल्या. दिवस रात्रीची अनेक ओली-सुकी पानं काळाच्या वाऱ्याबरोबर केव्हाच निघून गेली. परंतु ही स्मृती अजूनही ताजी आहे.

तेव्हा ती होती १४।१५ वर्षांची, रहायची शेजारीच. मोठी गोड, दिसायला सुरेख, चतुर, ओळखीची. भेट म्हणून दिली गाभूळलेली चिंच. मैत्री पण चिंचेच्याच चवीची. गोड आणि आंबट......

कितीं दिवस टिकली ?
खूप...खूप ८।९ वर्षे.

पण नुसती मैत्रीच नाही, त्यात इतर भावनांचा सुद्धा प्रवेश झाला होता. जिव्हाळा होता, आपुलकी होती. प्रेम पण होतं.

खरोखरच ! प्रेम हे एक असे अद्भुत रसायन आहे, की ज्याच्या स्पर्शानं लोहाचं सुद्धा सोनं होतं. एखादी व्यक्ती आपल्याला कां आवडावी याला कसला आलाय कार्यकारण भाव ? आपलेपणातच एक संपन्नतेची विलक्षण शक्ती असते.

प्रेम होत ? ..... मग काय झालं ?

मनुष्याच्या आयुष्यात अनेक गोष्टींची उत्कटता वाढत जावी आणि कमी व्हावी असा कांही नियम आहे कां ? की कुठल्याही गोष्टीचा अखंड सहवास मनुष्याला मिळत नाही ? दोन घटका करितांच मनुष्यानं परस्परांच्या सहवासात याव असं कांही आहे कां?

ती सुंदर होती, सुशील होती. पण.....

कित्येक वेळा माणसाला परिस्थितीपुढं नमावं लागतं, माणूस परिस्थितीचा गुलाम बनतो.. अशा वेळी माणसाला दोष देणं मूर्खपणाचं आहे. काय दोष असेल तर तो त्या परिस्थितीचा !

व्यवहार आडवा आला, नशीब आलं ? ती श्रीमंत नव्हती. तिचे वडील गरीब होते.

आणि मी ?...
मी कोण होतो ?
एका इनामदाराचा एकुलता एक मुलगा.
घोडा गाडीतून फिरणारा.
मोठ्या वाड्यात राहणारा !
मग काय झालं ?...
इथंच सारं संपलं.
उरली ती फक्त आग.
जाळणारी, शरीर-मनाचा दाह-दाह करणारी.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती



# आमचे ग्रंथालय

महाविद्यालयात ग्रंथालयाचे महत्व फार असते. शरीरात शरीराच्या वाढीसाठी रक्ताचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने हृदयाचे जे महत्व, तेच ग्रंथालयाचे महाविद्यालयातील महत्व आहे. आणि त्याच दृष्टिकोनातून आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची काळजीपूर्वक वाढ करण्यात येत आहे. विविध विषयांच्या अध्यापनाची सोय झाल्याने व एम्. ए. एम्. कॉम्. चे नवीन वर्ग निघाल्याने आणि विद्यार्थ्यांच्या संख्येतही भरपूर वाढ झाल्याने तीन प्रशस्त खोल्यांचे एकीकरण करुन एक अद्यावत् असे ग्रंथालयाचे दालन निर्माण केले आहे. त्यात विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या स्वतंत्र अभ्यासिकेची सोय आहे. आमचे ग्रंथालय सकाळी ८ ते सायंकाळी ५·३० पर्यंत उघडे असते. गरजू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशा रात्रीच्या दोन अभ्यासिकांची सोय करण्यात आली असून या अभ्यासिका सायंकाळी ५ ते रात्री १२ पर्यंत उघड्या असतात.

आमच्या महाविद्यालयात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना त्यांना आवश्यक अशी पाठ्यपुस्तके बुकबँकेच्या वतीने पुरविण्यात येतात. यावर्षीही ३६७ गरजू विद्यार्थ्यांनां १००६ पाठ्यपुस्तके दिली आहेत.

चालू शैक्षणिक वर्षात रु. १९०००·०० किमतीच्या १९०० ग्रंथांची भर पडली असून आमच्या ग्रंथालयातील ग्रंथसंख्या आता १४५५० झाली आहे.

पुणे विद्यापीठाने आम्हाला युनिव्हर्सिटी टेक्स्ट बुक बँक अॅण्ड रिडिंग सिटस् स्किमखाली १२५० रु. ची मदत दिली आहे. याशिवाय Cosip योजनेखाली ६ पुस्तके दिली आहेत.

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग भारत शिक्षण प्रकाशन विभाग, नावस्थी प्रेस एजन्सी मास्को, ए. डी. श्रॉफ मेमोरियल ट्रस्ट मुंबई, फोरम ऑफ फ्रि एंटरप्राईज मुंबई, सेंटो (U.S.) टाटा सर्व्हिस मुंबई, प्रा. सी. एस्. भुतडा (कॉलेज ऑफ सायन्स, खामगाव), प्रो. ए. जी. लेले (नासिक) यांच्याकडून आम्हास ग्रंथरुपाने साहाय्य मिळाले. युनायटेड स्टेटस् इन्फरमेशन सर्व्हिस मुंबई याचेकडून १०० पुस्तके वर्षभर वापरणेस मिळाली. या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

तालुका पंचायत समिती, बारामती यांनी महाविद्यालयातील बुक बँकेत अधिक पुस्तकांची भर टाकता यावी म्हणून रु. २००० अनुदान देण्याचे मान्य केले आहे. याबद्दल पंचायत समितीचे सभापती श्री. शिवाजीराव भोसले, बी. डी. ओ. श्री. सावंतसाहेब व मान्यवर सभासदांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

आमच्या महाविद्यालयांत १४८ नियतकालिके येतात. त्यापैकी ३० नियतकालिके भेट म्हणून संबधित प्रकाशन संस्थांकडून येतात. प्राचार्य एम्. जी. भोरे, प्रा. एस्. आर. नवाथे, प्रा. डॉ. सुर्वे प्रा. बोंद्रे यांनी मौलिक ग्रंथ ग्रंथालयास भेट दिले. त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार. महाविद्यालयास भेट देणाऱ्या मान्यवर पाहुण्यांनी ग्रंथालयास भेट देऊन समाधान व्यक्त केले आहे.

प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी यांचे हार्दिक सहकार्य आम्हास नेहमीच मिळत आले आहे. सर्वांचे आभार

प्रा. डॉ. जे. के. गोधा
M.Com; B A, LLB. Ph.D.
ग्रंथालय प्रमुख

श्री. सुरेशकुमार एन्. पाटील
B Sc. (Hons.) B Lib.Sc.,
ग्रंथपाल

# मे. ए. के. फखरूद्दिन

## जनरल हार्डवेअर मर्चंट

**बारामती**

घरी ५५३ यांचेकडून शुभेच्छा दुकान ३७९

**-: अधिकृत विक्रेते :-**

१) इंडिया सिमेंटस् लि. मद्रास फॉर शंकर सिमेंट
२) गुडइयर इंडिया लि. मुंबई फॉर बेल्टस् अँड होजपाईप्स
३) जॉन बेकर अँड सन्स मुंबई फॉर स्टील फाईल्स
४) न्यू इंडिया इलेक्ट्रिक कार्पोरेशन मुंबई फॉर इलेक्ट्रिक मोटर्स

## पुरुषोत्तम रामचंद्र जाधव

चिवडेवाले (सोलापूरकर)
बारामती

पेढे, बर्फी, फरसाण, गुलाबजाम, बदामी हलवा, माहीम हलवा, उत्तम लोणी व ताजा मलईयुक्त चक्का मिळण्याचे ठिकाण.

- फोन -
ऑफिस-३५० घरी-५५०

## प्रकाश गुडस् ट्रान्सपोर्ट कंपनी

आमच्या येथे भारतात कोठेही लाईट व हेवी मशिनरी यांची वाहतूक केली जाते.

## प्रकाश टुरिस्ट सेंटर

लक्झरी कार व टुरिस्ट गाड्या भाड्याने मिळतील.

प्रोप्रायटर-
छवळीकर बंधु, बारामती




माननीय प्राचार्य- डॉ. अक्कोळे यांचा सत्कार - व - त्यांना भावपूर्ण निरोप.



प्राचार्य भोरे सत्कार करतांना.



प्रा. नवाथे प्राध्यापकांच्यावतीने भेट देतांना.



कर्मचाऱ्यांच्या वतीने श्री. सुरवडे भेट देतांना.



विद्यार्थ्यांच्यावतीने सत्कार.



डॉ. अक्कोळे यांचे सत्काराला उत्तर.



अध्यक्षीयसमारोप. प्राचार्य अण्णासाहेब मुळे



प्राचार्य व प्रमुख पाहुणे श्री. अप्पासाहेब पवार यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य.

10



पाहुण्यांचा सत्कार.



पाहुण्यांचे भाषण.





संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. लालचंद हिराचंद यांच्या समवेत - गव्हर्निंग कौन्सिलचे सभासद चर्चा करतांना-

# पारितोषिक वितरण - समारंभ.



प्राचार्य भोरे स्वागत करतांना.



प्रा. नवाथे - अहवाल वाचन.



प्रमुख पाहुणे- प्रा. डॉ. शेजवलकर भाषण करतांना.



अध्यक्ष- श्री. आगवणे भाषण करतांना.



प्रा. डॉ. शेजवलकरांचा सत्कार



अध्यक्ष- श्री. आगवणे यांचा सत्कार.

# साथ

**बाळासाहेब शिन्दे**
टी. वाय्. बी. कॉम्.

आज सगळा गांव शंकराच्या मंदिराचा गाभारा पाण्याने भरणार होते. देवाला कोंडणार होते. देवाला आपलं कोडं सांगणार होते; स्तोत्र गाणार होते. हे कोडं होत पावसाचं. आज त्यामुळे सारे लोक हवाल–दिल झाले होते, मनुष्य अन्नाला महाग झाला होता. इतकेच काय पण जनावरांना खुरटं गवत देखील नव्हतं. पावसानं कुठं दडी मारली होती कुणास ठाऊक ? रोज नुसतं उकडत होतं पण पाऊस कुठं पडल्याची वार्ता नव्हतो. मनाला वाटे. असो. आपल्या इथं नाही तर नसो पण कुठं तरी पडावा पण छे..... !

दगडू ओसरीवर बसला होता. तो आपल्या दृष्ट लागेल अशा बैलांची अवस्था बघत होता. ती त्याला बघवत नव्हती. त्याचा नाइलाज होता. तो एकवेळ स्वत: उपाशी रहात असे परंतु बैलांना देत होता परतु ते त्यांना अपुरं होतं. उसाचा पाला–पाचोळ्यावर कसे तरी चाललं होतं. इतर वेळेस दोन वेळेस पेंड देत होता ती तो त्यांना। एकवेळ नव्हे आठवड्यातून एकवेळही देऊ शकत नव्हता. आता तो हवालदिल झाला होता कष्ट करण्याची ताकद होती पण कष्टाचं रानच नव्हतं.

दगडू एक चांगल्या पैकी शेतकरी होता. जिरायती २०–२५ एकर जमीन होती. चार बैल होते. गायी होत्यां. शेळ्या होत्या पण सगळं असून नसल्यागत झालं होतं. पावसान योग्य साथ दिली तर तो दोन तीन खंडी ज्वारीचं पीक घेत होता. आज तीन वर्ष दुष्काळ होता पण या वर्षी तो जास्तच भडकला होता. गोर–गरिबांना ज्वारी वाटणारा दगडू परंतु आज त्यालाच त्याची चिंता पडली होती. त्याच्या बायकोचं नाव होतं सरूबाई मोठी कष्टाळू बाई. चार चार बायाचं काम करावयाची एकटी. मोठी सांसारिक शहाणी बाई म्हणून तिची गांवभर ख्याती होती. पण आज . . . .

आता दगडू आणि सरू सरकारी काढलेल्या दुष्काळी कामावर जात होती. सारा गांव दुष्काळी कामावर होता. तान्हं पोरगं रडत असताना थोरल्या पोराजवळ एका झाडाखाली बसवत होती. मायेचा पान्हा फुटत होता. मुकादमाच्या कुरकुरण्यामुळे तो ती तसाच आवरत होती, तान्ह्या पोराला असं रडत टाकून ती स्वत:साठी नव्हे पण आपल्या छोट्या जिवासाठी करत होती. स्वत: कधी उपाशी पोटी रहात होती. दगडू नि सरूचे मिळून दोन-अडीच रुपये मिळत होते. बैला–साठी आठ आणे तरी खर्चावे लागत होते. उरलेल्या पैशातून दोन किलो ज्वारी येत होती. त्यातच अनेक गोष्टी होत्या. असं जीवन नको झालं होतं. नशिबाला दोष देत पण त्यावर भरोसा टाकून लोक जीवन जगत हो..

एकदा संध्याकाळी दगडू नि सरूबाई बसली होती. दगडूची नजर बैलावर होती, त्यांच्यासमोर टाकलेलं संपलं होतं. राजा बैल दगडूकडे बघत होता. दगडू डोळ्यात आंसवं आणत होता. सरूबाईच्या हे लक्षात येत होत. आजवर ती शांत होती पण तिच्यान आज राहवलं नाही. ती दगडूला भीत भीतच म्हणाली, " मला असं वाटतं. आपण ढवळ्या व राजा विकून टाकू "

" काय ? – दगडू एकदम भानावर आल्यागत म्हणाला.

" होय; आपल्या दारात त्यांचे हाल नकोत. चांगल्या खात्यापित्या घरी द्या. त्यांचं नशीव त्यांच्या संगं " –सरू.

दगडू जरा रागवला, बिथरला पण त्याला परिस्थितीची जाण होती. त्यांनी विचार केला की सुकाळाच्या काळात पाच–पंचवीस रुपये जास्त देऊन परत आणू या. बस् ठरलं ! बैल बाजारात न्यायचे.

परवाच्या दिवशी बारामतीचा बाजार होता. पण दगडू रात्रभर जागाच होता. त्यांचे ढवळ्या–राजाला विकायला मन होत नव्हतं, पण परिस्थिती तशी होती. रात्रभर तो शुभ्र चांदण्याकडे क्रूर नजरेनं पहात होता.

गुरुवार उजाडला. बारामतीचा बाजार होता. दगडू पहाटेच रस्त्याला लागला होता. सकाळच्या सात–आठला बाजारात पोहोचला. बाजार गर्दीनं गच्च होता. दगडूसारखे अनेक हवालदिल आले होते. त्यांच्या तोंडावर दुःख. उदासीनता होती. मनात काहूर होतं विचाराचं. आपल्या आवडीच्या बैलाकडे ते वारंवार बघत होते. त्यांच्या तोंडावरून–पाठीवरून हात फिरवत होते. बाजारात जनावरांची खांडची खांड उभी होती अन् गिऱ्हाइकं होती. पण ते सारे व्यापारी, वांद्रयाला बैल, गायी धाडणारी. प्रत्येक जण म्हणत बैल त्यांना देणार नाही. पण दुसरं गिऱ्हाईक नव्हतं. शेवटी तो बैल कसावाला देत होता. अश्रू ढाळत होता. थरथरत्या हातानी त्याची दोरी सोडत होता, म्हणत होता, " मला क्षमा कर ! तू मला क्षमा कर !!

शिंदे फोटो आर्ट स्टुडिओ
फोटो डीलर्स, एन्लार्जमेंट आणि ऑईलपेंट पोर्ट्रेट कलर्स
गांधी चौक, बारामती
जि. पुणे
–० प्रोप्रायटर ०–
के. बी. शिंदे





मानेला गिळखा घालत होता. अन् झटसरशी बाजूला होत होता. नाहीतर त्यांच्या नव्या मालकाने ओढून चालविलेल्या त्यांच्याकडे पहात होता. दगडूनंही असा विचार केला होता, पण पक्का. दगडूचे बैल विकायला आलेले पाहून एक जण आला नि म्हणाला,
" केवढ्याला द्यायचे बैल; ;

दगडूने त्याच्या आवाजावरून पेहराव ओळखला
" मला बैल नाही विकायचे, – ताडकन् दगडू उतरला
व्यापारी विचकला.
" मग कशाला आणलेत ?– व्यापारी
अन् निघून गेला पण असा तसा नाही, डाव रचत, डाव खेळत मनाशी.
त्यानं एक खेडवळ मनुष्य गाठला व म्हणाला
' मी तुला दहा रुपये देतो माझं एक काम कर.,
" बोला, म्हणाल ते काम करतो"– तो माणूस
" तर ऐक. तो समोर माणूस बसलाय दोन बैल घेऊन; त्यांच्याकडून दोनशे रुपये देऊन बैल घे,–
" व्हय, मायबाप, आता येतो '– माणूस
" पण लक्षात ठेव तू बैल शेतीसाठी घेतोय"–व्यापारी
तो माणूस पैसे मिळाल्याच्या आनंदात दगडूपाशी गेला अन् बैलाविषयी बोलू लागला –
केवढ्याला द्यायचेत पाव्हण ?
दगडूनं वर पाहिलं. माणूस तर गरीब दिसतोय. अंगावत धड कपडा नाही. अन् बैल घेतो. !
कुणच्या गांवचं तुम्ही ? दगडूने प्रश्न केला
माणूस जरा घाबरला पण लगेच सावरुन बोलला
वागजचा हाय; माझ्या मालकानं धाडलंय मला. बैल खरेदीला. बोला किती घ्यायचे ?

दगडू विचारात पडला पण त्याचे बोलणे त्याला जरा पटलं तर जरा पटत नव्हते. पण त्याला बैल देण्यातच शहाणपणा आहे असे त्याला वाटलं.
तीनशे रुपये घेईन –दगडू
तीनशे ? खरं सांगा – माणूस
तसं पाहिल तर सातशेची जोडी होती पण किंमत पार

भरघोस पिकासाठी ...
टाटा फायझन पेस्टिसाइडस् व रॅलीची
''झाड छाप'' मिश्रखते
वापरा.

卐 रॅलीच्या मिश्रखतांनी जमिनीचा कस टिकविला जातो.
卐 कमी खर्चामध्ये भरपूर पीक निघते. 卐 माफक किंमती
द्राक्ष, ऊस, कापूस, धान्य, फळे, भाजीपाला वगैरे पिकांसाठी
खास मिश्रखते व गुजरात फर्टिलायझरचे अमोनियम सल्फेट व युरिया
मिळण्याचे ठिकाण–
एजंट–
मे. छगनलाल निहालचंद मुथा
सर्व प्रकारचे बी-बियाणे, किराणा मालाचे व्यापारी
फोन– ३८१
बारामती, जिल्हा-पुणे

उतरल्या होत्या.

' ही बघ दोनशे देऊ का ?' माणसानं प्रश्न केला शेवटी दोनशे रुपयावर सौदा जमला. दगडूने बैल दिले अन् घरी आला. सरू वाट पहातच होती.

' विकलस् वाटतं ढवळ्या राजांशी' – सरूबाई

' व्हय. दोनशे रुपयाला विकलं.' दगडू दुःखी अंतःकरणाने म्हणाला

' पैसाच नाही. मग शेतकऱ्याशी विकली नव्हं.' –सरू. दगडूला होय म्हणावं की नाही, हा प्रश्न पडला. त्याच्या मनात काही सलत होते. चुकल्यागत वाटत होतं. शेवटी म्हणाला – ' होय, शेतकऱ्याला विकलं. "

त्या रात्री दगडू रात्रभर झोपला नाही आपल्या आवडीच्या बैलाची त्याला आठवण येत होती, व्याकुळ होत होता. वाईट विचार येत होते.

शुक्रवार उजाडला होता अन् मावळत होता. सकाळी कामावर गेलेली मंडळी घरी परतत होती. खरं तर सारा गावच कामावर गेला होता. प्रत्येकाला सायंकाळची चिंता होती. दगडू अन् सरूबाई कामावरून घरी आले होते. सरूने थोरल्या पोराला आटा आणायला लावलं होतं.

दगडूही उरलेल्या दोन बैलांसाठी कडबा आणायला गेला होता. तिथं त्याला नको ते ऐकायला मिळालं.

' आरं, शेवटी त्वां बैलं कसायाला विकली " रामा ढवळे गोप्याला म्हणाला,

" अरं दुसरं गिऱ्हाईकच नव्हतं " – गोप्या

" अरं दावणीला मरायची " – ढवळे

" म्यांच एकल्यानी इकली काय ? – गोप्या

" मग, दुसरी कुणी रे " – मध्येच ढवळे बोलला

" दगडूनं. राजा–ढवळ्या " – गोप्या

तेवढ्यात दगडू तिथं पोहोचला होता. दगडूला पहाताच ढवळे म्हणाला

" काय रे बैल अखेर कसाबालाच इकली की "

" काय ? " दगडूनं बिथरल्यागत विचारलं.

" अरं, गोप्याच सांगतोय " – ढवळे

" व्हय, व्हय, म्या डोळ्यानं बघितलं " – गोप्या.

" गोप्या काय बी बोलू नकोस " –दगडू.

" मला काय करायचं खोटं बोलून! हवं तर पहा चाँदच्या दावणीला. त्याच्या बोलण्याने दगडू बिथरला; ओरडला, " गोप्या आईची शपथ घेऊन सांग, हे खरं आहे "

गोप्यानं आईची शपथ घेऊन हे खरं असल्याचं सांगितलं. दगडूनं पट्‌दिशी दोन पेंड्या घेतल्या, पैसे दिले की घर गांठलं. मनाला वाटेल ते बोलू लागला –

' मी पापी आहे.–' आणि पटकन् खाली बसला.

सरू घाबरली, तिनं विचारलं –

" अहो असं झालं तरी काय तं तर सांगा "

" मी ढवळ्या–राजाला कसायाला विकलं; मी त्यांचा बळी दिला, मी त्यांना मारलं, मी पापी आहे " –दगडू बडबडत राहिला.

' मी त्यांना घरी आणीन तरच घरी येईन. '

दगडूनं शपथ घेतली. त्याच घटकेला दोनशे रुपये कमरेला खोवले, अन् गावाकडे पळत सुटला. रात्रीचा दहाचा सुमार होता पण त्याला त्याची पर्वा नव्हती. सरूबाई रोखत असता दूर ढकलून देऊन तो गांवाकडे निघाला होता.

सकाळच्या सुमारास तो गावात आला. तो सरळ चाँदच्या दावणीकडे गेला. त्याने सारी दावण शोधली पण त्याला राजा–ढवळ्या कुठंच दिसली नाहीत, त्याला जरा बरं वाटलं. आपल्याला गोप्यानं बनवलं असं त्याला वाटलं. पण त्यानं तर आईची शपथ वाहिली होती तो खोटं बोलणार नव्हता. त्यानं सरळ चाँदचं घर शोधलं. चाँद बाहेर येताच दोघंही बुचकळ्यात पडली. दगडूला आठवलं, यालाच बैल देणार नाही म्हटलं होतं आपण. चाँदने हसून विचारलं –

" काय काम आहे "

" मला माझे बैल दे " – दगडू

" बैल ? कोणाचे बैल " – चाँद जणू कांही समजलं नवीन असल्यागत म्हणाला.

" नको, चाँद माझे ढवळ्या–राजा मला देरे " – दगडू कळवळीनं म्हणत होता. चाँदच्या मनात चलबिचल झाली.

कांही झालं तरी तो माणूस होता. त्याला मन होतं. त्याचं मन भरून आलं. दगडूच्याप्रेमापुढं त्याची क्रूरता फिकी पडली होती. मेली होती. चाँद कांहीच बोलत नव्हता. फक्त ऐकत होता. भरल्या डोळ्यांनी प्रेमाचा ओघ पहात होता. पण आता त्याचा इलाज नव्हता. केव्हाच बैल वांद्र्याला रवाना झाले होते. अन् ते जिवंत असणे शक्यच नव्हते. चाँद स्तब्ध उभा राहिला. पण समोर दगडूचा आक्रोश, त्याचं ओरडणं त्याला पहावलं नाही. तो माघारी फिरला, तोच त्याचे दंड दगडूनं धरले अन् म्हणाला –

" हे घे पैसं. तुला आणखी देईन पण माझ्या ढवळ्या–राजाशी परत देरे ! "

दगडूच्या हातावर चाँदची आसवं पडत होती. दगडू चाँदकडे पहातच राहिला अन् भयभीत झाल्या सारखा म्हणाला –

" म्हंजी ढवळ्या-राजा आता जगात नाहीतं "

चाँद काहीच बोलत नव्हता. फक्त उभा होता अश्रू ढाळत.

दगडू उमगला, समजला. त्याला ढवळ्या राजा जगात नाहीत ही कल्पना देखील करवली नसती. पण हे सत्य होते. दगडू धाडकन् जमिनीवर कोसळला, बेशुद्ध झाला. आजूबाजूचे लोक जमले होते. त्यांनी दगडूला उचललं अन् त्याच्या घरी पोहोचतं केल. दगडू घरी आला होता पण देहानं. त्याचा त्याच्यावरचा ताबा कधीच सुटला होता. दगडू शुद्धीवर यायचा अन् बडबडायाचा –

" माझा ढवळ्या–राजा जगात नाहीती. मी पापी... "

अन् तेवढ्यातच शुद्ध हरपायचा. त्यांन अन्नच काय पण पाण्याला स्पर्श केला नव्हता. गांवातले लोक त्याला बळेच पाणी पाजत होते त्याची समजूत घालत होते, पण छे !

..... आणि एके दिवशी दगडू आपल्या प्रिय साथीदारांना साथ देण्यासाठी निघून गेला होता, आणि उरला होता फक्त सरूबाईचा आक्रोश !

卐

★ सर्व प्रकारची होजिअरी
★ फॅशनेबल तयार कपडे

प्र
प्र का श
श

रेडिमेड स्टोअर्स
जैन मंदिरासमोर, मेनरोड,
बारामती जि. पुणे
४८४

नयनरम्य रंग व मनमोहक डिझाईन सुच्या.
नित्य नूतन फॅशनच्या तयार
कपड्यांचा खजिना !
३५६
★ राजेंद्र ड्रेसेस ★
स्टेशन रोड,
बारामती
(पुणे)

# भोवरा

जगदीश वाळके
टी. वाय्. बी. एस्सी.

समोरच्या डिसेक्शन ट्रे मध्ये उपडा बांधलेला फ्रॉग होता. क्लोरोफॉर्मने बेशुद्ध झालेला. मी ब्लेड सीझरने त्याची आउटर स्कीन रिमूव्ह केली, अन् अॅबडॉमेनचा कट घेऊन सरळ हार्ट पर्यंत आणली. हात थर–थरला, काय झाले समजलेच नाही. ट्रे मधल्या पाण्यात रक्ताचे लोट उठले. ..... खूप मोठे ...... खूप मोठे ...... माझा जीव कासावीस झाला. कपाळावर घर्मबिंदू ठिबकू लागले. लाल रक्ताचा खूप मोठा भोवरा तयार झाला. ..... गरगर फिरू लागला. ...... भयानक वेगाने; त्यात मला एक चेहरा दिसला. ..... हो, सती-शचा .... तेच ते रोखलेले घारे डोळे .... गोल, गोबरा गोरा चेहरा .... तेच हास्य ..,.. अन् मिस्कि-ल नजर.

सतीश, माझ्या आईच्या नात्यातला. तिच्या आतेचा मुलगा .... पोरका म्हणून अन् माझ्या घरात मी एकटीच असल्याने आईने आणि आप्पांनी त्याला आणले. तो आला तेव्हा होता ११–१२ वर्षाचा गोरापान, घाऱ्या डोळ्यांचा, कुरळ्या केसांचा. खूप सुंदर होता तो. माझ्याहून दोन वर्षांनी मोठा, फार समजुतदार आणि शहाणा. कधीच धडाधडा बोलायचा नाही. पण त्याचे डोळे कमालीचे बोलके होते. त्याच्या परिस्थि–तीने त्याला शहाणा बनविले होते. त्याला माझ्याच वर्गात घातले होते. एकत्र शाळेला येताना मी त्याचा हात धरी तेव्हा केवढा आधार वाटायचा मला. असेच दिवस होते. बागेत लावलेल्या झाडापेक्षा, वाळवंटात उगवलेले झाड जसे टवटवीत दिसावे तसा दिसावयाचा तो. आईची खूप माया होती त्याच्यावर. एका राखी पौर्णिमेला मी त्याला राखी बांधली, अर्थात् आईच्या सांगण्यावरून. पण नंतर मात्र मला ती स्वतःची फस–वणूक वाटू लागली. तो मात्र सांगेल तसा वागायचा. आम्ही अकरावी पर्यंत एकत्र वाढलो. मला S. S. C ला ८० टक्के मार्क पडले, बोर्डात १५ वी आले मी. सतीश मात्र काठावर सुटला. आप्पांची व आईची इच्छा होती मी डॉक्टर व्हावे. सतीशची ही तीच इच्छा होती. मला म्हणायचा, 'खरेच सुधा, तू मस्तपैकी डॉक्टर हो! तसं मला कांही औषधपाणी लागणार नाही बघ. मी कधीच आजारी पडून मरणार नाही, एकदम एक्स्प्रेस धरणार आपण !' असा कांही बोलला तर थरकाप व्हायचा माझा. मी सायन्सला अॅडमिशन घेतले आणि सतीश आप्पांना त्यांच्या कामात मदत करूं लागला. खूप आवांतर वाचन करायचा.

सायंकाळी कधी कधी आप्पा बरोबर आम्ही दोघे मोटारीतून नाही तर, फक्त दोघेच पायी पायी भीमेच्या तीरावर फिरायला जायचो. कसले तरी विनोद सांगून तो स्वतःच खूप हसायचा, मी मात्र त्याच्याकडे वेड्यासारखे पहात राहायची. स्टेनलेस स्टीलच्या पातेल्यातून दूध उतू जावे तसा हसायचा. मला वाटायचे रस्ता संपूच नये. सतीश बरोबर असेच चालत रहावे. दूर, दूर, क्षितिजाच्या पलीकडे पर्यंत, मूड मध्ये असला तर कसल्याशा इंग्लीश प्रेम कविता नाही तर जुन्या चित्रपटातील गाणी गायचा, नाहं तर वाचलेल्या कथा कादंबऱ्यातील प्रसंग सांगायचा. "डॉक्टर झिवागो" तील ओमर शेरीफची तारीफ करावयाचा. तर कधी खांडेकरांच्या 'अमृत वेल' मधल्या [देवदत्ताची] स्तुती करावयाचा. 'माय फेअर लेडी' तील नायकाची शौर्यगाथा गायचा. दररोज दररोज काही तरी नवीन नवीन सांगायचा मी नुसती ऐकत रहायची, खूप उत्कंठेने अन् त्याच्या डोळ्यातील भाव टिपायचे एक नाही, हजार रंग त्याच्या डोळ्यात सामावले होते. ...... खूप गूढ ... न उकलणारे कधी कधी कोणत्या गोष्टीवरून वाद झालाच तर माझ्या हट्टापुढे लगेच माघार घ्यायचा. तेव्हा त्याच्या डोळ्यात अशी व्यथा दिसायची की मला स्वतःला खूप शरमल्या सारखे व्हायचे. सतीशने माझे जीवन व्यापले होते. निळ्या रंगाने सागर व्यापतो तसे.

आमचा जीवन प्रवास अगदी मऊ मखमली मार्गी वरून चालला होता. मी इंटरला आले. एका नात्यातील लग्नाच्या निमित्ताने आम्ही मिरजला निघालो होतो. संबंध पुण्याच्या प्रवासात आम्ही दोघे खूप बोललो, बोलत होतो. मी कॉलेजातल्या गंमती सांगत होते, तो व्यथित नजरेने माझ्याकडे पहात होता. एकदम म्हणाला, "सुधा, ही गाडी आहेना असेच हे जग आहे बघ. आपण सर्व सहप्रवासी. एकत्र बसलो तरी फार ? काळ नाही नाहीतर एखाद्या स्टेशनवर एखादा उतरून गेला तर फुकटच बोअर होत बसावे लागते." काय समजत होते त्याला कुणास ठावे. मला आठवते बऱ्याच दिवसांनी त्याला गाडीत त्याच्या आईची आठवण आली तसे त्याचे डोळे चटकन् भरून आले, मला कसेसेच झाले. त्याचा आवाज एकदम घोगरा झाला असावी. कंप पावला, "सुधा, मला वाटते ती तुझ्यासारखीच बघ." मला तर तिचा चेहरा पण आठवत नाही मला एकदम हुंदका आला, तसे स्वतःच्या डोळ्यातले अश्रू पुसत, हसायला लागला म्हणाला, "ये हे रे वेडी, कॉलेजातल्या मुली केव्हा रडतात वाटतं." माझ्या खांद्यावर हात ठेवून माझ्या डोळ्यात एकाग्र पहात म्हणाला. "हास, पाहू, हास पाहू, सुधा. अग मी किती मूर्ख आहे पहा. मी उगीच कांहीतरी भंकस करतो आहे. बाहेर बघ किती मस्त वाटते." झटकन् त्याच्या चेहऱ्या वरचे भाव पालटले. सागर जरी वरून शांत दिसला तरी आत खोल काही तरी भयानक खळबळ आहे हे मी प्रथमच जाणले. वरून हसत असला तरी मनातून तो दुःखी होता हे मी तेव्हाच ओळखले. मी त्याच्या मनावर फुंकर घालू शकत नव्हते. बराच वेळ तसाच बसून बाहेर कांही तरी पहात राहिला मग म्हणाला "सुधा, खरेच किती विचित्र आहे हे जग. मी कोण तू कोण. आपले सबंध काय ? मला वाटते आपले कांही तरी ऋणानुबंध होते म्हणून आपण भेटलो. उद्या ते संपले की पुन्हा अनोळखी होऊन जाऊं ...... खूप खोल अंधारात तेथे कोणीही असणार नाही. अगदी मी सुद्धा. खरे सांग मला वाटते कोणी एका योगी पुरुषाने विधान केले आहे की "या जगाला या विश्वाला भविष्य–काळच नाही. ही सर्व भूतकाळाची चक्रे पुनः पुनः फिरतात. मला वाटते हजारो वर्षांपूर्वी कधीतरी आपण असेच गाडीतून जात होतो अगदी

卐 एस्. आर्. टेलर्स 卐
० जेन्टस् स्पेशालिस्ट ०
भिगवण चौक, बारामती : जि. पुणे
इंटरलॉकचे मशीन
टेरिलीन, टेरिकॉट-
पॅन्टस् : शर्टस्

# पटेल हिरालाल गोविंद सॉ मिल

**टिंबर मर्चंट · फर्निचर वर्क्स**

गुणवडी रोड, बारामती : जि. पुणे

☎ ३८२

**आमच्याकडे :-**

इमारतीस लागणारे सागवानी कापीव लाकूड

सागवानी गोलटे, बल्लीस

लालटेक, जव्हारटेक इ. जंगलवूड

ऑर्डरीनुसार फर्निचर्स

योग्य दरांत खात्रीशोर मिळेल.




असेच पण पुढचे काहीच आठवत नाही बघ . . . .' असे वराच काही गूढ बोलत होता. . . . . खोल आवाजात . . . . हातवारे करीत . . . . मध्येच पुढल्या स्टेशनवर त्याने चहा मागवला. अजून अप्पा व आई वर झोपले होते. त्याने हातात कपबशी दिली पण माझा अन् त्याचा हात थरथरला. कपबशी त्याच्या पायावर पडली. पायात चकचकीतच बूट होते. हाने भिजले. मी पटकन वाकून हातातल्या रूमालाने त्याचे बुट साफ करू लागले. तसे त्याने माझे हात धरून थांबवले "छी; छी; काय हे सुधा. अग डॉक्टर तू. चांभाराचे काम करतेस ! " दुसरी कपबशी त्याच्या हातात होती तेवढ्यात गाडीने शिट्टी वाजविली तशान त्याने एका दमात अर्धाकप चहा पिऊन उरलेला माझ्या तोंडाला लावला मीहि घोट घेतला. किंचित् तोंड भाजले, त्याने गडबडीत कपबशा अन् पैसे दिले. फारच विचित्रपणे वागला होता तो त्या दिवशी.

पुणे स्टेशन आले. उतारुंची गडबड सुरू झाली, आई-अप्पा उठले. बाकीचे सामान बाहेर काढण्याच्या नादात मी स्टेनलेस स्टीलचा मोठा टिफीन आत विसरले. स्टेशनातून बाहेर पडताना आठवण झाली. मी अप्पाना सांगितले, तसे अप्पांनी सतीशला पिटाळले. "सतीश, अरे पळ गाडी अजून उभी आहे बघ कोणत्या डब्यात राहिला तो ? " एकदा माझ्या कडे कटाक्ष टाकत सतीश गडबडीत म्हणाला " काका, तुम्ही व्हा पुढे. मी आलोच. सुधा जवळ तिकीट द्या. " माझे अन् सतीशचे तिकीट माझ्या जवळ देऊन अप्पा समोरच्या ७ नंबर प्लाटफॉर्म वर उभ्या असलेल्या कोल्हापुर पॅसिंजर मध्ये जागा धरावयास गेले. मी तेथेच सतीशची वाट पहात थांबले. एव्हाना गाडीने शिट्टी फुंकली होती. व हिरवा बावटा दाखवला. मी गर्दीत सतीशला पहात होते. त्याने पळतच तो आगगाडीचा डबा धरला व आत गेला. गाडी सुरु झाली . . . - माझ्या काळजाचा ठोका चुकला. तो आत टिफीन शोधीत असावा. दुसऱ्या क्षणी मी त्याला पाहिले. त्याच्या हातात टिफीन होता. त्याने हॅंडबार धरून डबा सोडला. - - अन् त्याच क्षणी पाय घसरून की तोल जाऊन प्लाटफॉर्मचे वरून सरळ घुसला. ओरडा ओरड झाली "पडला " "पडला." मी घाबरून किंकाळी मारली आणि तिकडे पळाले. गाडी सरळ निघून गेली अन दूर जाऊन थांबली. मी पहाते होते त्याचे तोंड खाली होते. त्याच्या दोन्ही पायावरून गाडी गेली होती बुट घातलेले ते दोन पाय थोड्याच अंतरावर तुटून पडले होते. - - आतले लालबुंद मास आणि रक्त - - लाल रक्त - - खूप मोठा रक्ताचा लोंढा - - खूप मोठा पूर - - अन् मी पूर्णपणे त्यात बुडुन गेले. पुढचे मला आठवत नाही. मी पूर्ण बेशुद्ध झाले होते शुद्धीवर आले. तेव्हा ससून मध्ये होते. सतीशला इमर्जन्सी मध्ये ठेवले होते. खूप रक्त गेल्याने तो बेशुद्ध होता. - - त्याला रक्ताची जरूरी होती. मनात नवस केला सतीशला वाचव त्याला रक्त मिळू दे. " त्याला त्याच्या ग्रुपचे रक्त मिळाले. तो वाचण्याची आशा पालावली. मला सतीश हवा होता लुळा - पांगळा, कसाही - - मी अन् आई त्याला पहावयास गेलो तो निळ्या प्रकाशात पांढऱ्याशुभ्र वस्त्रात त्याला गुंडाळले होते. त्याच्या नाकात ऑक्सिजनचे नळकांडे होते. चेहरा सुकला होता. अन् पाय नव्हतंच! पांढऱ्या बॅंडेजमध्ये गुंडाळलेले २ नळकांडे दिसत होते. खूप कालवा कालव झाली हृदयात. संध्याकाळी शुद्धीवर आला तेव्हां त्याला माहित नव्हते त्याचे पाय काटलेले. म्हणाला. " मला घरी घेऊन चला, यला येथे कशाला आणले ! " मला रडे आवरेना, मनगट तोंडात घालून उभे राहिले. आईने डोळ्याला पदर लावला तसे डॉक्टर कानात कुजबुजले " त्याला माहीत नाही पाय काटलेले - - आठवण देऊ नका - - शॉक बसेल. तसे बाहेर निघून आले.

ती रात्र फार भयानक होती. आम्ही ससूनच्या वेटींग रुम मध्ये थांबलो तेथून समोरच Mad cal College " दिसत होते. उच पांढऱ्या रंगाच्या खांबावर हत्तीचे मुखवटे होते. वाटले पुढल्या वर्षी मी इथं येणार डॉक्टर व्हायला - - अन् क्षणात त्या हत्तीच्या सोंडे ऐवजी दोन तुटलेले पाय दिसू लागले - - खूप घाबरले - - रात्री मध्येच कुत्र्याचे रडणे तर रोग्यांच्या अन् लहान अर्भकाचे रडणे, किंचाळण्याने, मनात अशुभ पाल चुकचुकत होती - - ना झोप ना जाग अशी अवस्था झाली होती. सकाळी समोरच्या ' श्रीकृष्ण उडपी ' मध्ये गेलो अन् ते चहाचे बेचव पाणी नरड्यात ढकलले, तसे काल गाडीत

सतीशने पाजलेला त्याचा उष्टा चहा आठवला अन् हुंदका आला, तसाच दाबला. नंतर पुनः सतीशकडे गेलो. तेव्हा त्याला डॉक्टरने त्यांचे पाय गेल्याची समज दिली होती. कारण तो इतका भयाण विषिण्णपणे हसला की अंगावर काटाच आला. त्याची नजर खूप भयाण झाली होती. म्हणाला. 'सुधा, अग माझे दोन्ही पाय त्या हरामखोर डॉक्टरनी काढून टाकले, मी आईला सांगणार, मी जाणार तिच्याकडे मला तिने बोलवलंय." त्याला धाप लागली होती. छाती जोरात वर खाली होत होती. घामाने चेहरा धबधबला होता. मला कसेसेच झाले - - लगेच बाहेर पळाले - - नर्सने सांगितले त्याच्या मेंदूवर परिणाम झालाय - - खूपच रडले. अप्पानी, - - आईनी. समजूत काढली. त्याच दिवशी चार वाजता मतीश आम्हाला सोडून गेला. - - त्याच्या आईकडे - - किती विचित्र घटना घडली होती. पहाता पहाता तारा निखळून पडावा तसा गेला सतीश ! मी त्याचे अंत्यदर्शन घेतले तेव्हा त्याचे ते घारे डोळे उघडेच होते. चेहऱ्यावर तेच मंद हास्य - - विश्वासच बसत नव्हता - - वाटले, तो पुन्हा उठेल अन् हाक मारील - - पण नाही,

आता मला ते या रक्ताच्या भोवऱ्यात दिसत होते. भोवरा भयानक वेगाने फिरत होता. मी खूप घाबरलें. वाटल आता यात पडणार - - तोच खांद्यावर कुणी तरी हात ठेवला - - आमच्या डेमॉन्स्ट्रेटर बाई होत्या त्या - - माझ्याकडे पहात विस्फारलेल्या नजरेने म्हणाल्या "काय मिस् जोशी - - तुम्हाला बरे नाही का ? घाबरलात काय एवढ्या. ? अन् काय आजही फ्रॉगचे हार्ट पंक्चर केली वाटते - - मेडीकलला जायचे ना तुम्हाला ? आज दुसरा फ्रॉग नाही - - - यु कॅन गो नाऊ."

मी भानावर आले पाहिले बरेच विद्यार्थी खाली मान घालून डिसेक्शन करीत होते. मी उठले, हातातील रक्ताने माखलेली बेन्ड सिझर टॉवेलला पुसली. अन् बॉक्स मध्यें घेतली. उठले अन् घराकडे चालू लागले. जड पावलाने. मन आक्रंदत होते "मला डॉक्टर व्हायचे नाही, मला रक्त पहायचे नाही."

卐 卐

ओरिजिनल माल गॅरंटीसह योग्य दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण-

घोलप ऑटोमोबाइल्स सिनेमा रोड, बारामती



आमच्याकडे मॅसे फर्ग्युसन व इंटर नॅशनल ट्रॅक्टर्सचे स्पेअर पार्टस्, तसेच रॉयल एनफिल्ड, जावा, राजदूत इ. मोटर सायकलचे स्पेअर पार्टस् आणि सर्व प्रकारच्या कारचे देशी आणि विदेशी सामान योग्य व माफक भावात मिळेल





# उडत्या तबकड्या

चंद्रकांत नातु.
टी. वाय्. बी. एस्सी.

आपण बऱ्याच वेळा उडत्या तबकड्या संबंधी वर्तमानपत्रात, मासिकात गंमतीदार बातम्या वाचतो. आणि लगेच विसरूनही जातो, परंतु जगातील प्रगत देशातील शास्त्रज्ञ व शासन याकडे कोणत्या दृष्टीने पहातात हे पाहणे महत्वाचे ठरेल. अर्थातच कोणतेही शात्रज्ञ उडत्या तबकड्या बद्दल निर्णायक असे सांगू शकत नाहीत. या उडत्या तबकड्याना इंग्रजीमध्ये (Flying Saucers ) किंवा Unidentified Flying Saucers ( U. F. O. ) ओळखता न आलेले उडते पदार्थ ) असें म्हणतात.

चालू शतकात उडत्या तबकड्या म्हणजे काही नवीन गोष्ट राहिलेली नाही. परंतु उडत्या तबकड्या संबंधी सर्वात जुना उल्लेख चीनमधील टुंगटिंग प्रदेशात एका खडकावर सापडतो. त्यामध्ये आकाशात लंबगोलाकृती पदार्थ दाखविला असून त्याचेवर व काही माणसे जमिनीवर उभी आहेत असे कोरलेले आहे. त्यानंतरचे काळातही असे अनेक उल्लेख सापडतात. १२ डिसेंबर १८९९ रोजी असे यान संनफ्रान्सिसको मधील लोकानी पाहिले. ३० जून १९०८ मधील रशियातील अशनिवृष्टी प्रसिद्धच आहे, त्यामुळे शेकडो मैल उध्वस्त झाले.

साहजिकच यानंतर शास्त्रज्ञाची जिज्ञासा वाढली. व त्यांनी आधुनीक उपकरणाच्या सहाय्याने तबकड्यांचा माग काढण्याचे ठरविले. १९४७नंतर या तबकड्याचे प्रमाण वाढले. त्यावेळी एका अमेरिकन रिपोर्टात लिहिले आहे की-

" The Strange crafts operating beyond the capabilities and control of man made devices had visited every important Communication centre, Industrial Centre and military instalations on the earth."

या तबकड्या म्हणजे एक गूढच आहे, असे म्हणावे लागेल. कारण त्याचेवर कोणत्याही शस्त्राचा परिणाम होत नाही. त्यांचा व्यास ५० ते १००फूट असतो त्या एकदम गती घेतात, एकदमच थांबतात व एकाएकी दिसेनाशा होतात. त्या कोणत्या इंधनावर चालतात याचा सुद्धा आपणाला पत्ता लागत नाही. त्याचेवर गुरूत्वाकर्षणाचा सुद्धा काही एक परिणाम होत नाही एवढेच नव्हे तर गुरूत्वाकर्षण शक्तीचा ते इंधनासाठी उपयोग करीत असावे असाही अंदाज संशोधकांचा आहे.

या तबकड्या कोठून येत असाव्यात यासंबंधी काही विचार पुढे आले आहेत. व त्यानुसार या तबकड्या भंगळावरुन येत असाव्यात असे शास्त्रज्ञ म्हणतात.

मगळावर असलेले अजस्त्र कृत्रिम कालवे आपणास माहीत आहेतच. यावरून आणि मंगळाचे दोन उपग्रह 'फोमस' व 'डीमस' यावरून तेथील बुद्धीमान प्राण्यांची काहीशी कल्पना आपल्याला येते. 'फोमस' हा उपग्रह फक्त ५८०० मैलावर असून त्याचा व्यास केवळ ५ मैल आहे. दुसरा 'डोमस' हा १० मैल व्यासाचा आहे सूर्यमालेतील दुसऱ्या कोणत्याही ग्रहाचे उपग्रह एवढे लहान व जवळ नाहीत. यावरून ते कृत्रिम असावेत असे संशोधकांचे मत आहे.

One of the tragic features of the country's situation today is the complete disruption of academic life. For weeks and months Universities, colleges and schools are being closed. Classrooms, libraries and laboratories remain unused. The crores of rupees spent on education out of our limited financial reasources cease to yield the returns expected. The most disturbing challenge before the nation today has been the problem of students unrest exhibited in the form of violent and unsocial acts all over the country during past few years. It is more chronic, more permanent and more widespread than labour unrest or provincialism. No one can deny that student world of India, nay the world today, is in a profound state of unrest. Hardly a day passes, when we do not read in the papers about students disturbances in one or the other parts of the country. Disturbances on the University campuses in different parts of the country have remained front page news or far too long. Delhi, Calcutta, Assam, Bihar, Karnataka, Punjab, Haryana, Rajasthan, Telanga, Andhra and Tamil Nadu are areas where students' agitations have created a diffcult law and order situation. Indeed this phenomenon has assumed such dimensions that it is becoming a law and order problem. Great concern has been expressed by the teachers, the politicians, the parents, the Government and eminent educationists and thinkers. The late Prisident Dr, Zakir Hussein felt, that if the growing student unrest was not checked, the expanding system of higher education would accelerate the forces of social disintegration. He described it not a disease, but a symptom of disease. Though it is only the symptom of a common disease but it is most dangerous, because the youth of today will have to shoulder the burdens of life tomorrow and may be found unfit and unworthy. According to Dr V. K. R. V. Rao, student indiscipline is not just an exhibition of youthful exuberance nor can it be explained away as the foul work of interested outsiders, political or otherwise who are trying to fish in the troubled waters of student unrest. Student indiscipline is a cultural, economic, sociological and educational problem, which has got to be studied and analysed in an objective and scientific manner if we are to

find the proper remedies. He therefore, argued the Government of India, the desirability of appointing, a national commission or a committee, to enquire into the whole phenomena. The Government or the public can no longer remain passive spectators of of this student unrest on and off the University, College and School campuses. It is no use making a post-mortem after every incident on and off the campus. Periodic appeals to students for peace and disciplinary actions, to eschew violence and sit round the table to thrash out their disputes will not be of much use. This disease of student unrest cannot be cured by treating its superficial symptoms or supressing its manifestations by force. Supression without understanding and acceptance by the suppressed is only likely to drive the phenomenon underground, to erupt into more violent manifestations when a suitable opportunity to do so presents itself to the suppressed. We need to understand the why of the phenomenon before we start on a programme of remedial measures, and understanding can only come from study and research. Individuals, research institutions, the University Grants Commission and the Education Commission, have made attempts to analyse the causes and suggest remedies. However we have given this subject not that measure of scientific and research attention as it requires.

### Causes of Student unrest

Strenuous efforts have been made to identify the complex factors responsible for the present unrest and indiscipline among the students. There can be different interpretations of academic, social, political and economic problems held responsible and often unpredcitable behaviour of the Indian youth. According to a recent analysis by the Government of India, nearly a third of the violent incidents this year till the middle of October 1972, were related to demands for better academic facilities. Another one third were connected with claims of failed students, college union elections and protests in support of dismissed staff. The rest could be traced to domestic economic or political problems, linguistic rivalries and even to the US policy in Vietnam. The glaring inequities in to our educational practices such as charging of capitation fees for admission, thereby favouring the rich against the poor. The affluent who has paid his way into the University cannot also be expected to have any respect for the institution he has entered. Another such inequity is regarding the practice of many of the educational institutions to cashier the teachers at the end of the term and to appoint them afresh at the beginning of the next term. This practice makes it difficult for the teachers to concentrate on essential work and also obstructs the development of a sense of belonging to the institution to which they are attached. Running of higher educational institutions on commercial basis, cannot expect any discipline from the students. There are many number of instances in which the governing bodies of the colleges are manned by people, who by no stretch of imagination could be considered worthy of shouldeirng educational responsibilities. Their arbitrary decisions go a long way in estranging both students and teachers and so long as this continues it will be idle to hope for peace on the campuses. One can argue ad infinitum regarding the deeper causes that have lead to the present unfortunate situation. The generation gap, the sudden expansion of university education, paucity of funds, falling teaching standards, rising prices, and the demand of the teachers for higher incomes are the factors that might have contributed to the malaise. One can dig still deeper and unearth many cultural elements, that are out of step with the present milleu and blame them for the student unrest. To my mind few deep rooted causes for student unrest on and off the campus, may be the following in addition to the above :-

### Educational causes

1) Unsuitable carriculum
2) Lack of leadership in students.
3) Inadequate or unsatisfactory physical conditions in educational institutions i. e. acute shortage of floor space for class-room, common room, library, reading room, canteen and sanitary conditions.
4) Poor quality of teachers.
5) Lack of guidance services and interest in students by teachers.
6) Uninterested persons taking to teaching profession.
7) A large amount of student frustration can be traced directly and indirectly to indifferent teachers and unprogressive teaching methods. It is a revealing fact that good teachers do not complain of indiscipline in class.
8) Grouipism in teachers leading to imitation in students and instigating indiscipline

### Administrative causes

1) Lack of encouragement to good students.
2) Poor internal administration in institution.
3) Lack of imagination and tact on the part of authorities.
4) Lack of a body to hear students grievances.
5) Lack of student-teacher contact.
6) Partiality and favouritism by teachers.

### Social causes

1) Degenerating standards of public life.
2) Loss of values by the society.
3) Indifferent attitude of parents.
4) Absence of religious and moral education.
5) Influence of Cinema.
6) Influence of Western civilization.
7) Reflection of family indiscipline.

### Political and Economic causes

1) Lack of vocationalization in education.
2) Influence of political parties.
3) General unrest in the country.
4) Teachers' participation in politics.
5) Fear of unemployment.
6) Malicious propaganda by parties.
7) Poor economic status of teachers.
8) Poor economic conditions of students.
9) Teachers' participation in agitations.
10) Materialistic tendency of society.

### Remedial Measures Teachers

Teachers should note that they have equally great responsibility for this sad state of affairs. Many teachers suffer from professional handicaps, their knowledge of the subject matter is patchy and obsolete, they are only one lesson ahead of the class. Most of the effective means of teaching are unknown to them. A number of them prefer to 'cheat' than teach. They do not consider teaching a mission and a challenge. Many teachers think that they are thrusted with the role of a teacher as they could find no other openings. These dejected lots only spread frustrations among students, not knowing that they themselves will be the first casualities of students violent reactions. We should be more practical than theoretical, and well-equipped to face the challenge of time. Once we happen to be teachers, whether by choice or by compulsion, we should

realise the sacredness of the profession, we should try to win the confidence of our students, understand them, and redirect the misguided missiles, if any, into the great task of national reconstruction. Much of the indiscipline and unrest on the campus can be remedied by teachers, if they have the will, the determination, a love for the profession, for the students and the institution.

**Students**

Our youth must remember that the future of their country depends upon their willingness and ability to fulfill their duty, otherwise any right that they demand and obtain will have no meaning and bring no benefit.

The student community should do several things. Among them the first is to repudiate the leadership of the militants among them who have gained control over the unions and who are responsible for the disruption of academic life. The present day student leaders are not interested in studies. Several of them are members of political parties whose aim is to create chaos and confusion in the country as a prelude to the revolution which is their ultimate aim. Several of them have the ambition to become political leaders after leaving the university or college and they are interested in utilising the educational institutions to lay the foundations of such a career. Both the categories of students are on the look out for some issue or other on which they can rouse the student community and organise strike. The student community should get rid of these militant leaders whose sole aim is to disrupt academic life, organise students in strikes and agitations. They have no interest in education.



**Government**

The Governments in the country have great responsibilities. They can no longer watch as idle spectators, this growing unrest and indiscipline in the student community. They should try to probe in the problem deeper and remedy through effective measures. Educational reforms, such as checking the growth of substandard educational institutions, creating suitable employment opportunities for educated community, improving economic condition of the teachers, and the country as a whole, controlling effectively the affairs in university, colleges and schools, will to a greater extent help in redressing this problem which has become a challenging task. The Government should see that job-oriented education, interest oriented ducation is porvided. The doors of the institutions of higher learning which have been thrown open to all and sundry, under a mistaken view of equal educational opportunities and democratic education should be stopped. We are endeavouring to fit square pegs in round holes. If we limit higher education to those who are likely to derive benefit from it, make their stay in the colleges and the universities meaningful, most of the centres of higher education will present a more healthy picture of themselves and their work.

**Parents**

Parents must understand that education is not the job of teachers alone. It is a continuous process in which several agencies participate. Parents must study them closely and mould their children properly. They should develop in them a high sense of responsibility, love of promptitude and orderliness, a desire to discharge duties with a sense of devotion and a capacity to maintain balance in the face



of the most serious external dangers or emotional conflicts. Parents must understand and guide them while in domestic surroundings. They must never forget that their responsibility does not cease the moment they have put their children in educational institutions. Their responsibility in fact is very great. They should respect teachers, love education and co-operate with the teachers in this arduous task. They should keep contact with teachers and watch the progress of their children. They should not cling to their old beliefs and refuse to accept children who are full of new ideas. The older generation must realise that its ideals must be adapted so as to conform to the needs of the younger generation. It is hardly necessary to add that next generation will largely be what parents are today. Proper atmosphere at home will help to solve the problem of indiscipine of students.

**Politicians**

The interference by political parties in educational institutions, and using militant student leaders as tools for carrying out their own party policies is also the major cause of student unrest. Today the students constitute a well-knit community. Any movement started by them spreads easily over large areas of the country. To mobilise them is easier. Political parties find that working through the student cmomunity brings them returns which it is not possible for them to secure otherwise. Through student community, they can bring pressure on Government. Government has sometimes false sympathy in their dealings with the students and student leaders. They are not prepared to take severe action against violent students. Many try to seek the support of students in fighting Central Government, e. g. location of steel plant or



oil refinery, or separation or bifurcation of the state. The reasult is that politicians whether they belong to the party in power or the parties in opposition welcome the involvement of students in politics. This is why no government is prepared to take drastic action against students even when such action is called for. The politicians, should remember that the growing unrest in the student community, on the campuses is to some extent due to thier actions. The student community should remain a loof from these politicians and should not fall prey to their ill propaganda.

**Educational Authorities**

The administrators in educational institutions should remember that it is much to their weakness, the present student community is indisciplined. They should create proper atmosphere, provide basic amenities, such as, library, furniture, reading room, recreation, play ground etc. They should try to provide for welfare activities for tne students. Moreover they should try to understand calmly student grievanecs and try to redress them. They should not allow their institutions to grow beyond the optimum size. They should have fair student-teacher ratio, so that teachers can exercise wholesome influence on the students and inculcate the right values resulting in a sense of achievement.

**Conclusion**

If the educational system is diseased today and every one agrees that it is diseased- it is due not only to the neglect of their primary duty by students but also to the kind of leadership which the student community and the country as a whole has. Salvation lies In the student community repudiating this leadership and in their determination to have as leaders only those

who are interested in studies and education.

It must be remembered that the causes and remedies for student indiscipline are not one or two, but innumerable. The problem is too grave to be solved by mere tinkering with it and indulging in harmless and pious platitudes. Educational authority the teachers, the parents, the politicians and the leaders of the nation should strain every nerve to come to grips with the problem. For this is required the necessary will and determination. If there is a will there is a way.

❋ ❋



# विविध विभागांचे अहवाल

## १९७२-७३

## जिमखाना अहवाल

### १९७२-७३

**निवडणुका–**

यंदा जिमखान्याच्या कार्यास सर्वसाधारण निवडणुकानी सुरुवात झाली. या निवडणुका शांतपणे व चुरशीने पार पडल्या. श्री. डी. डी. करे (एस्. वाय्. बी. ए.) यांची जनरल सेक्रेटरी म्हणून बहुमताने निवड झाली. पुढील विद्यार्थी निरनिराळया खेळासाठी प्रतिनिधी म्हणून निवडून आले

१) श्री. एम्. एम्. सावंत (टी. वाय्. बी. कॉम्.) इंडियन गेम्स

२) श्री. डी. जी. टकले (एफ्. वाय्. बी. कॉम्.) बॉल गेम्स

३) श्री. जे. एन्. शानभाग (टी. वाय्. बी. कॉम्) क्रिकेट

४) श्री. एस्. बी. इंगवले (एस्. वाय्. बी. ए.) अॅथलेटिक्स

या शिवाय कुमारी आशाबी बागवान व कु जयमाला शहा यांची विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून निवड झाली. जिमखाना मंडळावर प्रा. चाफेकर, प्रा. देव, प्रा. किणींगे, प्रा. डी. के. मगदूम व प्रा. इ के. पाटील यांचीही नेमणूक करण्यात आली. आमचे क्रीडाशिक्षक श्री लेकावळे यांनी निरनिराळया खेळासाठी खेळाडूंची उत्तम तयारी करून घेतली.

**आंतर महाविद्यालयीन सामने–**

या वर्षी कॉलेजने फुटबॉल, क्रिकेट, कुस्ती, रिंग टेनीस, टेबल टेनीस, कबड्डी (मुले व मुली), व्हॉली

बॉल, खो–खो ( मुले व मुली ) व मैदानी स्पर्धा या खेळात भाग घेतला.

अ) कुस्ती:–ओतुर येथे झालेल्या आंतर महा–विद्यालयीन स्पर्धामध्ये श्री. एस्. एम्. जमदाडे यांचा ६३ किलो खालील गटात पहिला क्रमांक आला व श्री. एस्. जी. भोसले यांचा ७० किलो खालील गटात दुसरा क्रमांक आला. या दोघांची धुळे येथे झालेल्या आंतर विभागीय सामन्यासाठी नगर विभागातर्फे निवड झाली होती. श्री. व्ही. एस्. भोसले ( ६३ किलो खालील गट ) यांचा आंतर महाविद्यालयीन स्पर्धात तिसरा क्रमांक आला.

आ) कबड्डी ( मुले ):–ओतुर येथेच झालेल्या कबड्डी सामन्यात आमचा संघ उपविजयी झाला आमचे खेळाडू श्री. एम्. एम्. सावंत व श्री. व्ही. टी. जाधव यांची नगर विभागीय संघात निवड झाली होती.

इ) कबड्डी (मुली) :– मुलींचे कबड्डी सामने संगमनेरला झाले. आमच्या कॉलेजच्या संघाने अंतीम फेरीत विजय मिळविला. या संघातील खेळाडू कु. संतोष खत्री, कु. वासंती जाधव, कु. सुषमा देशपांडे व कु. शकुंतला डाई यांची नगर विभागाच्या संघात निवड करण्यात आली. नाशिक (पंचवटी) येथे झालेल्या आंतर-विभागीय सामन्यात कु. खत्री हीने नगर विभागाचे नेतृत्व केले.

ई) व्हॉलीबॉल :– हे सामने संगमनेरच्या आर्टस्' सायन्स व कॉमर्स कॉलेजात झाले. या सामन्यात आमचा संघ उपविजयी धाला श्री. डी. एल्. मिसाळ व श्री. डी. एल्. बडदे यांचा नगर विभागीय सघात समावेश करण्यात आला होता. श्री. मिसाळ यांची नगर विभागाचे कप्तान म्हणून निवड झाली होती. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे पुणे विद्यापीठ संघाचेही नेतृत्व सोपविण्यात आले होते. परंतु काही अडचणीमुळे ते या सामन्यात भाग घेऊ शकले नाहीत.

उ) क्रिकेट :– श्री. के. बी. आटोळे व श्री. आर. व्ही. दुबे यांची नगर विभागातर्फे निवड झाली होती.

ऊ) खो-खो (मुले व मुली) :– अहमदनगरला झालेल्या सामन्यात आमच्या कॉलेजचे दोन्हीही संघ उपविजयी झाले. सर्वश्री सी. जी. मोरे; व्ही. एस्. निकम व एस्. बी. इंगवले यांची नगर विभागी मुलांच्या संघात व कु. विजया प्रभुणे; कु. संध्या उपा व कु. रेखा पेंढारकर यांची मुलींच्या संघात निव झाली होती.

ए) मैदानी स्पर्धा :– यंदाच्या मैदानी स्पर्धा अहमदनगरलाच झाल्या. श्री. बी. जी. भोसले यांचा हातोडा फेक, थाळी फेक व गोळा फेक यामध्ये पहिला व भाला फेकमध्ये तिसरा क्रमांक आला. त्याचप्रमाणे धुळे येथे झालेल्या स्पर्धात त्यानी पुणे विद्यापीठात हातोडा फेकमध्ये दुसरा व थाळी फेकमध्ये तिसरा क्रमांक मिळविला. कु. सुषमा देशपांडे यांनी आंतर महाविद्यालयीन स्पर्धामध्ये उंच उडीत दुसरा व थाळी आणि भाला फेकमध्ये तिसरा क्रमांक मिळविला. याशिवाय कु रेखा लोंढे यांचा उंच उडीत तिसरा आणि श्री टी. एस् आटोळे व श्री. डी एल्. गायकवाड यांचा अनुक्रमे हातोडा फेंक व उंच उडी यामध्ये तिसरा क्रमांक आला. आमच्या मुलांच्या संघाचा ४ X १०० मी रीलेमध्ये दुसरा क्रमांक व मुलींच्या संघाचा तिसरा क्रमांक आला.

या सर्व खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन.

## आंतर विभागीय कबड्डी सामने–

यंदाचे आंतर विभागीय कबड्डी (मुले) सामने घेण्याची जबाबदारी आमच्या कॉलेजवर सोपविण्यात आली होती. ते सामने आठ व नऊ सप्टेंबर रोजी झाले. सामन्यासाठी पुणे, नाशिक, जळगाव व नगर या चारीही विभागांचे संघ आले होते. सामन्यांचे उद्घाटन बारामतीचे प्रांत ऑफिसर माननीय बूधवंतसाहेब यांच्या हस्ते झाले. या सामन्यात पुणे विभागीय संघ विजयी झाला. त्या संघास जनरल करिअप्पा ढाल देण्यात आली सामन्यांचा बक्षीस समारंभ मामलेदार श्री. धर्माधिकारी यांच्या हस्ते झाला. हे सामने यशस्वी करण्यास विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सचीव श्री. दिवेकर व बारामतीचे ॲडव्होकेट श्री. शिवाजीराव जगताप यांनी बहुमोल मदत केली. जिमखाना विभाग त्यांचा ऋणी आहे

श्री. विठ्ठल लेकावळे
क्रीडा शिक्षक

प्रा. शरद नवाथे
कार्याध्यक्ष



# वादविवाद व वाङ्मय मंडळ
## १९७२-७३

यंदाचे वर्ष म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचे रजत महोत्सवी वर्ष ! त्यामुळे आमच्या मंडळाने वर्षारंभीच वर्षभरासाठी भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमाची आखणी केली होती. पण ऑगस्टपासूनच तीव्रतेने जाणवू लागलेल्या दुष्काळाच्या भयंकर वातावरणामुळे या कार्यक्रमांच्या नियोजनातही आपोआप शिथिलता आली. त्यातूनही सहजगत्या जेवढे कार्यक्रम आयोजित करता आले, यांची नोंद अशी:–

### लोकमान्य पुण्यतिथी--

महाविद्यालयाचे नवे प्राचार्य श्री. सनत्कुमार भोरे यांच्या अध्यक्षतेखाली या प्रसंगानेच वादविवाद व वाङ्मय मंडळाच्या कार्यास पुनर्प्रारंभ झाला. प्रा उपाध्ये, प्रा. लोंढे, प्रा. सुर्वे आदि बरोबरच विद्यार्थ्यां–मधून कु. मुकुंद टाकसाळे यांनी यात भाग घेतला
( १ ऑगस्ट १९७२ )

### भारतीय स्वातंत्र्य रजत जयंती निमित्त परिसंवाद--

" स्वातंत्र्योतर काळातील भारतीय जीवनाच्या अपेक्षा पूर्ण करण्यात आपण कितपत यशस्वी झालो आहोत ? " या प्रस्तावावर प्रा. नायगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली हा परिसंवाद झाला. त्यात विद्यार्थ्यांपैकी मुकुंद टाकसाळे कु. माधुरी फाटक, वामन करचे, संपत जायपत्रे, अविनाश राठोड, मनोहर गणपुले, रायरीकर यांनी व प्राध्यापकांपैकी श्री. उपाध्ये, श्री देव व श्री. डॉ. गोधा यांनी भाग घेतला होता. अध्यक्षांनी समारोप केला.
(दि. २९ ऑगस्ट १९७२)

### ' वसंतद्वया ' चे आगमन--

मराठा पत्रकार परिषदेचे अध्यक्ष श्री. वसंतराव काणे व प्रसिद्ध सिने–निर्माता दिग्दर्शक श्री. वसंतराव जोगळेकर यांचे 'सद्य: परिस्थिती' 'प्रचलित समस्या' ' नवयुवक आशा अपेक्षा ' ' चित्रपट जुने–नवे तंत्र ' आदि विषयांवर विद्यार्थ्यांशी मनमोकळी चर्चा आयोजित केली होती. कार्यक्रम प्रश्नोत्तर स्वरूपाचा होता. विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. (दि. २०–९–७२)

### नाटककार श्री. शाम फडके--

सुप्रसिद्ध नाटककार श्री. शाम फडके यांच्याही व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. 'नाटक जन्माला कसे येते ?' यावर विनोदप्रचुर असे स्वानुभव लेखकांनी कथन केले
( दि. १८–९–७२ )

### पं. धन्यकुमार भोरे–

विदर्भाचे प्रसिद्ध वक्ते व्यासंगी विद्वान श्री. पं. धन्यकुमार भोरे यांचे "आजचा विद्यार्थी" या विषयावर उद्बोधक व प्रेरक व्याख्यान झाले. जीवन आणि आध्यात्म यांचा समन्वय घालून त्यांनी आजच्या काळाची गरज अत्यंत समर्पक दृष्टांतांनी व उदाहरणांनी पटवून दिली. एक चिरस्मरणीय व्याख्यान.
(दि. १६-९-७२)

### खास पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी–

पुणे विद्यापीठातील मराठीचे प्रा डॉ मु. श्री. कानडे " आचार्य अत्रे आणि त्यांची नाटके " या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. समीक्षणा-त्मक विवेचन नि अद्यावत माहिती यामुळे त्यांचे व्याख्यान अत्यंत उपयुक्त ठरले. (दि १ आक्टोबर ७२)

### गांधी जयंती--

प्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते व संत विनोबांच्या तत्त्वांचे प्रसारक श्री. चन्द्रकान्त शहा यांचे या प्रसंगी सद्य: परिस्थितीत विद्यार्थ्यांना आवाहनात्मक भाषण झाले. भाषणातील तळमळ नि आधुनिक दृष्टिकोन यामुळे भाषण अत्यंत प्रभावशाली झाले

### आंतर महाविद्यालयीन स्पर्धा--

अहमदनगर येथील पेमराज सारडा महाविद्याल-याच्या वतीने आयोजित केलेल्या ' शारदा करंडक कथाकथन स्पर्धे ' साठी आपल्या महाविद्यालयातर्फे श्री. मुकुंद टाकसाळे व श्री. सुभाष सावंत यांना पाठविले

होते श्री. मुकुंद टाकसाळे यांना लेखक-कथानिवेदक म्हणून या स्पर्धेत खास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. अभिनंदनीय !

### निबंध स्पर्धा–

यंदाच्या भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवा-निमित्त विविध विषयांवर गटवार निबंध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यात श्री. मेणसे एफ्. वाय्. बी. कॉम. या विद्यार्थ्याला सर्वप्रथम क्रमांक व सौ. चित्रा शहा एस्. वाय्. बी. ए. या विद्यार्थिनीला दुसरा क्रमांक देण्यात आला. यशस्वितांचे अभिनंदन !

श्री. बद्रीनाथ मूर्ती
विद्यार्थी-प्रतिनिधी

प्रा. डी. एस्. शहा
प्रमुख
वादविवाद व वाङ्मय मंडळ

## राष्ट्रीय सेवा योजना

आमच्या महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना पत्रकाचे हे तिसरे वर्ष गेल्या दोन वर्षाच्या अनुभवांची शिदोरी पाठीस बांधून तिसऱ्या वर्षाच्या योजना अत्यंत आत्मविश्वासाने पार पाडल्या.

या वर्षी आमच्या राष्ट्रीय सेवा योजनेत भाग घेण्यासाठी बऱ्याच विद्यार्थी-विद्यार्थिनींचे अर्ज आले होते. पण विद्यापीठाने पथकाची संख्या शंभर ही ठरवून दिली असल्यामुळे बऱ्याच मुला-मुलींना एन्. एस्. एस्. मध्ये प्रवेश देता आला नाही.

यंदाचे वर्ष हे स्वातंत्र्य-रजत महोत्सवाचे असल्यामुळे खालील योजना पत्रकाने निवडल्या होत्या.

### १) वृक्षारोपण–

या योजनेचे उद्घाटन दि. २५ जून ७२ रोजी प्राचार्य एस्. जी. भोरे यांच्या शुभ हस्ते झाले. यावेळी वृक्षारोपणासाठी २५ खड्डे घेण्यात आले व त्यामध्ये डॉ. गोधा व इतर प्राध्यापकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

अशा रीतीने महाराष्ट्र राज्य सरकारच्या वनमहोत्सवाच्या कार्यक्रमात आमच्या रा. से. योजनेच्या पथकाने भाग घेतला.

### २) आर्थिक-शैक्षणिक व कुटुंब नियोजन सर्व्हे–

मौजे तांदुळवाडी, गुणवडी व मळद या तीन खेडेगावांचा आर्थिक-शैक्षणिक व कुटुंब नियोजन विषयक सर्व्हे केला असून त्याची सर्व माहिती पंचायत समिती, बारामती व जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

### ३) अस्पृश्यता निवारण-मोहिमेत भाग–

देशाला स्वातंत्र्य मिळून २५ वर्षे झाली पण अजून स्पृश्य अस्पृश्यतेचा भेदभाव शिल्लक आहे. म्हणून आमच्या रा. से. योजनेच्या पथकाने "हरिजन वाडा भेट" हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सर्व मुले व प्राध्यापक हरिजन वस्तीत जाऊन तेथील हरिजनांना भेटले. त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या व त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे पुढील पिढीत तरी हा भेदभाव शिल्लक रहाणार नाही.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने हरिजन वाड्यात रस्त्याची साफसफाई केली. लोकांना सांडपाण्यासाठी खड्डे घेवून दिले.

### ४) रिमांड होम चिल्ड्रेन प्रोजेक्ट–

या योजनेतील मुली दर रविवारी बारामती येथील रिमांड होममध्ये जातात व इ. ७ वी ते ११ वी पर्यंत मुलांना त्यांच्या अभ्यासात मार्गदर्शन करतात. समाजापासून व आई-वडिलांच्या मायेला पोरक्या झालेल्या जीवांना गोष्टी सांगून व करमणूक करून त्यांचे मनोरंजन करण्यात येते. या कार्यक्रमास रिमांड होमचे सुपरिटेंडेन्ट श्री. सावन्त व सेक्रेटरी श्री. दाते यांचे बहुमोल साह्य झाले.

### ५) ठकार कॉलनी कँप–

१५ ऑगस्ट १९७२ ला ठकार कॉलनी कँप आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी रस्ता दुरुस्ती, साफसफाई करण्यात आली.

### ६) मळद कँप–

मळद येथील प्राथमिक शाळेच्या आवारात वृक्षारोपणासाठी खड्डे घेण्यात आले. त्याचप्रमाणे खो खो व कबड्डीचे ग्राऊंड तयार करून दिले

### ७) जळोची श्रमशिबीर–

नोव्हेंबर मध्ये मौजे जळोची येथे तीन दिवसांचे श्रमशिबीर आयोजित करण्यात आले होते. या गावांला अतिशय चांगला रस्ता करून देण्यात आला

याच गावात सार्वजनिक विहीर काढण्याचे काम चालले आहे. ही सार्वजनिक विहीर काढण्यासाठी आमच्या रा. से. योजनेच्या पथकाने बहुमोल सहकार्य केले.

या शिबीराचे उद्घाटन मा. श्री. कमलाकान्त पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. प्राचार्य भोरे व डॉ. गोधा यांनी शिबीरांस बहुमोल मार्गदर्शन केले

या शिबीरांत विद्यार्थी, प्राध्यापक व गावकरी या सर्वांच्या सहकार्याचा सुंदर मिलाप झाला होता.

### ८) 'फन फेअर' कार्यक्रम–

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी वालचंद-नगर येथे या योजनेतील विद्यार्थ्यांनी फन फेअरचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमास रु.१०११ मिळाले व ते पद्मभूषण डॉ. मोदींच्या हस्ते प्राचार्य भोरे यांना देण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यात या योजनेतील गट प्रमुख श्री. मूर्ति बी. जी., श्री. देशपांडे सी. व्ही. व या कॉलेजचे जी. एस. श्री. करे यांनी अतिशय मेहनत घेतली.

### ९) नेत्र शिबीरात मदत––

डिसेंबर १६ ते २६ पर्यंत डॉ. मोदी यांचे नेत्रशिबीर बारामतीस घेण्यात आले होते. या शिबीरात रा. से. योजनेच्या मुला-मुलींनी बहुमोल अशी कामगिरी बजावली.

### १०) स्कूल-कॉलेज कॉंप्लेक्स् प्रोजेक्ट––

या योजनेतील श्री खटके एन. के., श्री. कुंभार ए. ए. व कुमारी बंडगर एस. ए. यांनी आपल्या गावातील हायस्कूल व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मदत केली. यामुळे बऱ्याच गरीब व होतकरु मुलांचा फायद झाला.

अशा रीतीने आमच्या रा से. योजनेच्या पथकाने अत्यंत विधायक अशी कामे या स्वातंत्र्य रजत महोत्सवाच्या वर्षी केली आहेत.

मा. प्राचार्य एस्. जी. भोरे व डॉ गोधा यांनी वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे माझे विद्यार्थी मित्र श्री. मूर्ति बी. जी., श्री. देशपांडे, श्री. कुंभार, कु. उपाध्ये, कु. देशपांडे व मा. संगई यांनीही वेळोवेळी मदत केली.

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे व रा. से. योजनेचे कार्यवाह श्री. व्ही. एन्. भिडे व डॉ. हळबे यांनी योग्य मार्गदर्शन केले. याबद्दल या योजनेतर्फे मी सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

के. एस्. सणगर
रा. से योजना कार्यवाह

## 'कमवा नि शिका' योजना

आमचे महाविद्यालय गेली कित्येक वर्षे ज्ञानाची गंगा अगदी गरिबातल्या गरीब शेतकरी व कामकऱ्याच्या झोपडीपर्यंत पोहोचविण्याचे काम अव्याहतपणे करीत आहे

आजकाल पैशासाठी कोणाचे शिक्षण अडून रहाता कामा नये ही आमच्या प्राचार्यांची भूमिका आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचे शिक्षण स्वतःच्या पायावर उभे राहून केलं पाहिजे. म्हणूनच ही योजना महाविद्या-लयाच्या स्थापनेपासून सुरु केली आहे.

या वर्षी या योजनेत एकूण ३० विद्यार्थ्यांना काम देण्यात आले. या योजनेतील मुलेही अत्यंत आपुलकीने काम करीत आहेत व स्वत:चे शिक्षण स्वावलंबनाने पूर्ण करीत आहेत.

विशेषत : आमच्या प्राचार्यांनी या योजनेतील मुलांच्याकडे अत्यंत बारकाईने लक्ष दिले. व जास्तीत जास्त गरीब होतकरु विद्यार्थ्यांचा फायदा करून दिला.

आजच्या घडीला काही विद्यार्थी सुरवातीस खिशात दमडीही नसताना विद्या संपन्न होवून बाहेर पडत आहेत. त्यामुळे शिक्षणाचे खरे धोरण स्वावलंबन हे पूर्ण झाल्याचे समाधान लाभत आहे.

के. एस्. सणगर
कमवा नि शिका योजना प्रमुख

## एन. सी. सी.

या शैक्षणिक वर्षात एन. सी. सी. च्या कामकाजाची सुरुवात नियमितपणे जुलै १९७२ पासून करण्यात आली. सरकारी धोरणास अनुसरुन फक्त निवडक अशा १४५ विद्यार्थ्यांनाच एन. सी. सी. मध्ये प्रवेश देण्यात आला.

गतवर्षी आमच्या महाविद्यालयातील एकूण तीन विद्यार्थी ' सी ' सर्टिफिकेट परीक्षेमध्ये व एकोणीस विद्यार्थी ' बी ' सर्टिफिकेट परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाले. त्याशिवाय आमच्या एन. सी. सीं. कंपनीचे गतवर्षीचे कॅडेट सिनिअर अंडर ऑफीसर श्री. एस्. एस्. राजे भोसले व एन. सी. सी मधील एक माजी कॅडेट श्री. ए. जी. गावडे या दोघांची पोलिस सब् न्स्पेक्टरच्या कोर्ससाठी निवड झाली असून सध्या ते दोघे नाशिक येथे प्रशिक्षण घेत आहेत.

यावर्षी आमच्या बटालियनचा वार्षिक ट्रेनिंग कँप बटालियन कमांडर मेजर एन् एस्. भंडारी यांच्या नियंत्रणाखाली जाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्रशस्त मैदानावर घेण्यात आला. या कँपमध्ये आमच्या महाविद्यालयातील ५५ कॅडेटसनी भाग घेऊन हा कँप अतिशय उत्तम तऱ्हेने यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले. मेजर एन्. एस्. भंडारी यांचे अमोल मार्गदर्शन या कँपला लाभलेले असल्यामुळे वार्षिक ट्रेनिंग कॅम्प हा कमालीचा यशस्वी ठरला.

शनिवार दि. ६ जानेवारी १९७३ या दिवशी आमच्या एन. सी. सी. कंपनीतील ९३ कॅडेटसना दौंड येथे ३०३ रायफल फायरिंगचा सराव देण्यात आला.

एस. सी. सी. च्या या सर्व उपक्रमांना आमचे मा. प्राचार्य श्री. एस्. जी भोरे यानी वेळोवेळी आस्थवाईकपणे सहकार्य आणि उत्तेजन दिले याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार

| | |
|---|---|
| आर. के. भुजवळ | ले. ए. एस्. किणिंगे |
| कॅडेट सिनिअर अंडर ऑफिसर | कंपनी कमांडर<br>'७' कंपनी '२' महाराष्ट्र.<br>एन. सी. सी. बटालियन |

## नियोजन मंडळ

नियोजन मंडळाच्या वतीने स. प. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दि. ब. केरून यांचे दि. ३१ जुलै १९७२ रोजी व्याख्यान झाले व उद्‌घाटन झाले. अध्यक्षस्थानी प्रा. भोरे हे होते. त्यानी भारतीय नियोजनासंबंधी विचार मांडले. जुळया मुंबई संबंधी त्यांनी टाकाऊ क दृष्टी दिसून आली.

पुणे येथील गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेतील प्राध्यापक प्रा. शरद कुलकर्णी यांचे एम्. ए. व एम्. कॉम. च्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान झाले. " समाजवादामधील किंमती " या तात्विक विषयावर त्यांनी विचार मांडले.

प्रा. एस्. जी. बोंद्रे
अध्यक्ष
नियोजन मंडळ



## परिमल

सालाबादप्रमाणे ' परिमल ' ही भित्तीपत्रिका आम्ही सुरू केली ऑगस्टच्या पहिल्या आठवडयात. आणि विद्यार्थ्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला की ' परिमल ' ची शोकेस चक्क अपुरी पडायला लागली. आपला लेख, कथा, कविता, चित्रे देण्याचा हा उत्साह लक्षात घेता पुढील वर्षापासून ' परिमल'ला नवीक्वुईट मोठी थोरली शो – केस असायला हरकत नाही असं आम्हाला वाटतं.

यंदा श्री. अशोक अवचट यांनी कथा, कविता, कट वर्क डिझाईन देऊन आपले त्रि–पैलू ( शब्दातील चुकभूल द्यावी घ्यावी ) कर्तृत्व दाखविले श्री. आर. के गांधींनी तर इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषेत कथा, कविता आणि लेख दिले. 'परिमल' ची साहित्यिक बाजू सांभाळली या दोन हुकमी एक्क्यांनी !

उरलेले दोन हुकमी एक्के चित्रकारातील ! एक श्री. अविनाश भागवत आणि दुसरे श्री. प्रशांत मेहता. श्री. अविनाश भागवत यांनी म. गांधीपासून शर्मिला टागोर पर्यंन्त साऱ्यांना 'परिमल' मध्ये झळकवलं. दुसरी टर्म रंगवली श्री. प्रशांत मेहता यांच्या रंगीत निसर्ग चित्रांनी. संक्रांतीची त्यांची भेटकार्डे खरोखरच लाजवाब होती. श्री. आर. के भुजबळ यानी मात्र थोडी कमीच चित्रं दिली. परंतु जी दिली ती त्यांच्या नेहमीच्या परंपरेप्रमाणे उत्कृष्टच होती.

'परिमल' चा गद्य विभाग प्रामुख्याने सर्वश्री देविदास कुंभार, भगवान वाघमारे, ए. एस्. ठोंबरे, मनोजकुमार शहा, नं. पां. कस्तुरे, कु. विद्या प्रभुणे आणि कु. मंगला घायाळ यांनी समृद्ध केला. चित्रकारांमध्ये सर्वश्री के. डब्ल्यू. देशपांडे, एम्. एम्. कांबळे, अशोक जाधव, कुंडलिक देवकाते हे विद्यार्थी आघाडीवर होते. श्री. प्रकाश शिंदे यांची 'टाईपरायटरची करामत' कौतुकास्पद होती. प्रा. संगईंनी आपली दोन चित्रे देऊन 'परिमल' ला सक्रीय पाठिंबा दिला

कविता विपुल आल्या. सर्वश्री सदानंद करंदीकर, प्रमोद शिंदे, नंदकुमार चावरे, अविरतन राठोड, नाळे' कोकरे, के. वी. वणवे, नजमुद्दीन शेख, सातव एस्. एन्. ढवाण टी. डी , बबन आटोळे या विद्यार्थी कवींच्या कविता 'परिमल' मधून प्रकाशित झाल्या.

कथा, कविता, लेख यांचा दर्जा आहे त्यापेक्षा थोडा वरचा असावा असं आम्हाला वाटतं. अर्थात हे मत 'जनरल' झालं. वर उल्लेखलेल्या साहित्यातील काही साहित्य नि:संशय चांगलेच होतं यात शंका नाही.

विद्यार्थिनी मात्र लेखनाबाबत कमालीच्या उदासीन आढळल्या.

'परिमल'ला सहकार्य देणाऱ्या सर्व सहकाऱ्यांना मन:पूर्वक धन्यवाद !

| | |
|---|---|
| मुकुंद टाकसाळे | प्रा. डी. एस्. शहा |
| संपादक | प्रमुख |

## विज्ञान मंडळ

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध प्रकारच्या प्रगतीचे दर्शन घडावे व त्यांचे वैज्ञानिक ज्ञान समृद्ध व्हावे या उद्देशाने ह्या मंडळाचे कार्य चाललेले असते. त्यानुसार विज्ञानातील विविध विषयांवर व्याख्याने आयोजित केली जातात.

या वर्षी कोपरगाव येथील श्री सदगुरु गंगागीर महाराज कॉलेजचे प्राचार्य एस्. डी. पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्यांनी विज्ञानक्षेत्रातील विविध प्रगतीचा समग्र आढावा घेऊन विद्यार्थ्यांना विज्ञानविषयाच्या अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले.

आमचे प्राचार्य एस्. जी. भोरे व प्राध्यापक यांनी आम्हास सर्व तोपरी सर्व साहाय्य केले याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत.

प्रा. व्ही. ए. वकील
प्रमुख

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ
## १९७२-७३

या वर्षी पारितोषिक वितरण समारंभाचा प्रमुख कार्यक्रम शनिवार दिनांक १०-२-७३ रोजी झाला. त्यानिमित्त फिशपॉण्ड, फनफेअर व अल्पोपहार इत्यादि कार्यक्रमही आयोजित केले होते.

शनिवारी सकाळी ८ ते ११ फनफेअरचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास योग्य असा प्रतिसाद दिला. त्यानंतर श्री. एम्. एम्. टाकसाळे यांनी सादर केलेले 'बातमीपत्र' फारच मनोरंजक झाले. बातमीपत्रानंतर विद्यार्थ्यांच्या आवडीचा 'फिशपॉण्ड'चा कार्यक्रम झाला.

दुपारी साडेचार वाजता पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम माननीय श्री. का. मा. आगवणे, उपाध्यक्ष, पुणे जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे उपप्राचार्य व एम्. बी. ए. कोर्सचे संचालक डॉ. प्र. चि. शेजवलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सौ. शेजवलकर यांनी विद्यार्थ्यांना पारितोषिके दिली.

रविवारी सकाळी ८-३० ते ११-३० अल्पोपहाराचा कार्यक्रम झाला. याचवेळी फनफेअर व फनी गेम्सही चालू होते. विद्यार्थ्यांनी सर्वच कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने भाग घेतला. नंतर ११-३० ते १-३० पर्यंत प्राचार्य संघ व विद्यार्थी प्रतिनिधी संघ यात क्रिकेटचा प्रदर्शनीय सामना झाला व हा सोहळा संपला.

दिलीप करे
जनरल सेक्रेटरी.

प्रा. शरद नवाथे
चेअरमन.

# Staff Academy

The staff academy began its working for the current academic year with lecture given by Dr. Prof. J. K. Godha. The subject of the talk was "Problems in Education." The second talk 'Funs and furies in teaching' was given by Prof. V. K. Deo. In his talk he discussed some difficulties encountered by College teachers in day-to-day teaching. The third lecture was delivered by Prof. D. T. Patil on "कुसुमाग्रजांची कविता".

Prof. V. V. Upadhye
Chairman.





# Report of Scholarships
## 1972-73

| Particulars | Rate | No. of students |
|---|---|---|
| **I] Central Government** | | |
| 1) National Scholarship | Rs. 50 per month | 3 |
| 2) National Loan Scholarship | Rs. 720 per year | 31 |
| 3) B. C. (Scheduled Cast, Scheduled Tribes, D.N.T./N.T) | Rs. 27 per month for day scholar<br>Rs. 40 per month for Hostellor | 130 |
| **II] State Government** | | |
| 1) Freedom Fighter Scholarship | Rs. 50 per month and Rs. 100 Book-Grant per year | 14 |
| 2) Government Open Merit Scholarship | Rs. 30 per month. | 2 |
| **III] Other Agencies** | | |
| 1) Baramati Nagarpalika Scholarship | Rs. 1250 disbursed to | 13 students. |
| 2) Popatlal Chandanmal Scholarship | Rs. 301 " | 4 " |
| 3) Tuljaram Chaturchand Shah Scholarship | Rs. 500 " | 2 " |
| 4) College Merit Scholarship | Rs. 1460 " | 56 " |

# Freeships

| | |
|---|---|
| **I] State Government** | 731 students. |
| 1) E. B. C. (Income below Rs. 1200) | 63 " |
| 2) Govt. Open Merit Freeship | 11 " |
| 3) B. C. Repeaters | 17 " |
| 4) Free Education to sons & daughters of Pry. Teachers | 57 " |
| **II] College Freeship** | |

# Teaching Staff 1972–73

**Principal – S. G. Bhore**

**Dept. of Marathi**

1. Prof. D. T. Patil.
2. Prof. D. S. Shah.
3. Prof. V. A. Sangai.
4. Prof. P. N. Dixit.

**Dept. of Hindi**

5. Prof. Dr. K. M. Surve.

**Dept. of English**

6. Prof. V. V. Upadhye.
7. Prof. S. K. Kulkarni.
8. Prof. V. G. Morgaonkar.
9. Prof. D. V. Togale.

**Dept. of Sanskrit and Ardhamagadhi.**

10. Prof. N. G. Londhe.

**Dept. of History**

11. Prof. A. S. Kininge.

**Dept. of Economics**

12. Prof. S. G. Bondre.
13. Prof. V. K. Deo.
14. Prof. S. R. Shinde.

**Dept. of Politics**

15. Prof. S. T. Naigaonkar.
16. Prof. M. A. Upasani.

**Dept. of Psychology**

17. Prin. S. G. Bhore.
18. Prof. B. S. Mane.

**Dept. of Sociology**

19. Prof. S. P. Kadam.

**Dept. of Mathematics and Statistics**

20. Prof. B. B. Patil.
21. Prof. P. D. Wavare.
22. Prof. V. G. Padwekar.
23. Prof. M. D. Bhagat.

**Dept. of Chemistry**

24. Prof. R. H. Chaphekar.
25. Prof. R. J. Gandhi.
26. Prof. M. B. Chaudhari.
27. Miss N. K. Shah.

**Dept. of Physics**

28. Prof. S. R. Nawathey.
29. Prof. E. K. Patil.
30. Shri. R. W. Joshi.

**Dept. of Botany**

31. Prof. D. K. Magdum.

**Dept. of Zoology**

32. Prof. V. A. Vakil.
33. Shri. K. S. Sanagar.

**Dept. of Geography**

34. Prof. B. P. Joharapurkar

**Dept. of Commerce**

35. Prof. Dr. J. K. Godha.
36. Prof. B. Z. Chhallani
37. Prof. D. H. Firke.
38. Prof. C. S. Shetti.
39. Prof. J. B. Magdum.

**Physical Director**

40. Shri. V. L. Lekavale.

**Librarian**

41. Shri. S. N. Patil.

# Administrative Staff 1972-73

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Head Clerk- | Shri | R. L. Surwade |
| 2) | Accountant- | ,, | C. K. Warkari |
| 3) | General Clerk- | ,, | G. P. Shrotri |
| 4) | Cashier- | ,, | M. D. Gujar |
| 5) | Typist Clerk- | ,, | V. D. Mahamuni |
| 6) | Typist and General Clerk- | ,, | V. G. Kumbhar |
| 7) | Library Clerk- | ,, | D. B. Deokar |
| 8) | Peon- | ,, | S. N. Kudale |
| 9) | ,, | ,, | M. A. Sawant |
| 10) | ,, | ,, | J. V. Shah |
| 11) | ,, | ,, | V. W. Deshmukh |
| 12) | ,, | ,, | J. K. Upadhye |
| 13) | ,, | ,, | P. K. More |
| 14) | ,, | ,, | K. S. Newase |
| 15) | ,, | ,, | B. U. Teke |
| 16) | ,, | ,, | B. S. Kothamire |
| 17) | ,, | ,, | R. K. Galande |
| 18) | ,, | ,, | S. S. Palashikar |
| 19) | ,, | ,, | B. M. Gadekar |
| 20) | ,, | ,, | M. M. More |
| 21) | ,, | ,, | S. K. Ghodke |
| 22) | ,, | ,, | D. W. Shah |
| 23) | ,, | ,, | M. S. Sutar |
| 24) | ,, | ,, | V. S. Salunke |
| 25) | ,, | ,, | Khadakbahadur Gurkha |

# आमच्या महाविद्यालयाचो वैशिष्टचे

## पुढील विविध अभ्यासक्रमाच्या अध्यापनाची सोय

- पदवीपूर्व साहित्य, वाणिज्य आणि विज्ञान.
- प्रथमवर्ष साहित्य, वाणिज्य आणि पूर्वव्यावसायिक Pre-Professional
- द्वितीयवर्ष साहित्य -मराठी, हिन्दी, इंग्लिश, संस्कृत, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, समाजशास्त्र, गणित, भूगोल आणि शिक्षणशास्त्र
- तृतीयवर्ष साहित्य – स्पेशल विषय मराठी, इंग्लिश. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास. प्रायोगिक मानसशास्त्र हा विषय १५ जून ७३ पासून नव्याने सुरू होत आहे
- एम्. ए. – संपूर्ण मराठी, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र -सी. डी. ग्रुप
- द्वितीय आणि तृतीयवर्ष वाणिज्य ॲडव्हान्स्ड अकौंटन्सी आणि कॉस्टिंग
- एम्. कॉम्.- कॉस्टिंग, बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन, ॲडव्हान्स्ड अकौन्टसी, कंपनी लॉ आणि टॅक्सेशन
- द्वितीय वर्ष विज्ञान – रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, गणित, संख्याशास्त्र वनस्पतोशास्त्र आणि प्राणिशास्त्र. विज्ञान विभागातील सेमिस्टर एक आणि दोन चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रायोगिक मानसशास्त्र हा विषय १५ जून ७३ पासून सुरु होत आहे.
- तृतीयवर्ष विज्ञान – स्पेशल विषय रसायनशास्त्र आणि गणित
- अद्यावत् साहित्य साधनांनी युक्त प्रयोगशाळा.
- समृद्ध ग्रंथालय.
- निसर्गरम्य वातावरणातील भव्य वास्तू.
- शंभर विद्यार्थ्यांसाठी अद्यावत सुखसोईंनी युक्त वसतिगृह.
- एन्. सी. सी. व एन्. एस्. एस्. ची सोय.
- खेळाचे प्रशस्त मैदान, देशीं आणि विदेशी खेळांची सोय.
- गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी ' कमवा आणि शिका ' ही योजना.
- गरीब आणि हुशार विद्यार्थ्यांसाठीं पुस्तके पुरविण्याची सोय.
- विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या व सवलती.



पाहुण्यांच्या समवेत - आमचा सेवकवर्ग.